साप्ताहिक

# माणूस

१ फेब्रुवारी ८५/२ रुपये



## निवडणुकीच्या रिंगणात 'पाणी पंचायत' का?



## पंतप्रधान कोण?

रेमंड की सायमन?
सायमन की रेमंड?

## 'शर्यत' कादंबरीचा शेवटचा वेधक भाग...

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : सदतिसावा

¤

९ फेब्रुवारी १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

¤

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

**सुरेश नावडकर**

# सप्रेम नमस्कार १

¤ आपल्या दि. २४ डिसेंबरच्या अंकातील श्री. गोखले यांचा यु. कार्बाईडवरील लेख वाचला. लेख माहितीपूर्ण आहे. चौकटीत दिलेल्या माहितीत (भागधारकांचे काय होणार ?) काही चुका असाव्यात म्हणून पुढील मजकूर लिहीत आहे.

कंपनी Public Ltd. झाली त्यावेळचे नाव National Carbon Co. (India) Ltd. असे होते. कंपनी सुरुवातीपासून चांगला नफा वाटीत आहे. ७३ साली दिलेला शेकडा १०.१८ टक्के नफा सर्वोच्च आहे हे वस्तुस्थितीला धरून नाही. ७५ साली दिलेला ६.२५ टक्के नफा हा नीचांक आहे हे म्हणणेही बरोबर नाही. खरे तर तो ११ टक्के होता. गेल्या दहा वर्षात १०.९ टक्के पेक्षा कधीही कमी दिलेला नाही. उलट ७६ ते ७९ या चार वर्षात १६ टक्के नफा दिलेला आहे. शिवाय गोखले एक गोष्ट विसरलेले दिसतात. गेल्या ३० वर्षात कंपनीने Right (with Premuim) व बोनस (विनामूल्य) सढळपणे दिलेले आहेत. एकंदर रोखीने भरलेल्या रकमेपेक्षा भागधारकांना जास्त रक्कम व्याज रूपाने मिळाली आहे. ह्या लेखकाने रुपये १९.५० (रु. १०+९.५० प्रिमियम) प्रमाणे ३० भाग घेतले त्याचे आता ७६५ झाले आहेत. एकंदर भागधारक १७,९९२ नसून २३८८४ आहेत. ६८ लाखाची डिबेंचर्स तारणावर Unit Trust ने घेतली. त्यापैकी निम्म्याची परतफेड झाली आहे. २॥ कोटीचे रोखे १२ टक्के आहेत. ४९० लाख १५ टक्क्याचे आहेत ते सर्व तारणावर आहेत. तरी भागधारक व डिबेंचरधारक यांना घाबरण्याचे काही कारण नाही.

श्री. गोखल्यांचे लेख आपण छापता हे खरोखरच चांगले आहे. मराठी वाचकांना असे लेख वाचावयास मिळत नाहीत.


२४ जानेवारी ८५ — **वि. मा. मराठे**, सायन

¤ आपल्या १९ जानेवारी ८५ च्या अंकामधील शिरीष सहस्त्रबुद्धे लिखित 'मोटर वाहतूक : सदैव रस्त्यावर असलेला व्यवसाय' ह्या मथळ्याखालील लेख वाचला व वाचून अतिशय बरे वाटले. कारण ह्या व्यवसायाच्या झालेल्या दुबळ्या परिस्थितीवर प्रकाशझोत टाकणारा एकही लेख आजवर कुठल्या मासिकातून, पाक्षीकातून वा साप्ताहिकातून तसेच वृत्तपत्रातून प्रकाशित झाला नव्हता त्यामुळे समाजाला तसेच राज्यकर्त्यांना ह्या व्यवसायाची परिस्थिती माहीत होवू शकत नव्हती. परंतु ह्यापुढे जर ह्यासारखे लेख वृत्तपत्रे, मासिके, पाक्षीके, ह्या माध्यमातून सरकार व समाज ह्यांच्यापुढे येत राहतील तर ह्या व्यवसायाला काही तरी उर्जीत अवस्था येईल ही आशा.

सरकारने ह्या व्यवसायाच्या अडचणींवर लक्ष केंद्रीत केल्यावर मोटरमालकाला व्यापारी समाजाकडून होणारी पिळवणूक व इतर असंख्य अडचणींवर मात होऊ शकेल व तसेच समाजापुढे संबंधी व्यवसायाची परिस्थिती व अडचणी प्रकाशात आल्यावर आज समाजामध्ये बोकाळलेले गाड्या घेण्याचे वेडही आपसूक कमी होईलसे वाटते.

आज समाजामध्ये ह्या व्यवसायासंबंधी एक प्रकारची क्रेज तयार झाली आहे. एक ट्रक घेतला, बँकेचे ३-४ वर्षात लोन फेडले की ३-४ वर्षांनी आपण २ ते २॥ लाखाच्या अ‍ॅसेटचे मालक होऊ शकतो. एवढ्या कमी कालावधित एवढा जास्त नफा. म्हणून निरनिराळ्या सरकारी स्किमच्या आधारे आज जो तो ट्रक, मेटॅडोर व इतर वहाने घेण्याच्या मागे लागला आहे; परंतु समाजाला ह्या व्यवसायाच्या दुबळ्या परिस्थितीची व इतर अडचणींची माहिती नाही.

२७ जानेवारी ८५ — **भा. द. वीरकर**, डोंबिवली



# मुंबापुरी

## □ गुपचुप, गुपचुप

झाली. झाली. झाली. ऐकाहो ऐका— विरोधी पक्षांची पुलोद आघाडी स्थापन झाली हो !

आले. आले. आले. भाजपवालेही पुलोदबरोबर आमोद-'प्रमोद' करायला आले. कॉंग्रेस (एस), जनता, शेकाप आणि भाजप या चार विरोधी पक्षांनी तुतारी फुंकली हो फुंकली.

आमचं राज्य असतं तर अरुण मेहतांना सांगून कोल्हापूरहून एक खास हत्ती मागवला असता अन् पी. के. अण्णांना साखरफुटाणे आणायला सांगितलं असतं; पण आम्ही पडलो पोटार्थी पत्रकार. आमचं लक्षात कोण घेतो ?

या खेपेला तर शरद पवारांनी इतकं दूर ठेवलं आम्हाला की, ताकास तूर लागू दिला नाही. सगळं कसं चिडीचूप झालं. विरोधी पक्षवाले कुठे बसलेत, बोलणी कुठवर आलीयेत हे काहीच कळलं नाही.

परवा परवापर्यंत आम्ही समजत होतो की हा समझोता काही होणार नाही. (एक पत्रकार तर आताही छातीठोक सांगतो की, हा समझोता झालाय खरा; पण तो जरासुद्धा टिकणार नाही; पण पवार, तुम्ही मनाला लाऊ नका. हा पत्रकार 'इम्प्रिण्ट' चा असेलसं वाटतंय.)

पवारांनी शेवटपर्यंत आम्हाला अंधारात ठेवलं. दे. मा. कराळयांच्या बंगल्यापर्यंत जाऊन आम्ही कित्येकदा असेच परत आलोत महाराष्ट्राचं भवितव्य या ए-६ बंगल्यावर घडतंय हे आम्हाला ठाऊक होत; पण चर्चेचं फलित काय हे आम्हाला जयंत साळगावकरांना विचारण्याची वेळ आली होती.

शेवटी, चर्चा 'सारंग'वर होत नसून 'ए-सहा' या मंत्रालयासमोरील दे. मा. कराळयांच्या बंगल्यांवर चाललीये अशीच बातमी आमच्यातल्या एकानं फोटोसकट छापली. हुश्श ! अखेरीस बोलणी कुठे सुरू आहेत हे तरी मेलं कळलं. आता चर्चेचं फलित काय तेही कालच्या पत्रकार परिषदेत पवारांनी सांगून टाकलं. म्हणून मघाशी ही बातमी अगदी बोल्ड फ्लॅशमध्ये सांगून टाकली.

आता एकच विनंती शरदरावजींना. आम्हाला इतकं हीन लेखू नका हो. एखाद्या इंग्रजी मासिकाने तुम्हाला पेपर टाईगर म्हणून संबोधलंय त्याचा राग आम्हा समस्त पत्रकारांवर काढू नका. आम्ही तुम्हाला महाराष्ट्राचे भावी भाग्यविधाते मानतो. फक्त अधूनमधून आमचे निवडणूक अंदाज तेवढे घोर चुकतात. इतकंच.

## □ वृत्तपत्रीय संकेत (?)

विधानसभेचे अधिवेशन सुरू व्हायला अजून अवकाश आहे. तरी मुंबापुरीत गेल्या आठवड्यात दोन मोर्चे झाले. पहिला दत्ता सामंतांचा आणि दुसरा मातंग समाजाचा. दत्ता सामंत मोर्चामधले जुने भिडू आहेत. २६ जानेवारीला कल्याणला नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशनच्या कामगारांवर गोळीबार झाला त्यात सामंतांच्या युनियनचे तीन लोक ठार झाले. याची न्यायालयीन चौकशी व्हावी ह्या मागणीसाठी सामंतांनी हा मोर्चा काढला मोर्चा निघायच्या आधी सामंत मुंबई बंद करायची भाषा करीत होते. पण खुद्द मोर्चालाही म्हणावा तितका प्रतिसाद मिळाला नाही. विधानसभा निवडणुका तोंडावर आल्याने विरोधी पक्ष आता लोकांची अडचण करण्यास हातभार लावणार नाहीत. त्यामुळे सामंतांचा बंदचा विचार बारगळला असावा.

दुसरा मोर्चा होता मातंगांचा. त्यांच्याबद्दल फारसे कोठे लिहून आले नाही. वृत्तपत्रांनी तर ह्या मोर्चाची दखलही घेतली नाही. पण गेले सहा दिवस ४०० ते ५०० मातंग स्त्री-पुरुष त्यांच्या पोराबाळांसह हुतात्मा चौकात ठिय्या देऊन बसले आहेत.

आझाद मैदान ते रीगल ह्या भागात मोर्चा ही काही नवी घटना नाही. आम्हाला वाटले थोडा वेळ वहातूक विस्कळीत करून हा जथा परत जाईल; पण त्यांनी चक्क फ्लोरा फाउंटनमध्येच बसकण मारली.

मुंबापुरीच्या गजबजलेल्या सेन्ट्रल बिझनेस डिस्ट्रिक्टमध्ये ३०० ते ४०० लोकांनी दिवसरात्र मुक्कामाला रहाणे हे दृश्यच मोठे विचित्र आहे. अण्णाभाऊ साठे मातंग विकास महामंडळ सुरळीत स्थापन—चालू व्हावे एवढीच त्यांची प्रमुख मागणी. या मागणीला होकार किंवा नकार द्यायलाही दादांना अजून वेळ मिळाला नाही.

अकोला, बुलढाणा, परभणी, चिंचवड, औरंगाबाद, सांगली, सातारा अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून हे लोक मोर्चासाठी आले. त्यातल्या निम्म्यांनी मुंबई पहिल्यांदाच पाहिलेली. ह्या समाजाचे नेते डॉ. आप्पासाहेब गोपले सरकारने महामंडळाची मागणी मान्य करावी म्हणून हुतात्मा चौकात तंबू ठोकून आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांना सोबत म्हणून बाकीच्यांनीही मुक्काम केला आहे.

सकाळी सात वाजल्यापासून चर्चगेट आणि व्हीटीकडून माणसांचे लोंढे हुतात्मा चौकाकडे यायला लागतात तेव्हा आळोखे पिळोखे देत ही माणसे उठतात. प्रातर्विधीसाठी मरीन ड्राईव्हकडे रीघ लागते. दुपारची पंगत चौकातच भरवली जाते. एखादा दिवस उपाशी पोटीच जातो. आंघोळीची, पिण्याच्या पाण्याची सोय नाही. दुपार ते संध्याकाळचा वेळ ही माणसे व्हीटी, नरीमन पॉइंट ते चर्चगेट ह्या भागात भिरभिरत रहातात. हुतात्मा चौकात येणारे फिरंगी प्रवासी आणि ही माणसे एकमेकांकडे आश्चर्याने पहातात. त्यांनी फोटो काढले की ह्यांना आनंद होतो. रात्री अकरा वाजून गेले की चौकातली गाड्यांची वर्दळ कमी होते. आणि ह्या भागाला निर्वासितांच्या छावणीचे रूप येते.

व्हीटी, फाउंटन, कुलाबा ते नरीमन पॉइंट ह्या भागात बोटावर मोजता येईल

एवढ्याच लोकांना मराठी समजते. मातंगांना 'हँडआऊट' म्हणजे काय हे अजून ठाऊक नाही. कोणतीही घटना जोवर ऑफिसमध्ये डायरीत मार्क केलेली नाही तोवर ती कव्हर करू नये, असा वृत्तपत्रीय संकेत आहे. त्यामुळे पत्रकारांनीही ह्या मातंगांची दखल घेतलेली नाही.

प्रेस क्लबमध्ये पत्रकारांचा अड्डा पडलेला असतो. महापालिका, मंत्रालय, पोलीसप्रेसरूम यामधील म्होरके पत्रकार आज संध्याकाळी दारूसाठी कुणाला कापायचे याचे बेत रचत बसतात. आणि दादांना तर निवडणुकीपर्यंत उसंत नाही.

आज संध्याकाळी प्यामलासिंगची कॅसेट ओबेरॉयच्या सिल्व्हर आर्करूममध्ये दिलीपकुमार आणि सायरा बानू रिलीज करतील. त्याला मुंबापुरीतील सर्व वृत्तपत्रांचे दोन-दोन प्रतिनिधी येतील. अगदी स्पोर्टस् रिपोर्टर्ससुद्धा ! गाण्यासाठी नव्हे. कॉकटेलूस फॉलोड बाय डिनर असा खास कार्यक्रम आहे.

मातंगांची चूक एव्हढीच–त्यांना अजून हँडआऊट तयार करता येत नाही. आणि दादांना निवडणुकीपर्यंत वेळ नाही. कार्यक्रम संपला की प्यामलासिंगच्या कॅसेटवरचा हँडआऊट तुमच्या हातात पडेल. तो आजच द्यायचा घाई नाही. मद्यपान असले की एक दिवसाचा एंबार्गो असतो. उद्या फोटोसकट बातमी द्यायची. It's not a joke to write on music, you see !

### ☐ लाजवाब

गेल्या खेपेला उस्ताद बिस्मिल्लाखाँसाहेबांचा जिक्र केला होता. बिस्मिल्लाखाँना ऐकणं, त्यांना जवळून पाहणं-बोलणं ही आयुष्याची एक जमेची बाजू आहे.

इंडियन म्युझिक ग्रुपतर्फे सेंट झेवियर कॉलेजमध्ये झालेल्या तीन दिवसांच्या संगीत सोहळ्यात खाँसाहेबांनी दुसऱ्या दिवशी श्रोत्यांना अक्षरशः सुरात बांधलं.

पांढरा गढवाली लेंगा, अघळपघळ डगला, डोक्यावर काळी, बसकी टोपी अन् कानात विगबाळी. डोळ्यात कमालीचं निरागसपण.

खाँसाहेबांनी जेव्हा सनईत पहिली प्राणमयी फूंक प्रज्वलित केली तेव्हा रात्रीचा एक वाजला होता. बागेश्री हलक्या, सुरेल पावलानं आस्ते–आस्ते सेंट झेवियरच्या प्रांगणात प्रवेशत होती.

खाँसाहेबांबरोबर व्हायोलिनवर डॉ. एन. राजम होत्या. ही शहनाई–व्हायोलिन जुगलबंदी म्हणजे आधुनिक भारतीय संगीतातला एक रसोत्कट अध्याय आहे. खाँसाहेब शहनाईवर बारीक नक्षीकाम करायचे तर त्याला तोडीसतोड म्हणून राजमबाई व्हायोलिनवर असा लाजवाब गज फिरवून बहार आणायच्या !

खाँसाहेबांनी जेव्हा होरी वाजवून अन भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली तेव्हा पहाटेचे साडेतीन वाजले होते. आम्ही कॉलेजबाहेर पडलो तेव्हा डोक्यावर चांदण्यांनी लहडलेलं आकाश होतं, समोर सव्वीस जानेवारीसाठी रोषणाईने उजळून निघालेलं व्ही. टी. स्टेशन अन् प्राणात खाँसाहेबांची होरी ! दुसरं काय हवं ?

— विष्णु जयदेव

---

## निवडक निवडणूक : पहिला हप्ता

# पुलोद आघाडी, काँग्रेसची डोकेदुखी

शिरीष सहस्रबुद्धे

---

आपल्या स्वतंत्र नि निर्भय वृत्तपत्रसृष्टीचं नेमकं काय बिनसलंय कोण जाणे, पण गेला काही काळ त्यांचे नि वस्तुस्थितीचे सूर कुठे जुळतच नाहीयेत असं चित्र दिसतं. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत तर हा विसंवाद दिसलाच, पण अगदी अलिकडेच महाराष्ट्रातल्या पुलोद आघाडीच्या पुनरुज्जीवनामुळेसुद्धा हीच गोष्ट पुन्हा एकदा डोळ्यात खुपली. पुलोदची फक्कड खिचडी शिजली ती काही एकाएकी, एका रात्रीत नव्हे; पण ती शिजून तयार होईतो तिचा वास एकाही चांगल्या वृत्तपत्राला येऊ नये याला काय म्हणावं ? काही वृत्तपत्रं तर आघाडीबद्दलच्या वाटाघाटी फिसकटणार असल्याचंच भाकित रोजच्यारोज छापत राहिली. प्रत्यक्षात मात्र खूपच सुरळितपणे नि ताणतणाव, रुसवेफुगवे न होता बोलणी चालू होती. अखेर २ फेब्रुवारीला तडक जागा वाटपच जाहीर करून शरदरावांनी पत्रकारांची धांदल उडवून दिली. एव्हाना आघाडीतल्या चौकडीचे उमेदवार 'आम्ही एकशेपाच' म्हणत काँग्रेसशी एकास एक लढत देण्यासाठी रिंगणात उतरलेही आहेत. त्यांना बंडखोर काँग्रेसजन किती भेटतात तेच आता पाह्यचं.

### पुलोद १९८५ : काही खासियती

१९७८ ची पुलोद आघाडी नि आताची आघाडी यातलं एक ठळक साम्य म्हणजे शरद पवारांचं नेतृत्व. मुख्यमंत्रीपदावरून ते हुसकले गेले त्याला आता पाच वर्षं होऊन गेली; पण महाराष्ट्राच्या राजकारणावरची त्यांची पकड अजूनही कायम आहे. खरं तर जास्तच घट्ट झालेय. याबाबतीत ते यशवंतराव चव्हाणांचे चेले शोभतात खरे. पुलोद ८५ च्या जन्माचं श्रेयही मुख्यतः त्यांचंच. एरवी मैत्रीपूर्ण लढतींची खुमखुमी न जिरलेल्या जनता–भाजपसारख्या पक्षांची एकत्र गठडी वळणं आणि तेही दोघांना दिलेल्या जागांच्या बेरजेइतक्या जागा आपल्या पक्षाकडे राखून, ही काही सामान्य कामगिरी नव्हे. शिवसेना आणि दत्ता सामंतप्रणीत कामगार आघाडी यांच्यासारखे अतिजहाल गट नि रिपब्लिकन पक्ष गट ए टू झेडसारखे फुटीर नि फुटकळ गटबाज यांना पुलोद'८५ पासून दूर ठेवलेलं आहे, हे एक चांगलं वैशिष्ट्य.

आवर्जून सांगावीत अशी आणखीही दोनतीन वैशिष्ट्यं पुलोद'८५ मध्ये आहेत. एक तर आघाडीची घोषणा करतानाच पूर्ण जागावाटपही जाहीर केलंय. यामुळे आजवरची घडीमें तोळा घडीमें मासा धर्तीची धरसोड टळली. आज वाटाघाटी रंगल्या, उद्या मोडल्या, परवा पुन्हा गळामिठी असल्या घालमेलीला मतदार उबगतात हे लोकसभा निवडणुकीत हग्यामार खाल्यानंतर का होईना पण विरोधकांना उमजलं असेल तर

स्वागतच करायला हवं.

दुसरी खास बात म्हणजे आघाडी केली तरी तिचे घटकपक्ष फार लंघळपणा न करता वेगळ्या निशाणावर नि वेगळ्या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. उगीच 'एक नेता–एक निशाण–एक खूण' असलं नाटक नाही. लोकांचा आता त्यावर विश्वास राहिलेला नाही. वैचारिक दृष्टीनं काय किंवा व्यावहारिक दृष्टिकोनातनं काय, असलं विलिनीकरण यशस्वी ठरत नाही, त्यामुळे त्याला याउप्पर लोकांचा प्रतिसाद मिळणार नाही. त्या मानानं लोकांना जुन्या पुलोद सरकारचा अनुभव बरा असल्यानं आघाडीच जास्त सयुंक्तिक वाटते. कांग्रेस आयच्या तिकीटवाटपाची अपेक्षित धुळवड एकीकडे चालू आहे. हे लक्षात घेता पुलोद ८५ ने सुरुवातीला तरी आघाडी घेतली आहे हे नक्की. कांग्रेसमध्ये पक्षांतर्गत गटबाजीला ऊत आलेला असताना पवार मात्र एरवी भांडणाऱ्या पक्षांची मोट बांधू शकले हे एकीकडे त्यांचं वैयक्तिक यश तर दुसरीकडे परिस्थितीच्या रेट्याचा परिणाम! काही झालं तरी, अगदीच एकतर्फी होईलसं वाटणारी महाराष्ट्रातली निवडणूक पुलोद ८५ रिंगणात उतरल्यामुळे रंगतदार होणार हे नक्की.

## कांग्रेस आयची डोकेदुखी

कांग्रेसकडे तिकीटेच्छूंची झुंबड उडणार हे भविष्य सांगायला काही कुणा कॉम्प्यूटरतज्ज्ञाची गरज नव्हती; पण तरीही प्रत्यक्षातली गर्दी शब्दशः बेसुमार होती आणि राजीवजींच्या नि त्यांच्या लाडक्या कॉम्प्यूटरच्यासुद्धा नियंत्रणाच्या कुवतीबाहेरची होती. एकेका जागेसाठी त्यांच्याकडे सरासरी शंभर इच्छुक आहेत. इच्छा नि अक्कल यांचे गोत्र क्वचितच जमतं एवढंच त्या कुंभमेळ्यातनं बोध घ्यायचा. राजीव गांधींनी त्यातल्यात्यात आपली चुणूक दाखवली ती उमेदवार निवडण्यासाठी दहा मार्गदर्शक सूचना जारी करून. त्यांच्या या टेन कमांडमेंटस् पक्षातल्या काही बड्या धेंडांना गैरसोयीच्या असल्यामुळे त्यांची धावपळ उडाली आहे. शालिनीताई पाटलांनी शंकरराव चव्हाणांना पत्र लिहून तिकिटाची भिक्षांदेही केली आहे. ही कालगती म्हणावी की गावरान विनोदबुद्धी हा एक प्रश्नच आहे. कांग्रेस मध्ये बंडखोरी होणार हे निश्चित आणि तिचं संख्यात्मक स्वरूप मोठं असेल असंही वाटतं. मात्र गुणात्मक फरक फार पडेलसं वाटत नाही. चार–दोन बंडखोर निवडून आल्यानं काही जगबूड येत नाही. एवढंच की पक्षांतरबंदी विधेयक संमत झालेलं आहे याची दखल बंडखोरांना घ्यावी लागेल. अपक्ष म्हणून निवडून यायचं आणि घटकाभर उंबरठ्याशी रेंगाळून मग मागल्यादारानं स्वगृही परतायचं हा हुकमी खेळ आता चालणार नाही.

## गुर्जर आणि कन्नडः सख्खे शेजारी

कांग्रेसची अवस्था थोड्याफार फरकानं सगळीकडे सारखीच आहे. त्यांच्या उमेदवारीचं चित्र अगदी स्पष्ट व्हायला दहा फेब्रुवारी उजाडेल; पण विरोधकांची तयारी मात्र महाराष्ट्रात आहे एवढी गुजरातेत नि कर्नाटकात नाही. दोन्ही ठिकाणी जागा वाटपाबद्दलची बोलणी फिसकटल्यात जमा आहेत. कर्नाटकात हेगडे–भाजप मधुचंद्र संपून मधू इथे अन् चंद्र तिथे अशी ताटातूट झाली आहे. दोनशे चोवीस जागांपैकी हेगड्यांचा देकार होता चोवीसचा तर भाजपाची मागणी चाळीसची होती. हेगड्यांना पुन्हा किरकोळ का होईना पण बहुमत मिळायची आशा आहे आणि तसं झालं तर भाजपाची कुबडी न घेता चालता यावं अशी त्यांची साहजिक इच्छा. उलट ते आपल्यावर अवलंबून राहणं भाजपला आवडेल.

परिणामः भाजप स्वतंत्रपणे शंभर सिटा लढवणार आहे असं पक्षाचे राज्याध्यक्ष बी. बी. शिवाप्पा यांनी जाहीर करून टाकलंय. पक्षाध्यक्ष बाजपेयी वा सरचिटणीस अडवानींशी बोलणं झालेलं नसलं तरी राज्यशाखेच्या इच्छेविरुद्ध जाऊन ते तडजोडीचा आदेश देणार नाहीत अशी आशाही शिवाप्पांना वाटते. दोन ओळींमधलं वाचायचा सराव असलेल्यांना या आशेमधली दमदाटी छान लक्षात येईल. तात्पर्य, आता कर्नाटकात तिरंगी लढती अटळ आहेत आणि रामकृष्ण हेगडे सरकारची कामगिरी बरी असली तरी कांग्रेस नि भाजप असा दुहेरी विरोध मोडून काढील इतक्या ताकदीची नाही.

गुजरातमध्येही जनता आणि भाजपानं एकला चालो रे धोरण स्वीकारलंय. गुजरात दोघांनाही आपला बालेकिल्ला वाटतो, त्यामुळे हे अटळ होतं. एकूण एकशे ब्याऐंशी जागांपैकी भाजपची मागणी पंचाहत्तरची तर जनताची एकशे पंधराची होती. त्यावर दोघेही अडून बसले होते. म्हणजे दमकिप आणि माजी मुख्यमंत्री बाबूभाई पटेल यांचा लोक स्वराज्य मंच या सारख्या छोट्या पक्षांना काही मायनस सीटस् मिळाल्या असत्या. बाबूभाईंना शरद पवारांचा रोल गुजरातीत करणं जमलं नाही. आता जनता पार्टी सगळ्या एकशेब्याऐंशी जागा लढवू म्हणते. 'नॉट फेल्युअर बट् लो एम इज क्राइम' म्हणतात, त्यांच्यावरचा हा गाढ विश्वास. भाजप शंभर जागा लढवील· एकशेसाठ असाही एक आकडा फुटला आहे, पण अवाजवी फुगीर वाटतो. तिकडे कांग्रेसमध्ये माधवसिंह सोळंकींचे सहा मंत्री आणि सव्वीस विद्यमान आमदार विनातिकीट राहणार असा रंग आहे.

## मध्य–आंध्रप्रदेशः वेगळ्या वाटा

मध्यप्रदेश हा कोणे एके काळी भाजपचा बालेकिल्ला होता. ऐंशी साली त्याचा पाया हादरला अन् चौऱ्याऐंशीच्या फेऱ्यात त्याची वीटन् वीट वाजवून घ्यावी अशी मोकळी झाली. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांना ग्वाल्हेरच्या लोकांनी घरी बसवलं. प्लास्टरात पाय, गुच्छात हातबांब कशाचा काही उपयोग झाला नाही. या पार्श्वभूमीवर मप्रभाजप सचिव कुशाभाऊ ठाकरे यांनी आपण सगळ्या तीनशेवीस जागा स्वतंत्रपणे लढवणार असं जाहीर केलंय. त्यातल्या वीस तरी जागा आपण जिंकणार आहोत की नाही ते मात्र त्यांनी मुरब्बीपणानं लपवून ठेवलं. इतर विरोधी पक्षांना आपण काही जागा देऊ केल्या होत्या; पण त्यांचा प्रतिसाद मिळाला नाही असंही त्यांनी कळवळून सांगितलं.

कांग्रेसची खरी सत्वपरीक्षा आहे ती आंध्रप्रदेशात. मागच्या विधानसभेपाठोपाठ त्यांनी लोकसभा निवडणुकीतही तेलगू देशमकडून खरपूस मार खाल्लेला आहे. सहा माजी केंद्रीय मंत्री रिकामे असले तरी राजीव गांधींनीच अपवाद केल्याखेरीज त्यांचं राज्यपातळीवर पुनर्वसन होणं शक्य नाही. औट-

मलपृष्ठ १ वर

# राजीव गांधींच्या कारभाराचा अन्वयार्थ

ॲड. रमन् देशपांडे

३१ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान इंदिरा गांधींची हत्या झाली. त्यांच्या हत्येनंतर आठ तासाच्या आत तरुण राजीव गांधींनी पंतप्रधानपदाची धुरा हाती घेतली. ज्या परिस्थितीत इंदिरा गांधींनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली त्यापेक्षा जास्त चिंताजनक व दोलायमान परिस्थिती राजीव गांधी पंतप्रधान झाले तेव्हा होती. इंदिराजींच्या वेळेस भारत पाकिस्तान युद्धातील विजयाच्या वलयानंतर झालेल्या ताश्कद कराराची पार्श्वभूमी होती. यावेळेस आसाम प्रश्नाचा तिढा तसाच राहिला होता. त्रिपुरापासून अरुणाचलपर्यंत, ईशान्येकडच्या राज्यात हिंसक कारवाया उफाळल्या होत्या. पेटलेल्या पंजाबप्रश्नामुळेच इंदिराजींची हत्या झाली होती. एशियाड, अलिप्तगट चळवळ आणि तिसऱ्या जगातील राष्ट्रांची नवीन अर्थव्यवस्थाविषयक चळवळ ( न्यू वर्ल्ड इकॉनॉमिक ऑर्डर ) व संज्ञापन–माध्यम संबंधातील बदल (न्यू वर्ल्ड इन्फर्मेशन ऑर्डर) या सर्व पार्श्वभूमीवर तिसऱ्या जगातील अविकसित राष्ट्रांचे लक्ष साहजिकच भारताकडे होते. अवघ्या चाळीस वर्षांचे राजीव गांधी या सर्व समस्यांचा सामना कसा करणार व जबाबदारी कशी पेलणार यावर उलटसुलट मते व्यक्त होत होती. जोडीला पक्षांतर्गत लाथाळ्यांनीही उग्र स्वरूप धारण केले होते. राजीव गांधी यात कितपत यशस्वी होतील याचे निश्चित उत्तर लगेच देता येण्यासारखे नाही; पण गेल्या दोन महिन्याच्या काळात त्यांनी ज्या पद्धतीने राज्यकारभार चालवला यावरून यापुढची दिशा व धोरणे काय असू शकतील याची झलक निश्चितपणे जाणवू शकते. बदल कोणते व कसे असतील हे सांगता येईल; पण परिणाम चांगले का वाईट होतील याविषयी मतप्रदर्शन करणे हे जरा घाईचेच ठरेल.

इंदिराजींच्या हत्येनंतर दिल्लीत शिखांवर हल्ले झाले. मीरत, कलकत्ता येथेही दंगली झाल्या. देशात यादवी सुरू होण्याची भीती अनाठायी होती, तरी चिंताजनक परिस्थिती मात्र निश्चितपणे निर्माण झाली होती. दिवसा अंत्यदर्शनास उपस्थिती, सकाळ–संध्याकाळ परदेशी पाहुण्यांशी चर्चा व रात्री दंगलग्रस्त भागात जातीने लक्ष घालून त्यांनी दंगल काबूत आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पोलीसप्रमुख पद्माकर गवईंची तातडीने बदली करून गृहसचिव वली यांना त्या जागी आणले. पंतप्रधान–सुरक्षा व्यवस्थेत अनेक बदल केले. सूर्यकांत जोग यांच्यासारखे तडफदार व जागच्याजागी निर्णय घेणारे अधिकारी यांची नियुक्ती केली. यामुळे असुरक्षिततेचे वातावरण काहीसे कमी झाले. रामनाथ काओंचा राजिनामा स्वीकारून गुप्तचर खात्यालाही त्यांनी आश्चर्याचा धक्का दिला. अर्थात पोलीस व गुप्तचर खात्यातील बदल्या व हलवाहलवीचे दूरगामी परिणाम नेमके काय होतील याचा अंदाज तातडीने वर्तविता येणे शक्य नाही; परंतु सर्वसामान्य माणसाला अवाक् करणारा कामाचा झपाटा व निर्णयक्षमता 'आईच्या' मृत्यूनंतरही त्यांनी दाखवला याचा मोठा वाटा त्यांना निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशात नक्की आहे.

## निवडणूक पर्व

राजीव गांधींनी केलेली निवडणुकीची घोषणा ही तितकी अनपेक्षित नव्हती. उमेदवारांच्या निवडीतून मात्र 'पुढचे बेत' सावधपणे पार पाडण्याची चुणुक त्यांनी दाखवली. अर्थात नवीन सामाजिक, आर्थिक, राजकीय धोरणास अनुसरून उमेदवार निवडताना पक्षांतर्गत समतोल बिघडू नये व महत्त्वाकांक्षी सुभेदारांना काटशह मिळावा याची जाणीवही त्यांनी स्पष्टपणे ठेवल्याचे जाणवते.

दिल्ली दंगलीत बदनाम झालेले धरमदास या सारख्या खासदारांना तिकिटे नाकारण्यात आली. कल्पनाथ रॉय, रामचंद्र रथ यासारखे संजयनिष्ठ वगळले; पण जगदीश टायटलर, मध्य प्रदेशातील कमलनाथ यासारख्या अनुक्रमे उपद्रवक्षम व कार्यक्षम संजयनिष्ठांना आवर्जून स्थान देऊन पक्षांतर्गत व पक्षाबाहेरील संजयनिष्ठात उभी फळी यशस्वीपणे पाडली.

जुन्या नव्या निष्ठावानांची साठमारी चालू असताना श्यामाचरण शुक्ला ( मध्यप्रदेश ), कृष्णचंद्र पंत (दिल्ली), सत्येंद्र नारायण सिन्हा (बिहार) यांना उमेदवारी जाहीर करून 'आयारामांनाही' चकीत केले. अंतुले, आदिक, चरणजित चनाना, सिद्धार्थ शंकर रे इत्यादी भ्रष्ट व महत्त्वाकांक्षी मंडळींना काटयासारखे बाजूला ठेवून 'मि. क्लीन' ही प्रतिमा अधिक गडद केली.

हरियानात बन्सीलाल, प. बंगालमध्ये प्रियरंजनदास मुन्शी, म. प्रदेशात सेठी व व्ही. सी. शुक्ला, गुजराथेत योगेंद्र मक्वाना, बिहारमध्ये अब्दुल गफूर, तामिळनाडूत शिवाजी गणेशन यासारख्या इच्छुक लोकांना किंवा त्यांच्या गटांना तुरळक प्रतिनिधित्व देऊन तेथील मुख्यमंत्री समर्थक व विरोधी गटांना पर्याय उभा केला.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे जॉर्ज फर्नांडीस, वाजपेयी, जेठमलानी, बहुगुणा या 'व्होट कॅचर्स' उमेदवारांविरुद्ध अत्यंत तरुण उमेदवार उभे करण्याचा जुगार खेळून तो संपूर्णपणे जिंकला.

हॉकी क्षेत्रातील अस्लम शेरखान, चित्र अभिनेते बच्चन व दत्त, नोकरशाहीतील नारायणन् व नटवरसिंग हे ताज्या दमाचे चेहरे निवडणुकीच्या रिंगणात आणून तरुण पिढी व नोकरशाहीच्या आशा फुलवल्या.

या निवडणुकीतील निकालाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे चरणसिंग, जगजीवनराम अपवाद वगळता बालानंदन, समर मुखर्जी (मार्क्स), त्रिदीब चौधरी (कॉं. स. प.), वाजपेयी, जेठमलानी, जोशी (भा. ज. प.), यमुनाप्रसाद शास्त्री, इरा सेझियन, समरेंद्र कुंडू, रतनसिंग राजदा, मधुभाई शहा, अब्दुल नझीर साब (जनता), चंद्रजित यादव (जनवादी) हे म्होरके साफ पराभूत झाले.

राजकीय पक्षांचे कार्यक्रम, तत्त्वे व जाहिरनामे यांवर निवडणुका तशा कधीच अवलंबून नसतात. भारतासारख्या अविकसित व परंपरावादी देशात तर त्या नक्कीच नसतात. या गोष्टी हेरून आणि मर्यादित शहरी व महानगरी लोकांवर दूरदर्शन व आकर्षक जाहिरातींचा मारा करून हवा तसा परिणाम साधण्यातही त्यांनी यश मिळवले. एकंदरीतच प्रचंड उलथापालथ न करता, सोयिस्कर बदल करणे, ते करताना 'कॅलक्युलेटेड रिस्क'

घेणे व याबरोबरच स्वतःच्या उज्ज्वल प्रतिमेची हाकाटी करणे हे तंत्र त्यांनी व्यवस्थित जोपासले.

आणि या बरोबरीने इंदिराजींच्या झपाटयाची आठवण करून देणारे झंझावाती दौरे, जमावाला अभिवादन, विरोधी पक्षात बुद्धिभेद व वृत्तपत्र माध्यमांशी सावध-संबंध यामुळे सर्वसामान्य जनतेत एक अपरिहार्य कुतूहल निर्माण करणेही त्यांना जमले. भारतीय जनतेची संस्कृतीनिष्ठ परंपरा ( म. प्रदेशात ८ संस्थानिक विजयी ) व तांत्रिक प्रगतीचे चमत्कार ( कॉम्प्युटर व दूरदर्शन ) यांचा बेमालूम मेळ घालत विखुरलेल्या विरोधकांचा, भावनेच्या भरात त्यांनी संपूर्ण पराभव केला.

### ३/४ बहुमतानंतर

पूर्वीच्या मंत्रिमंडळात प्रकाशचंद्र सेठींना जेव्हा वगळण्यात आले त्यावरून नवीन मंत्रिमंडळात कोणते मंत्री असणार नाहीत याची अंधुकशी कल्पना स्पष्ट झाली होती. प्रणव मुखर्जीचा अपवाद वगळता गनीखान, जाफर शरीफ, जगन्नाथ कौशल, विजय नवल पाटील हे मंत्रीगण वगळून पंतप्रधान राजीव गांधींनी अनेकांच्या अंदाजावर शिक्कामोर्तबच केले.

शंकरराव चव्हाण (गृह), व्ही. पी. सिंग (अर्थ) कृष्णचंद्र पंत ( शिक्षण ) हे केंद्रीय मंत्री कुशल प्रशासक म्हणून नावाजलेलेच आहेत. अशोक गेलहोत ( पर्यटन व नागरी विमान वाहतूक ) माधवराव शिंदे ( रेल्वे ), अरुण नेहरू ( उर्जा ) या तरुण नेत्यांना कर्तबगारीचे आव्हान दाखवायची संधी दिली. बन्सीलाल यांच्याकडे केंद्रीय रेल्वे खाते देऊन त्यांनी अपेक्षाभंग मात्र केला. चंदुलाल चंद्राकार व अरुण नेहरू या सरचिटणिसांना मंत्रीपद देऊन पक्षसंघटनेत बदल करण्याची पूर्वतयारी केली. नटवरसिंग व नारायणन् या माजी नोकरशहांना मंत्री करून नव्यांना संधी देतानाच घोटाळे होणार नाहीत याचीही दक्षता घेतली. या सर्व घडामोडींचा जनसामान्यांच्या दृष्टिकोनातून आढावा घेतला तर नाविन्य वा बदल हा वरपांगी पातळीववर का. होईना; पण निश्चितपणे जाणवण्यासारखा आहे. हे सर्व निर्णय घेताना होणारे परिणाम व अपेक्षित धोरणे याचा ताळमेळ घालण्यासाठी बराच खोलवर विचार केल्याचेही जाणवते. एच. के. एल. भगत यांच्यासारखा उतावळ्या व अपरिपक्व मंत्र्याकडून माहिती व नभोवाणी खाते काढून त्या जागी बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांच्यासारखा सभ्य, सुसंस्कृत व अजातशत्रू नेमून, भावी काळात विरोध न होता, पक्ष व स्वतःची प्रतिमा घट्ट करण्याची चलाखीही त्यांनी दाखवली आहे.

### नवीन धोरणे–घोषणा

पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यावर तातडीने पंजाब प्रकरणी शंकरराव चव्हाण, नरसिंहराव, के. सी. पंत यांच्या त्रिसदस्य समितीची नेमणूक केली. जी. पार्थसारथी या परराष्ट्र व्यवहार धोरण समितीच्या अध्यक्षांकडे लालडेंगांशी वाटाघाटी करण्याचे अधिकार देऊन मिझो बंडखोरांची चिंता तात्पुरती मिटवली. श्रीलंकेतील हायकमिशनर चतवाल यांना तातडीने सल्ला-मसलतीसाठी बोलावून तामिळ वांशिक प्रश्नाची उकल करण्याची तयारी दाखवली. एच. के. एल. भगत यांना विरोधी पक्ष नेत्यांकडे पाठवून विरोधकांना ' आदर व सहकार्याचे ' आवाहन केले.

सर्वसामान्य भारतीय अंधश्रद्ध व चमत्कारांवर विश्वास ठेवणारा आहे. राजकर्त्यांचा काळाबाजार किंवा अनैतिकता याचा फारसा बाऊ केला जात नाही. धाडकन् निर्णय घेणे, तो अंमलात आणणे व ' रिझल्ट ' देणे या गोष्टी शेवटी महत्त्वाच्या ठरतात, हे लक्षात घेऊनच हे सर्व निर्णय घेतल्याचे स्पष्टपणे जाणवते. उद्योग, वाणिज्य, पर्यटन, अन्न व नागरी पुरवठा खात्यांच्या बैठकीत मंत्री व सचिवांशी चर्चा करून मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी शपथविधी घेतल्यावर दोन दिवसातच पार पाडले.

आयात–निर्यात धोरणात लवचिकता आणणे, राजधानी दिल्ली व राज्यांच्या राजधान्यांत कॉम्प्युटर यंत्रणा बसविणे, नियोजन मंडळात आमुलाग्र बदल करणे ही त्यांची ताजी धोरणे जरा अभ्यासाने तपासण्यासारखी आहेत. आतापर्यंतचे कागदोपत्री व्यवहार, ठरलेले तज्ज्ञ यांच्याऐवजी व्यवहारी नोकरशाही सचिव, तांत्रिक यंत्रणा या गोष्टींवर स्पष्टपणे जाणवेल इतका भर दिला जात आहे.

शिक्षण, तंत्रज्ञान उद्योग या क्षेत्रात कमालीचे बदल करण्याची नवीन पंतप्रधानांची इच्छा ठळकपणे दिसण्यासारखी आहे. रिझर्व बँकेचे नवे गव्हर्नर म्हणून एम्. एन. मल्होत्रा यांची नियुक्ती व नियोजन मंडळात अबिद हुसैन, डॉ. भाया यासारखे उजव्या धोरणांचे उघड पुरस्कर्ते वापरून भारतास तंत्र-उद्योगप्रधान निर्मितीकडे नेण्याचा कलही लक्षात येतो. प्रामुख्याने कृषीप्रधान असलेल्या या देशाचे कृषी व ग्रामविकास खाते बुटासिंग यासारख्या अननुभवी व फारशी कर्तबगारी अद्यापपर्यंत न दाखवलेल्या मंत्र्याकडे सोपवणे यातच सगळे काही आलेले आहे. परराष्ट्र धोरणात नजिकच्या भविष्यकाळात तरी महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता नाही. अंदाजपत्रकी अधिवेशन व मे–जूनमधील नियोजित फ्रान्स–अमेरिका भेट यानंतरच हे बदल दिसू लागतील. नोकरशहा, तंत्रज्ञ, उगवते महत्त्वाकांक्षी उद्योगपती, नवीन चेहरे बघता भारताचे परराष्ट्रीय धोरण यापुढे पूर्वीप्रमाणे तथाकथित समाजवादी अगर रशियाकडे काहीसा झुकाव असलेले राहीलच असे मात्र छातीठोकपणे म्हणता येणार नाही.

एकंदरीतच दोन महिन्यात राजीव गांधींनी जी पाऊले उचलली त्याचा हा एक धावता आढावा आहे. एककल्ली आणि स्वतःचे निर्णय लादणाऱ्या इंदिरा गांधींच्या प्रतिमेच्या पार्श्वभूमीवर राजीव गांधी इतरांची मते व सल्ले निदान ऐकून तरी घेतात असे सर्वसाधारण मत आहे.

भारताचे भविष्यकालीन चित्र कसे असावे यासंबंधी राजीव गांधींच्या कल्पना इंदिरा गांधींपेक्षा निश्चितपणे वेगळ्या व नव्या आहेत. त्या दृष्टीने यंत्रणा व चेहरे ( आर. के. धवन यांचा राजिनामा ) यांची साफसफाई सुरू झाली आहे याचे परिणाम चांगले–वाईट होतील, होणार नाहीत ही गोष्ट अलाहिदा. **खेडी व शहरे यातील तफावत वाढणार हेच एकमेव ठाम विधान या संदर्भात करता येईल.** व्यवस्था मुळापासून बदलणे हाच समतेचा अंतिम उपाय आहे हा सिद्धांत आहे; पण जनता उद्याचा दिवस सुखाचा जाईल या आशेने पंतप्रधान राजीव गांधींच्या पुढील कारभाराबद्दल उत्सुक आहे यात शंकाच नाही. संसदेचे अंदाजपत्रकीय अधिवेशन, विधानसभा निवडणुका, मंत्रिमंडळाची वाढ व पुनर्रचना व परदेशी भेटीतील करार व चर्चा यामुळे महिन्यातच कळेल की राजीव गांधींचा मार्ग नेमका कोणता ? चूक का बरोबर !

□

ह्या ना त्या निमित्ताने

# अलेक्झॅन्डर आणि अलेक्झॅन्डर्स

फिरोझ रानडे

'असे सगळे सरकारी अधिकारी असले पाहिजेत' राधाचे हे वाक्य नुसतेच वाचले तर अगदी साधे सरळ वाटावे; पण तिला हे बोलताना कोणी पाहिले असते तर ते श्यामला टोचण्याकरताच बोलले गेले आहे हे त्याच्याही लक्षात आले असते.

सध्या घरोघर चाललेल्या विषयाची चर्चा श्याम–राधाचे घरात चालली होती. आज सभेचा कोरम अगदी पुरा होता. म्हणजे दोन कामत, एक बर्वे व दोन कर्वे. नुसती चर्चा चालली होती, असे नाही तर अगदी तावातावाने चालली होती. विषय होता अर्थातच दिल्लीला सध्या उजेडात आलेली हेरगिरीची प्रकरणे, त्याबद्दल झालेल्या झझनावारी अटका राजीव गांधींनी आपण होऊन दिलेले लोकसभेतले स्टेटमेंट, गृहमंत्र्यांनी वेळोवेळी दिलेली माहिती वगैरे वगैरे.

चर्चा अर्थातच लाटे–लाटेने होत होती. त्यात प्रथम कौतुक होते, राग होता, थोडा अभिमान होता, थोडी काळजी वाटत होती व परत कौतुक–लाट.

कौतुक लाटेचा फायदा नेहमीप्रमाणेच प्रथम राजीवजींना मिळाला.

'असा पंतप्रधान पाहिजे.' कौतुक कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्य सैनिक बर्वे ह्यांनी केली व त्याला श्याम सोडून बाकी सगळ्यांनी मुंडी हलवून संमती दिली.

'असा म्हणजे कसा?' श्यामने मुंडी न हलवता प्रश्न केला. फक्त साहेबांच्याच म्हणण्याला श्याम काही प्रति–प्रश्न न करता मुंडी हलवत असे. बाकी सगळ्या बाबतीत तो आपले संपूर्ण समाधान झाल्याशिवाय मुंडी म्हणून हलवत नसे.

'आता सांगा ! ह्यांना 'असा' म्हणजे 'कसा' ते.' राधा आपला राग मोठ्या कष्टाने आवरून म्हणाली. 'सगळ्या जगाला माहित आहे की असा म्हणजे राजीवजीं सारखा पंतप्रधान पाहिजे ते; पण त्यांचा आपला 'कसा?' म्हणून प्रश्न आहेच ! ह्यांचे आपले नेहमी असेच असते. परत बाकी सगळ्यांनी मुंडी हलवली.

'अगं बाकी लोकांना मुंडी हलवण्यात काही जबाबदारी वाटत नाही. काही झालं तरी मी मध्यवर्ती सरकारचा राजपत्रित अधिकारी आहे. मी संपूर्ण माहिती झाल्याशिवाय होकारार्थी मुंडी कधी हलवणार नाही.'

श्यामच्या सोसायटीत त्याच्यापेक्षा जास्त प्राप्ती असलेले पुष्कळ लोक होते. बर्वे काय स्वातंत्र्यसैनिक होते, कर्वे कोणा वर्तमानपत्राच्या कचेरीत होते व कामत बँकेमध्ये होता. श्यामच फक्त राज–पत्रित अधिकारी होता, त्याचे उट्टे तो वेळोवेळी काढत असे.

राधा रागावली असली तरी स्वा. सै. बर्व्यांनी राग, लोभ, काम वगैरे विकारावर विजय मिळवला होता. ते म्हणाले 'राधाताई तुम्ही अशा रागावू नका. मी श्यामरावना 'असा' म्हणजे 'कसा' पंतप्रधान पाहिजे ते सांगतो.'

'आता हे बघा श्यामराव' बर्वे श्यामकडे वळून म्हणाले. 'हे सगळे प्रकरण मोठे दुर्दैवी आहे तरी त्याची माहिती मिळताच राजीवजींनी लोकसभेत त्याबद्दल स्टेटमेंट दिले ना?'

'त्यांना कोणी विचारले होते?' श्यामने कामच काय पण क्रोधही जिंकला नव्हता. त्याने रागाने प्रश्न केला.

'कोणी विचारायला कशाला पाहिजे? लोकशाहीत सगळे काही कळण्याचा जनतेचा अधिकार आहे.' आता श्याम एका बाजूला व दुसरे एका बाजूला अशी रस्सीखेच सुरू झाली होती.

'अरे पण ही काही क्रिकेट मॅच का आहे? की सांगताहेत आपले सारखे किती धावा झाल्या व किती बाद आहेत म्हणून?'

'म्हणजे तुम्हाला काय म्हणायचं आहे की त्यांनी ह्या प्रकरणाबद्दल एक चक्कार शब्द काढायला नको होता?'

'नाही माहिती सांगायला पाहिजे, नाही असे नाही. पण केव्हा? सगळे काही आटोक्यात आल्यावर. इतक्या तातडीने देशाचा पंतप्रधान एखादी माहिती, तीही अर्धवट सांगतो ह्याचा सर्वसामान्य जनतेवर काय परिणाम होतो ह्याचा आधी विचार करायला नको?'

'काय परिणाम होतो हो एवढा?'

'सरकारवर विश्वास' नावाची काही गोष्ट आहे की नाही? आता आपण सुशिक्षित आहोत. अशी हेरगिरी अमेरिका, रशिया, इंग्लंडमध्ये पण चालते हे आपल्याला ठाऊक आहे. इंग्लंडच्या राणीचा कलाविषयक म्हणून पंधरा वर्षे काम करणाराच मुळी रशियाचा हेर होता! तो प्रोफ्युमो का कोण. त्याची व रशियन वकिलाची एकच 'बाई' होती.

'तेव्हा अशा गोष्टी होतातच हे आपण समजू शकतो; पण सर्वसामान्य माणसाला धक्का बसतो, तो म्हणतो 'हे असेच चालते?' असा धक्का बसणं फार वाईट आहे.'

हे सगळे चालले होते तर कर्व्यांचा काही वेगळाच विचार चालला होता. त्यांनी 'काहो हे खेर म्हणजेच आपल्या पैकीच का हो?' म्हणून सर्वांना उद्देशून प्रश्न टाकला.

काही दिवसापूर्वी कर्व्यांचा हा 'खेर म्हणजे आपल्याच पैकी का?' हा प्रश्न खुळचासारखा वाटला असता. महाराष्ट्राचे म्हणजे त्या वेळच्या मुंबई प्रांताचे पहिले मुख्यमंत्रीच मुळी बाळासाहेब खेर होते. तेव्हा त्यांच्या त्या 'खेर' प्रश्नाला तसा काही अर्थ नव्हता.

पण सध्याच्या परिस्थितीत त्या प्रश्नाला फार अर्थ प्राप्त झाला होता. हेरगिरीबाबत पकडलेल्या अधिकाऱ्यांत कोणी खेर नावाचा होता. कर्व्यांचा प्रश्न त्याला उद्देशून होता हे सगळ्यांच्या लक्षात आले.

आता हा खेर आपल्यातला म्हणजे मराठी ठरला असता तर कर्व्यांचे पारडे वर गेले असते. कारण देशप्रेमाच्या बाबतीत मराठी लोक अगदी नंबर एकचे असतात असा त्यांचा विश्वास!' त्या विश्वासाला हा खेर मराठी

असता तर तडा गेला असता.

'नाही हो. त्याच्या नावाच्या अद्याक्षरावरून तो काही मराठी वाटत नाही. काही मराठी कुटुंबं पेशवाईत व त्याच्या आधी उत्तरेत गेली होती. जसे आपल्या गोविंद वल्लभ पंतांची फॅमिली आहे. हे खेर कुटुंब पण त्यातले असावे. पण आता त्यांना मराठी म्हणणे योग्य होणार नाही.'

ह्या हेरगिरीत सापडलेला कोणी खेर आपल्यासारखा मराठी नाही हे सगळ्यांनी एकमताने मान्य केले व सुटकेचा निश्वास टाकला. आणि ह्या देशद्रोह्यांच्या कटात आपला कोणीही मराठी बांधव नाही ह्याचा त्या सगळ्यांना अभिमान, व आनंद वाटत होता.

चर्चा पुढे चालू रहाणार होती. कामत हे तरुण कुटुंब. आता त्यांना खरोखरीची झोप येत होती की नाही कोणास ठाऊक, पण ते निमित्त करून उठले. श्याम त्यांना पोहोचवायला गेला. तो दार लावून परत येईपर्यंत कर्वे बर्व्यांना काही तरी कुजबुजत सांगत होते.

'काय हो, काही विशेष?' श्यामची उत्सुकता चाळवली गेली होती,

'नाही, मी म्हणत होतो की हे खरे मराठी असले तरी फार फरक पडत नाही.' कर्वे मोठ्ठा महत्वाचा मुद्दा सांगतो आहोत ह्या स्वरात सांगू लागले.

'फरक कसा पडत नाही?' श्यामला त्याच्या बोलण्याचा बोध होईना.

'अहो हे खरे मराठी असले तरी आपल्या पैकी नाहीत, खरे म्हणजे कऱ्हाडे! आपली मंडळी असले देशद्रोही कृत्य कधीही करणार नाहीत!' कर्वे मोठ्या आत्मविश्वासाने व अभिमानाने सांगत होते.

माणूस स्वत:चे खोटे खोटे समाधान कसे करून घेतो पहा. खेर जरी यु. पी. वा एम. पी. चा असला तरी त्याची आपल्या सगळ्यांना लाज वाटायला पाहिजे व येथे तर कर्वे तो 'आपल्या' जातीचा नाही ह्याचाच अभिमान बाळगत आहेत!

आता गाडी परत रूळावर आली होती. श्याम अजूनी म्हणत होता की सर्व माहिती हाती आली व सगळ्यांचा पक्का बंदोबस्त झाल्यावरून पंतप्रधानांनी ह्याबद्दलची माहिती द्यायला हवी होती.'

'पण वर्तमानपत्रात सगळी बितंबातमी येत असताना सरकारला चूप बसून कसे चालले असते?

'राधाताई म्हणताहेत ते बरोबर आहे.' बर्व्यांनी राधाच्या प्रश्नांना दुजोरा दिला.

'पण ह्या वर्तमानपत्रवाल्यांना इतकी माहिती देत कोण? सरकारच!'

'काय बोलता आहात फलाणे साहेब?' आता कर्वेबाईंनाही चूप रहावेना.

'हे बघा वर्तमानपत्रवाल्यांना पंतप्रधानांच्या कचेरीतल्या वा संरक्षण मंत्रालयातल्या वा राष्ट्रपतींच्या कचेरीतल्या कोणा माणसाला पकडले आहे एवढे कळेल पण त्या माणसाचे संपूर्ण नाव, त्याचा हुद्दा वगैरे गोष्टी अगदी बरोबरच्या बरोबर वर्तमानपत्र वाल्यांना कळले कसे? सरकारने दिल्या शिवाय?'

'अहो बितंबातम्या काढण्याचे वर्तमानपत्रांचे कामच आहे,'

'व ती मिळू न देणे हे सरकारचे वा सरकारच्या अधिकाऱ्यांचे नुसते कामच नाही तर कर्तव्य आहे. सरकारची इच्छा नसती तर हे सगळे बाहेर आलेच नसते. आता ते दोघं फ्रेंच हिंदुस्थान सोडून निघून गेले की नाही?' सरकार चूप राहिले असते तर त्या दोघांवर पाळत ठेऊन जास्त माहिती मिळाली असती.,

'बरं मग तुम्हाला म्हणायचे तरी काय आहे?' कधी नव्हतं ते राधा व कर्वेबाईंत एकवाक्यता व त्यामुळे एक प्रश्नता आली होती.

'मला वाटते आहे हे चांगले होत नाही आहे. जनतेला विश्वासात घ्या पण केव्हा? विचार करा आज जर इंदिराजी असत्या तर त्यांनी एक शब्द बाहेर येऊ दिला असता? काही म्हणा राज्य-यंत्र बाईंनीच चालवावे. हे प्रकरण सरळ व साधे नाही,'

आता दोन कर्वे, एक बर्वे व एक राधा ह्यांना काय बोलावे ते कळेना; पण राधा अशी सहजपणे हार मानणारी नव्हती.

'बाकी काही असो. त्या अलेक्झेंडरने स्वाभिमानाने राजिनामा दिला की नाही? वा!

काय छान tradition पाडली.' राधा कौतुकाने म्हणाली

'पण त्यांनी काय म्हणून राजिनामा दिला व द्यावयाचा?

'परत वाकड्यात शिरायला लागलात?' आता कर्व्यांना पण रहावेना.

'अहो मी वाकड्यात शिरत नाही आहे; पण मला हे सांगा, सरकारी नोकरांनी काय म्हणून राजिनामा द्यावयाचा?' परत वाकड्यात शिरणारा श्याम म्हणाला.

'काय म्हणून म्हणजे?' आता स्वातंत्र्य सैनिक बर्वे पुढे सरसावले.' ही तर आपल्या देशाची व नोकरशाहीची उज्वल परंपरा आहे. भले त्या अलेक्झेंडरने काही का केले नसे ना, त्याला आपली नैतिक जबाबदारी वाटली. तुमच्या भाषेत म्हणजे moral responsibility वाटली व दिला पठ्ठ्याने राजिनामा.

'अहो प्रश्न जर moral responsibility तुमच्या शब्दात नैतिक जबाबदारीचा असेल तर राजिनामा तुमच्या राजीवजींनी, राष्ट्रपतीजींनी वा निदान प्रधानजींनी तरी द्यायला हवा होता. एवढे मोठे प्रकरण झाले, शेकडो लोक त्यात गोवले गेले पण आपली नैतिक जबाबदारी फक्त पंतप्रधानाच्या सेक्रेटरीला वाटावी ना?

'मागे काही रेल्वे अपघात झाला होता तर नैतिक जबाबदारी समजून लाल बहादूर शास्त्रींनी व एकदा बजेट फुटलं कोणा छापखान्यातल्या मॅनेजरकडून तर आपल्या चिंतामणराव देशमुखांनी नैतिक जबाबदारी समजून राजिनामा दिला होता! आठवतय तुम्हाला?

'इंग्लंडमध्ये तो संरक्षण मंत्री प्रोफिम्यो का कोण काही हेरगिरीत सापडला तर पंतप्रधान मॅकमिलनने राजिनामा दिला होता! फक्त नैतिक जबाबदारी समजून!'

'हिंदुस्थानात फक्त एका अलेक्झेंडरला आपली नैतिक जबाबदारी जाणवते. बाकी इतके ढेरभर अलेक्झेंडर्स काय करत असतात?'

## पुरंदरचे निवडणूक वार्तापत्र

# सामाजिक कार्यकर्ता आणि राजकारण वेगळे झाल्यामुळेच आजची दुर्दशा

विलासराव साळुंखे, पाणीपंचायत

लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर अनेक प्रश्न गेल्या महिन्याभरात चर्चेला आले.प्रामुख्याने संघासारख्या संस्थांनी राजकारणात भाग घ्यावा का घेऊ नये इथपासून सामाजिक कार्यकर्त्यांनी राजकारणात भाग घेऊच नये [अशा टोकापर्यंत. 'पाणीपंचायत' आणि त्याचे विलासराव साळुंखे हे असेच राजकारणापासून आलिप्त असलेले कार्यकर्ते. अचानक त्यांनी याही परिस्थितीत विधानसभेची निवडणूक लढविण्याची घोषणा केली आणि अनेकांच्या मनात पुनः तोच प्रश्न आला 'विलासराव तुम्ही......!'

लोकसभेच्या विजयापाठोपाठच विधानसभांच्या निवडणुका येणार हे निश्चित होतेच. त्याप्रमाणे सर्वच पक्षांनी विधानसभेच्या निवडणुकांच्या तयारीला सुरुवातही केली होती. हा अंक हातात पडेपर्यंत उमेदवार निश्चित होऊन प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवात झाली असेल. बारामती लोकसभा मतदार संघातील पुरंदर तालुक्याची निवडणूक या खेपेला जरा वेगळेपणाने रंगणार अशी चिन्हं आहेत. एकतर हा मतदार संघ जनतापक्षाचा – दादासाहेब जाधवरावांचा. मागच्या ८० च्या निवडणुकीत अरस कॉंग्रेसच्या (आताच्या समाजवादी कॉंग्रेसच्या) कुंजीर यांनी जाधवरावांकडून ही जागा जिंकून घेतली; परंतु पुढे कुंजीरांनी अरस कॉंग्रेसला रामराम ठोकला आणि 'आय' मध्ये प्रवेश केला. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत हा मतदार संघ समाजवादी कॉंग्रेसच्या मागे उभा राहिला ! जवळ जवळ अठ्ठावीस हजारांची आघाडी देऊन. यावेळी जाधवराव हे सुद्धा पवारांच्या मागे प्रचारार्थ उभे होते.

आता पवारांचा पाठिंबा जाधवरावांना राहील असा अंदाज आहे. तसे झाले तर स. कॉंग्रेसचे पाठीराखे जाधवरावांच्या मागे जाणार नाहीत. सध्या आयमध्ये असणाऱ्या कुंजिरांना पुनः तिकिट मिळेल कारण ते दादांच्या गटाचे म्हणून ओळखले जातात. त्यांच्यावर पक्षांतरामुळे तालुका नाराज आहे. त्यांना अरस कॉंग्रेसची म्हणजेच स. कॉंग्रेसची मते पडणार नाहीत. तसेच आय कॉंग्रेसही या तालुक्यात तशी दुर्बलच. त्यांचे आणि कुंजिरांचेही पक्ष प्रवेशानंतर तितकेसे जमलेले नाही. त्यामुळे पुरंदरचा मतदार हा या खेपेलाही वेगळाच निर्णय घेणार की काय अशी परिस्थिती आहे. जाधवरावांना एकमुखी शरद पवार आणि डाव्या आघाडीचा पाठिंबा राहूनही काही वेगळेच चित्र दिसणार आहे. जाधवरावांना ही निवडणुक तितकीशी सहज सोपी जाणार नाही असे वारे आहेत.

ही परिस्थिती निर्माण व्हायला अनेक कारणे आहेत त्यापैकी काही आपण पाहिली. पण मुख्य कारण आहे, पुरंदरमध्ये नव्याने उभी राहिलेली तिसरी शक्ति–'पाणी पंचायत !' दुष्काळी पुरंदरचा कायापालट करण्याचा संकल्प सोडून 'पाणी पंचायत' आणि त्याचे विलासराव साळुंखे हे गेली बारा वर्षे या भागात पुरंदरचा पाण्याचा प्रश्न हाताळत आहेत. पाण्याचे समान वाटप 'या तत्त्वावर विलासरावांनी पाणीपंचायत ही कृतीशील संघटना–संस्था उभी केली आहे.

हडपसरच्या औद्योगिक वसाहतीतील एक यशस्वी उद्योजक. त्र्याहत्तरच्या दुष्काळात त्यांनी पुरंदरमध्ये खडी फोडणारे स्त्री-पुरुष बांधव पाहिले, पाण्या अभावी दुर्दशेला पोचलेली शेती– उध्वस्त संसार पाहिले आणि आपल्या बांधवांचा विकास करण्याचा संकल्प त्यांनी मनाशी सोडला आणि त्यांच्या सुविद्य पत्नी कल्पनाताई यांच्यासह नायगावच्या ओसाड माळरानावर त्यांनी मुक्काम ठेवला. गवतही पुरेसे न उगवणाऱ्या माळरानाचे रात्रंदिवस खपून त्यांनी नंदनवनात रुपांतर केले. अनेक प्रयोग करून त्यांनी पावसाच्या पडणाऱ्या पाण्याचा पुरेपूर लाभ उठविण्याचे ठरवून नायगावचा कायापालट केला. गावोगावच्या शेतकऱ्यांना आणून, आपला यशस्वी प्रयोग दाखवून पाण्याच्या समान वाटपाचे 'अर्धाएकर' पाण्याचे तत्व त्यांना समजावून सांगितले. सुरुवातीला न पटणारी अवास्तव वाटणारी कल्पनाच आज अनेक गावातील असंख्य शेतकरी प्रत्यक्षात राबवीत आहेत.

माणूसच्या वाचकांना विलासराव आणि कल्पनाताई हे नवीन नाहीत. म्हणून त्यांच्या कार्याचा अल्पसा परिचय करून दिला.

### निवडणुकीच्या रिंगणात

पाणी पंचायतीने 'राष्ट्रीय पाणी पंचायत' या नावाचा पक्ष स्थापन केला आणि ही निवडणूक पुरंदर तालुक्यापुरती लढवायचे ठरविले आणि सर्वत्र एकच खळबळ माजली. विलासरावांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांचा

मित्रपरिवार मोठा. त्यांच्या या निर्णयाने अनेकांच्या मनात शंकेचे वादळ उठले. काहींना वाटले विलासरावांना हा नसता उद्योग कुणी करायला सांगितला ? त्यांच्या मित्रमंडळीत चर्चा सुरू झाली. विलासरावांचा हा निर्णय चूक की बरोबर...

या संबंधात विलासरावांशी प्रत्यक्ष संपर्क साधावा म्हणून गेलो असता ते प्रत्यक्ष प्रचारासाठी बाहेर पडण्याच्या तयारीत दिसले. बरोबर कल्पनाताईही होत्या. प्रचाराला सुरुवात होऊन आठ दिवस झाले होते. अद्याप इतर उमेदवार ठरायचे होते, तर विलासरावांनी जवळ जवळ अर्धा तालुका उरकत आणला होता. लोकांच्या मनातील शंकांना उत्तरे देत, पाणीपंचायतीची भूमिका समजावून देत हे दोघे पती-पत्नी गावोगाव हिंडत होते. विविध पक्षांचे कार्यकर्ते त्यांना येऊन मिळत होते. जनता, स. काँग्रेस, आय काँग्रेसचे सरपंच– सभासद पाणीपंचायतीचा प्रचार करीत होते. आम्ही कुठल्याही पक्षांचे असलो तरी विलासराव आमचे आहेत, पुरंदरचे आहेत ही भावना त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. पुरंदरच्या तहानल्या शेतीला त्यांनी पाणी मिळवून दिलेय. गाव सोडून मुंबईत पळणाऱ्या शेतकऱ्याला त्यांच्या प्रयोगांनी दिलासा मिळालाय. मुंबईहून शेतकरी आपल्या गावी परतू लागलाय. सैतानचौकी परिसरातील दहा हजार पुरंदरवासीयांच्या मनात या पुरंदरच्या शिलेदाराविषयी नितांत आदर वसतोय. विलासराव निवडणूक लढविणार म्हटल्यावर त्यांच्यात उत्साही संचारलाय. आजवर आम्ही अनेकांना निवडून पाठविले. आता आमच्या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणाऱ्या विलासरावांना निवडून पाठविणार असा निर्धार त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होता.

समाजवादी काँग्रेसचे एक सरपंच म्हणाले, ‘ जनताची काही मते विलासरावांना पडतील ’ पूर्वीच्या समाजवादी पक्षातील ही मते. तसेच समाजवादी काँग्रेसची मोठ्या प्रमाणात साळुंख्यांनाच मते पडतील. आता पाणीपंचायतीने पवारांचा प्रचार केला होता. पाणीपंचायत आणि स. काँग्रेस आणि प्रत्यक्ष संपर्क यावर मतदान होईल. शिवाय विलासरावांच्या एक टक्का सुद्धा कार्य इतर कुणाचेच नसल्यामुळे विलासरावांचा प्रभाव अधिक पडेल. ’

काही ठिकाणी उघडपणे तर काही ठिकाणी अप्रत्यक्षरीत्या प्रचार कार्य चालू आहे. वाघापूर हे सध्याचे आमदार कुंजीर यांचे गाव. त्याठिकाणी झालेल्या सभेत सरपंच––उपसरपंच यांच्यासह ग्रामस्थांनी मदतीचे आश्वासन दिले आणि प्रचार कार्यास सुरुवात केली. जागोजागी महिला–शेतकरी हाच विषय मांडताना दिसत होती.

मामुडी गावातील सभेस जवळ जवळ चार–पाचशेचा समुदाय होता. पिंपरीची सभा अशीच झाली. सर्वत्र जाणकार मंडळी काम करताना दिसत होती. ‘आमचा पक्ष कोणताही असला तरी आमचे उमेदवार विलासराव हेच आहेत ! ’ असे सगळे म्हणत होते.

मी जसजसा आत जाऊ लागलो तसतसे हे चित्र अधिक स्पष्ट दिसू लागले.

या परिस्थितीचे कारण पाणीपंचायतीने निरपेक्षतेने सोडविलेला पाण्याचा प्रश्न. शेतकऱ्यांचे आजवर प्रतिनिधी खूप निवडून गेले. परंतु शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रश्नावर कुणी तोंड उघडले नाही. सासवडला किर्लोस्कर कारखाना आला. आता आणिक छोटे–मोठे कारखाने येतील, शेतकऱ्यांची मुले तिथे कामाला लागतील; पण शेती मात्र पाण्याअभावी पडिक पडून राहील.

पाणी पंचायतीने नीरा नदीचे बारमाही पाणी कऱ्हेच्या पात्रात सोडून त्यावर छोटेछोटे बंधारे घालून पाणी शेतीला द्यायची योजना मांडली; पण शासनाचे त्याकडे दुर्लक्षच झालेय. मोठ्या धरणांचा खर्च मोठा. पाण्याखाली जमीन मोठी जाते. कॅनॉलचा खर्च मोठा. त्यामानाने पावसाळी पाण्यावरची ओढ्यांवर बांधलेली धरणे शेतीस उपयुक्त ठरतील.

ग्रामीण भागातील सर्व प्रश्नांच्या मुळाशी पाणी प्रश्न आहे. पाण्याचे साठे कसे करावेत, त्याचा समान वापर कसा करावा याचे सूत्र पाणीपंचायतीने प्रत्यक्षात आणून दाखविल्याने त्याचा फायदा शेतकऱ्यांना झालाय.

महाराष्ट्रातील लागवडीखालील जमिनींपैकी १½% जमीन उसाखाली आहे. मात्र ८०% पाणी उसाला वापरले जाते. त्यामुळे मोठ्या योजनांचा लाभ सामान्य शेतकऱ्यास होत नाही. त्यासाठी ‘ माणसी अर्धा एकर पाणी ’ या सूत्राने पाणी वाटप झाल्यास



काम करायला निवडूनच जावं लागतं ? –विलासराव

¤

सर्वांचे मोठे प्रश्न सुटतील; पण हे करणार कोण...?

त्यासाठी पाणी पंचायत !

विलासरावांशी गप्पा मारता मारता पुरंदरचे चित्र उभे रहात होते. विविध प्रश्न मनात घेऊन विलासरावांची भेट घेतली. कल्पनाताई समवेत होत्याच.

बुटके, काळेसावळे, साधे भाव डोळ्यात असलेले, स्वच्छ खादीचे कपडे घातलेले, चेहऱ्यावर खुरटी पण भरघोस दाढी असलेले विलासराव अत्यंत साधे वाटले. बोलणेही हळहळू समजुत काढल्यासारखे. अधूनमधून तुकोबाराम, ज्ञानेश्वर, रामदासांचे अभंग दाखल्यादाखल देत गप्पा चालल्या होत्या. मी त्यांना मनातला प्रश्न विचारला. दोनतीनदा हा प्रश्न वेगवेगळ्या तऱ्हेने विचारून झाल्यावरही निवडणुकीत उतरण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नव्हते.

‘विलासराव आपण तर पूर्वी हे कार्य स्वीकारताना आवर्जून या कार्याचा आणि निवडणुकांचा काही एक संबंध नाही असे म्हणत होतात. मग आता निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे खास कारण कोणते ? की जे त्यावेळी नव्हते आणि आता आहे किंवा निर्माण झाले ?’

विलासराव थोडे विचार करते झाले. आणि म्हणाले

‘ मी या भागात कामाला येण्यापूर्वी मल

या शेतकऱ्यांचे प्रश्न ठाऊक नव्हते. ते कसे सुटतील हे ठाऊक नव्हते. निवडणुका कशा लढवितात हे माहित नव्हते. प्रथम माझी ठाम समजूत होती–काम करायला निवडूनच जावे लागते हे खोटे आहे. आजही माझे बारा वर्षानंतर हे मत कायम आहे. आपल्या कार्याचा आणि निवडणुकीचा संबंध काही नसतो. पूर्वी मी इकडे आलो त्या वेळीही इथले आमदार–खासदार या दुबळ्या लोकांसाठी त्यांच्या शेतीच्या प्रश्नांसाठी काही करू शकले असते; पण तसे काही त्या वेळी नाही घडले. कारण त्यांना फक्त निवडून यायचे होते. इथल्या प्रश्नांचे भांडवल करून मते मागायची. त्यानंतर खुर्चीकरता भांडत रहायचे. आपल्या गावापर्यंतचा रस्ता डांबरी करायचा. कारण जीपगाड्या, ॲम्बेसेडर गाड्या थेटपर्यंत गेल्या पाहिजेत. आपल्या गावाचा असा वरवरचा विकास करण्यापलिकडे आजवरच्या आमदारांनी काही केले नाही. गेल्या बारा वर्षात मी इथल्या लोकांचे प्रश्न जवळून पाहिले आणि त्यावर उपाय शोधून ते सोडविले. प्रश्न त्या वेळचे आजही तसेच आहेत आणि ते शासकीय धोरण बदलल्याशिवाय सुटू शकणार नाहीत.'

विलासरावांच्या बोलण्यातून आत्मविश्वास प्रकट होत होता. माझ्या प्रश्नाच्या खुलाशाकरता मी म्हणालो– 'सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याने निवडणुक लढवावी का? आपल्या निवडणुक लढविण्याच्या निर्णयामुळे या प्रमाणात काही प्रश्न उपस्थित झाले आहेत.'

यावर विलासराव म्हणाले, 'बरोबर आहे. निवडणुकीला उभे रहाण्याने असे काही प्रश्न काही जणांच्या मनात उभे राहिले असतील. दुर्दैवाने सर्व प्रश्न, साधे साधे प्रश्न अगदी रस्ता–करण्यापासून वीजेचे खांब रोवण्यापर्यंतचे प्रश्न, हे इथं दडपण आणल्याशिवाय दबावाशिवाय सुटत नाहीत. खरे तर ही कामे त्या त्या खात्यामार्फत व्हायला काहीच हरकत नसते; पण धोरणे आणि निर्णय हे ज्या पद्धतीने आखली जातात, घेतले जातात ती पद्धत पाहिली की लक्षात येते योजना का रखडतात, रेंगाळतात. संपूर्ण तालुक्याचा विचार कुणी करत नसतो. तज्ज्ञ एखादी योजना तालुक्याचा अभ्यास करून ठरवितात. आणि आमदार केवळ आपल्या भागाच्या विकासासाठी धरणांच्या जागा बदलायला लावतात. त्यामुळे अपेक्षित पाणी साठत नाही. साठलेल्या पाण्याखाली अपेक्षित क्षेत्र भिजत नाही. विकासाचा समतोल राखला जात नाही. पुरंदरच्या पूर्वेला सर्व शेती आहे. पश्चिमेला डोंगराळ भागात भरपूर पाऊस पडतो; पण सर्व पाणी वाहून जाते. उन्हाळ्यात पिण्याचे पाणी नसते. ते टँकरने पुरवावे लागते. आणि पूर्व भागात पाण्याचे साठे आहेत, तलाव आहेत; पण पाणी नाही. वाहून जाणाऱ्या पाण्याचे नियोजन नाही. या सर्व प्रश्नांची सोडवणूक विधानसभेत पाठपुरावा करूनच होऊ शकते. हे काम समजा सध्याच्या आमदारांनी केले असते तर मला निवडणूक लढविण्याचे कारणच नव्हते. त्यांनी तसा प्रयत्न करावा म्हणून मी व्यक्तिशः प्रयत्न केलेत. मुख्यमंत्र्यांपासून सर्वत्र हेलपाटे घातलेत, पत्रव्यवहार केलेत, सर्वत्र एकच उत्तर असते. धोरणात बसत नाही. नवी धोरणं आखताना पुनः तीच चुकीची पद्धत अमलात येत असते. कारण प्रश्न नीट समजून घेतलेला नसतो. पूर्वी मी निवडणुक नको म्हणत होतो. आणि आता निवडणुक अपरिहार्य झालीय याची कारणेही आहेत.'

## राजकीय वर्चस्व नको!

विलासराव एक एक प्रश्न कसा आहे, त्याची सोडवणूक करण्याकरता कसे प्रयत्न केले हे सांगत होते. वीज कनेक्शन मिळविण्यासाठी दहा दहा वर्षे एकेका गावाने वाट पाहिली. आणि मग विलासरावांनी सत्याग्रह केले, मोर्चे काढले, तुरुंगवास पत्करले, लोकही आता धीट झालेत.

'पूर्वी लोक म्हणत असत, हे सर्व निवडणुकीसाठी असेल. तसा अपप्रचार काहीजणांनी केला. मी त्या वेळी नाही म्हणालो; पण लोकच आता म्हणायला लागले– 'च्यायला ह्ये सगळं आमदाराच्या हातात असूनबी त्यो करित न्हाई. त्ये काईबी न्हाई. आता आमच्या लोकांचा आमदार झाला पाहिजे' असे होता होता सर्वच ठिकाणाहून लोकांची मागणी होऊ लागली. म्हणून मग 'राष्ट्रीय पाणी पंचायत' स्थापन करावी लागली सुरुवातीला मी उभे रहायचे नाही असेच माझे मत होते; पण उमेदवार तयार करणे वगैरे प्रश्नांवर आम्ही प्रयत्नशील नसल्याने निवडणुकीकरता अमुक एकाला फ्लॅश करणं वगैरे आम्ही काही केलं नाही. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कोणतेच काम केले नाही; पण अखेर सर्वानुमते ही निवडणुक फक्त पुरंदर पुरतीच लढवावी कारण त्या ठिकाणी काम आहे. सबल आणि दुर्बल यांच्यातील हा संघर्ष आहे. आजवर सबलांनी राज्य केले. सर्व अधिकार गाजवले, दुर्बलांना काही मिळाले नाही. या लोकशाहीत दुर्बलांना सर्वात मोठे दान मिळालंय ते म्हणजे मतदानाचा अधिकार. आणि आजवर त्यांनी स्वप्नांच्या मागे लागून सबलांना मतदान केलंय. आता पुरंदर जागा झालाय. त्यांचं म्हणणंच आहे गेली तीस वर्षे आम्ही वाया घालविली. टोकन म्हणून ही निवडणूक आम्ही लढवित आहोत. त्या निमित्ताने 'पाणी' प्रश्नाकडे–जो अत्यंत महत्त्वाचा आहे, त्याच्याकडे सर्वांचं लक्ष जावं हा हेतू आहे. राजकीय वर्चस्व–गट असा उद्देश मुळीच नाही. तसे सर्वच पक्षातील नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत.'

या निवडणुकीच्या निमित्ताने पाण्याचा प्रश्न हा लोकांच्यापुढे यावा. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राहणाऱ्या ८० टक्के जनतेला रोजगार हमी देऊन त्यांना आपल्या शेतीतून बाहेर काढण्याऐवजी पाण्याची हमी देऊन स्वयंरोजगार निर्मितीकडे लक्ष दिले जावे यासाठी ही निवडणूक लढविण्याचा त्यांचा मानस त्यांनी व्यक्त केला.

'प्रत्येक सामाजिक प्रश्नांच्या काही मर्यादा असतात. सामाजिक कार्यकर्ते त्या मर्यादेपर्यंत काम करीत असतात; पण काही प्रश्न असे असतात की, ते शासनाधीन असतात. त्यावर फक्त विधानसभाच निर्णय घेऊ शकते. कारण ते धोरणात्मक असतात आणि अशा प्रश्नांवर, विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अभ्यास करून बोलणारा विरळा. कामगारांचा प्रश्न जसा दबावाने सुटू शकतो तसा शेतकऱ्यांचा प्रश्नही सुटायला हवा; पण शेतकरी संघटित नसतो कारण प्रत्येकाचे स्वार्थ हे त्यांनी आपापल्या नशिबाशी जोडलेले आहेत. आपल्या दैवातच हे असे आहे असं म्हणून ते वर्षानुवर्ष दुष्काळ सोसत असतात; पण प्रयत्न केला तर त्यावर मात करता येते, दैव बदलता येते हे त्यांना आता पटू लागलंय. त्यामुळे या निवडणुकीमुळे पुरंदरबरोबरच इतरत्रही याच प्रकारे स्थानिक प्रश्नांवर लोकजागृती करता येईल. आमचा मुख्यमंत्री कोण? या प्रश्नापेक्षा आमचे प्रश्न कोण सोडविणार ते कसे सोडविणार यावर चर्चा व्हायला हवी. महाराष्ट्रात पाऊस भरपूर पडतो; पण सर्व पाणी समुद्राला वाहून जाते. त्या सर्व पावसाळी पाण्याचे नियोजन व्यवस्थित झाले तर मुंबई-पुण्यातील झोपडपट्ट्यांचे प्रश्न सुटतील.'

विलासराव बोलता बोलता नवे अर्थशास्त्र सांगू लागले. 'झोपडपट्टी सुधार योजनेवर करोडो रुपये खर्च होतात, त्यांना घरे बांधून देण्यावर पुण्यात काही कोटी रुपये खर्च होणार आहेत. त्याने झोपडपट्टीची समस्या

सुटणार नसून उलट अधिकच जटिल बनणार आहे. तोच पैसा त्या झोपडपट्टीवासियांच्या गावी पडिक पडलेल्या जमिनीसाठी पाणी देण्यासाठी वापरला तर मोठी समस्या कायमची सुटेल.'

सर्व प्रश्नांचे मूळ पाणी. पाणी नसल्यामुळे शेती नाही. कामधंदा नाही. म्हणून जगायला शहराकडे धाव. तिथेही पाण्याचाच प्रश्न ज्वलंत बनत आहे.

विलासरावांनी हा प्रश्न वेळोवेळी कै. यशवंतराव चव्हाणांच्या कानावर घातला होता. त्यावेळी ते म्हणाले होते की, आमचेही म्हणणे तुमच्यासारखेच आहे आणि आता वसंतरावदादासुद्धा हा प्रश्न बोलू लागलेत. पाण्याचे योग्य नियोजन व्हायला हवे.

'सामाजिक कार्यकर्त्यांनीच आता राजकारणात पडायला हवे. लोकांनी विचारवंतांनी याला विरोध का करावा हे समजत नाही. एकीकडे हेच लोक म्हणत असतात, राजकारणात भ्रष्टाचार माजलाय, स्वार्थी लोकांचा बुजबुजाट झालाय. जाण असणारे कार्यकर्ते राजकारणात नाहीत त्यामुळे सर्वच राजकारण बिघडून गेलेय. या प्रकारे वेळोवेळी व्याख्यानातून व्यासपीठावरून हे वक्ते, विचारवंत बोलत असतात, चिंता व्यक्त करीत असतात आणि त्यांच्या विचाराप्रमाणे कुणी काम करायला लागले की, सामाजिक कार्यकर्त्यांनी राजकारणात भाग घ्यावा ही चिंतेची बाब आहे असेही म्हणतात. उलट त्यांनी स्वागत करायला हवे. सामान्यांच्या प्रश्नांची जाण सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनाच असू शकते. ते कसे सोडवावेत हे त्यांना अनुभवाने समजलेले असते. 'तपोवन' संस्थेच्या शिवाजीराव पटवर्धनांचे उदाहरण डोळ्यासमोर आहे. त्यांच्या कार्याची तुलना तिथल्या आमदार-खासदारांच्या कार्याशी होऊ शकेल का? पण सामाजिक प्रश्नांची काडीइतकी जाण नसणाऱ्या राजकारणात वावरणाऱ्या व्यक्तींनीच एका फटकाऱ्यासरशी प्रश्न निकालात काढून टाकला बेजबाबदारपणे. आयुष्यभर खपून उभ्या केलेल्या कार्याची ही पावती मिळाली! इतर समाजही, सामाजिक कार्यकर्तेही अगतिकपणे पहात बसले. किती बोलके उदाहरण आहे आणि यासाठीच सामाजिक कार्यकर्त्याने राजकारणात असणे आवश्यक आहे.' विलासराव सांगत होते.

कल्पनाताई म्हणाल्या—

'सामाजिक संस्था या शासकीय धोरणांच्या कक्षेतच काम करू शकतात. धोरण बदलू शकत नाहीत. धोरणेही राजकीय व्यक्ती ठरवत असतात. त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनीच निवडून येऊन धोरणे आखली पाहिजेत. त्या शिवाय विकास होणेच अशक्य आहे सामाजिक राजकीय असे भेद केल्यानेच सामाजिक कार्यकर्ते बाजूला पडले आणि निव्वळ खुर्चीसाठी धडपडणारे नेतृत्व गेल्या तीस वर्षात पुढे आले.' कल्पनाताईंनी विश्लेषण केले.

शेतकरीनगर (खळद) या ठिकाणी पाणी पंचायतीचं कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र आहे. पाणीपंचायतीच्या कार्यकर्त्यांची भोजनासहित सर्व सोय या ठिकाणी केली जाते. पु. ल. देशपांडे, कै. बा. भ. बोरकर आदी साहित्यिक या ठिकाणी राहून पाहुणचार घेऊन गेलेत.

पाणीपंचायतीचे काम जसजसे वाढायला लागले तसतसे लोकांचे त्याकडे लक्ष जाऊ लागले. कल्पनाताईंचे माहेर पुरंदरमधलेच असल्याने त्यांना लोक वडिलांच्यामुळे चांगले ओळखत असत. शेतावर जिथे कुठे महिला शेतात काम करीत असतील तिथे जाऊन कल्पनाताई गप्पागोष्टी करून येत असत. मावडी, पिंपरी—विसरवे वाघापूर इथली मंडळी खेड्यापाड्यातील प्रचारकार्याची माहिती देत होती आणि उत्साह वाढवीत होती.

'शेतकरी संघटना थोडीशी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढा देत आहे; पण जो शेतकरी उत्पादन करतो त्यानंतर शेतकरी संघटनेचे काम आहे. आज खेड्यात पाणी नसल्याने मोठ्या प्रमाणात शेती होतच नाही. पाणीपंचायत शेतकऱ्यांना शेती—आधुनिकपद्धतीने करण्यास प्रवृत्त करते. त्यासाठी लढे द्यावे लागतात. ते वीजेसाठी—पाण्यासाठी. मोठ्या शेतकऱ्याने लहान शेतकऱ्याला सांभाळून घ्यावे लागते. पाणीपंचायतीने जे काम केलेय ते शासनाने करणे आवश्यक आहे. सामाजिक बदल घडून येण्यासाठी जसे कार्यकर्त्याने सतत कार्यरत रहाणे आवश्यक असते तसेच राजकीय बदलाचाही प्रयत्न करणे आवश्यक असते. लोकशाही समाजव्यवस्थेत सामाजिक कार्यकर्ते राजकारणापासून दूर राहिले तर सामाजिक प्रक्रिया आणि विकासयोजनांची सांगडच रहाणार नाही. लोकांचे प्रश्न आणि लोकांचाच स्थानिक प्रतिनिधी, प्रश्न आणि परिस्थितीनुरूप सोडवणूक करून योग्य नियोजन करणे यासाठी सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याने राजकारणात निवडून येणे आवश्यक आहे.'

पाणीपंचायतीच्या जाहीरनाम्यात शेतीच्या सुधारणांबरोबरच ग्राम सुधारणा दिल्या आहेत. पोस्ट ऑफिस हे शाळेशी जोडलेले असावे. वीजबिल ग्रामपंचायतीकडे वसुलीला द्यावीत. रोजगार हमीमुळे शेतकरी शेतात राबणे सोडून रोजंदारीवर जायला लागलाय. त्याला पाण्याची हमी हवी. इ. महत्त्वाच्या बाबींमुळे सामाजिक कार्यकर्त्यांची नजर दिसते.


विलासरावांच्यासारखे कार्यकर्ते आज महाराष्ट्रात ठिकठिकाणी कार्यरत आहेत. निवडणुकांच्या गोंधळापासून दूर राहून ते कार्य करीत असतात. पण त्यांच्या कार्यास प्रत्यक्ष फळ येण्यासाठी धोरणांची आखणी होताना त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घ्यायला हवा. पण तसे करून घेणे राज्यकर्त्यांच्या हिताचे नसते आणि म्हणूनच प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात त्याने उतरून समाज आणि शासन यांच्यात पडत चाललेली दरी भरून काढण्याचा प्रयत्न करायला हवा.

वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यावर राजकारणातून निवृत्त होऊन पुनः पूर्णवेळ सामाजिक कार्यात भाग घेऊन रचनात्मक कार्य करणारे नानाजी देशमुख हे नव्या पिढीपुढे एक आदर्श उदाहरण आहे. सतत सत्तेचे राजकारण करण्यात गुंतलेल्या सर्वच पक्षातील वयोवृद्ध नेत्यांनी निवृत्त होऊन पुन: एखादा समाजात तळागाळापर्यंत जाण्याचीही आवश्यकता आहे. त्यांना बदलत्या जाणीवा आढळतील. विलासराव साळुंख्यांसारख्या समाजाशी समरसून निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना सर्वच पक्षांनी एकमुखी पाठिंबा देणे आवश्यक आहे. कारण त्यामुळेच असे कार्यकर्ते राजकारणाच्या गदारोळात टिकाव धरू शकतात. विलासरावांच्यामागे आज ग्रामीण पुरंदर आहे. पण विरोधीपक्ष काय किंवा सत्ताधारी कॉंग्रेस आय काय, यांना आज अशा सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची आवश्यकता नाहीय. त्यांचे म्हणणे यांनी सामाजिक कार्य करावे, राजकारणात पडू नये.

पण या सर्वच आव्हानांना आणि प्रश्नांना तोंड देण्यासाठी, वाचा फोडण्यासाठी सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे प्रतिक म्हणून विलासराव साळुंखे उभे आहेत.

बघु या पुरंदरचे कऱ्हेचे पाणी राजकारणी लोकांना किती हिसका दाखवतंय ते! कारण अखेर निवडणुका जिंकणे हे एक वेगळे शास्त्र आहे ते ज्यांना जमेल ते विजयी होतात! सामाजिक निस्वार्थी कार्यकर्त्यांना ते जमणे अवघड असते. त्यांचा तसा पिंडही नसतो

—गिरीष प्रभुणे




**मूळ लेखक : जेफ्री आर्चर**

**रूपांतर : विष्णू जयदेव**

**( ७ )**

लिबियन दहशतवाद्यांनी ताब्यात घेतलेल्या रॉयल नेव्हीच्या ब्रॉडस्वोर्ड विनाशिकेमुळे फॉरेन सेक्रेटरी चार्ल्स आणि डिफेन्स सेक्रेटरी सायमन यांच्यात पुन्हा स्पर्धा निर्माण झाली. विनाशिका वाचवण्याचं श्रेय ज्याला मिळेल त्याला पक्षात विशेष स्थान मिळणार हे उघड होतं. सायमनला ही संधी मिळाली. डिफेन्स खात्याने ' ऑपरेशन शॉपलिफ्टर ' यशस्वी करून दाखवले. ब्रॉडस्वोर्डच्या सुटकेच्या जल्लोशात पंतप्रधान थॅचर यांनी पुन्हा निवडणुका घोषित केल्या. कॉन्झर्वेटिव्ह पक्षाला बहुमत मिळाले, पण निर्णायक नाही. त्याच सुमारास लेबर पार्टीत नेतेपदाच्या निवडणुका पार पडल्या. रॉय हॅट्‌र्सले नेते म्हणून तर रेमंड उपनेतेपदावर निवडून आला. १९८४ मध्ये पुन्हा सार्वत्रिक निवडणुका झाल्या. नऊ वर्षांनी प्रथमच लेबर पार्टी पुन्हा सत्तेवर आली.

रेमंडला आपला वनवास संपल्यासारखा वाटला. रॉय हॅटर्सलेनी पहिली नेमणूक रेमंड गोल्डची केली होती– फायनान्स मिनिस्टर म्हणून. अँड्र्यू सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या तिकिटावर एडिंबरो कार्लटनमधून निवडून आला आणि पक्षनेते ओवेन यांनी नेतेपदाचा राजिनामा दिल्याने नेतेपदी त्याची सहज निवड झाली. चार्ल्स आणि सायमनला मात्र शॅडो टीममधे फारसे काम नव्हते. सेमूर बँकेचे अध्यक्षपद चार्ल्सच्या हातातून गेले होते आणि नेदरकोट कंपनीत काम करण्याची सायमनची इच्छा नव्हती...

□

**न**ऊ वर्षांनंतर प्रथमच लेबर पार्टीचे अंदाजपत्रक मांडण्यात येणार होते. अंदाजपत्रकाचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसे दिवसाचे २४ तासही रेमंडला कमी पडू लागले. दिवसाचे फक्त चार तास रेमंड झोप घेत असे. उरलेला सारा वेळ कार्यालयात काम चालू असे. त्याची बुद्धिमत्ता आणि कामाचा उरक पाहून खात्यातील वरिष्ठ सरकारी अधिकारीही स्तिमित झाले होते.

पक्षाने निवडणुकीत दिलेल्या बऱ्याच आश्वासनांना अंदाजपत्रकात मूर्त स्वरूप द्यावे लागणार होते. रेमंडच्या मनातले सगळेच क्रांतीकारी बदल त्याला अमलात आणता येणार नव्हते. पक्षाचे धोरण, कॅबिनेटचे निर्णय, सबकमिटीतील चर्चा यात बऱ्याच तरतुदी त्याला गमवाव्या लागणार होत्या.

शुक्रवारी सकाळपर्यंत त्याचे १४३ पानांचे भाषण तयार झाले. कॉमन्समध्ये संपूर्ण भाषण वाचण्यास त्याला अडीच तास तरी लागणार होते.

मंगळवारी सकाळी बजेट मांडायच्या दिवशी त्याने कॅबिनेटच्या सदस्यांपुढे अंदाजपत्रकाचे वाचन केले. कॅबिनेट पुढचे हे वाचन म्हणजे केवळ उपचाराचाच भाग असतो. फारशा कुणाही सदस्यांचे ह्या आकडेवारीकडे लक्ष नसते.

हाऊस ऑफ कॉमन्सची मात्र तशी स्थिती नसते. अंदाजपत्रकाच्या दिवशी सभागृह गच्च भरलेले असते. स्ट्रेंजर्स गॅलरीमध्ये जागा मिळवण्यासाठी अर्धा मैल लांब रांग लागलेली असते. फायनान्स मिनिस्टरांचे भाषण साडेतीनला सुरू होत असले तरी दुपारी अडीच पासूनच सर्व जागा भरलेल्या असतात. प्रेस गॅलरीत नेहमीच्या पत्रकारांबरोबर फायनान्शिअल एक्सपर्टस् आणि वृत्तपत्रांचे संपादकही हजर झालेले असतात.

तीन वाजून दहा मिनिटांनी हातात बजेट बॉक्स घेऊन रेमंड त्याच्या कार्यालयाबाहेर पडला. ब्रिटिश लोक परंपरेचे भोक्ते आहेत. ग्लॅडस्टननी अंदाजपत्रक सादर करताना जी बॉक्स वापरली तीच त्या नंतरच्या प्रत्येक फायनान्स मिनिस्टरने वापरली.

अर्थमंत्री बजेट बॉक्स घेऊन कार्यालयाबाहेर पडतानाचे छायाचित्र दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात छापण्याची प्रथा आहे. हा ठरलेला फोटो छायाचित्रकारांना काढू दिल्यानंतर रेमंड हाऊस ऑफ कॉमन्सकडे निघाला.

तीन वीसला रेमंडने सभागृहात प्रवेश केला तेव्हा लेबर पार्टीच्या सदस्यांनी त्याचे टाळ्या वाजवून स्वागत केले. रेमंड पंतप्रधानां शेजारच्या त्याच्या जागेवर स्थानापन्न झाला तेव्हा सिक्युरिटी गार्डने त्याला चिठ्ठी आणून दिली. 'रे, अॅव्ह कम'–जॉईसची चिठ्ठी होती. रेमंडने चिठ्ठी वाचून खिशात ठेवली. स्ट्रेंजर्स गॅलरीत बसलेल्या जॉईसकडे पाहून त्याने स्मित केले. साडेतीनला पंतप्रधानांना प्रश्न विचारण्याचा वेळ संपला.

हाऊस ऑफ कॉमन्सच्या प्रथेनुसार वेज अँड मिनस् कमिटीचे चेअरमन अंदाजपत्रक मांडण्याच्या दिवशी सभापतींच्या जागेवर बसतात. सभापती हा 'राजाचा प्रतिनिधी– किंग्ज मॅन' समजला जात असल्याने, आर्थिक बाबींवरील चर्चेच्या वेळी ते सभापती म्हणून पद भूषवीत नाहीत.

वेज अँड मिनस् कमिटीचे चेअरमन सभापतींच्या जागी स्थानापन्न झाल्यावर त्यांनी अर्थमंत्री रेमंड गोल्डना अंदाजपत्रक सभागृहापुढे मांडण्यास सांगितले.

कोणत्याही अंदाजपत्रकावरील भाषणाच्या पहिल्या भागात नेहमीच सरकारच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील कामगिरीचा आढावा घेतलेला असतो. नवे कर आणि कर सवलती ह्यांचा समावेश नेहमी भाषणाच्या उत्तरार्धात केलेला असतो. ह्या उत्तरार्धाकडेच सर्वांचे



रेमंड अंदाजपत्रक वाचताना

□

डोळे लागलेले असतात.

पहिल्या तासाभराच्या भाषणात रेमंडने जागतिक अर्थ परिस्थितीचा आढावा घेतला आणि अंदाजपत्रकामागील आपली भूमिका स्पष्ट केली. चलनवाढ होऊ न देता बेकारीत घट करण्याचे आपले प्रयत्न असल्याचे त्याने सांगितले. पहिल्या अठ्ठ्याहत्तर पानांमध्ये आपली तात्विक भूमिका मांडल्यावर तो नवे कर आणि कर सवलती ह्या महत्त्वाच्या भागाकडे आला.

'ओल्ड एज पेन्शनस् वील बी रेझड् टू अ रेकॉर्ड लेव्हल अँज विल बी अलौंसेस् फॉर सिंगल पेरेंट फॅमेलिज् अँड डिसेबलमेंट ग्रांटस्.'

रेमंडच्या ह्या पहिल्या घोषणेबरोबरच लेबर पार्टीच्या सदस्यांनी टाळ्या वाजवायला सुरवात केली. टाळ्या थांबल्यावर रेमंड म्हणाला की वॉर विडोज्च्या पेन्शनमध्ये ५० टक्क्यांनी वाढ केली जाईल आणि वॉर बाँडसूना त्यांच्या दर्शनी किंमतीइतकी किंमत दिली जाईल.

आज चाळीस वर्षांनीही रेमंड त्याच्या आजीची आठवण विसरला नव्हता. शाळेतल्या पहिल्या भाषणासाठी त्याचा विषय होता. 'द फर्स्ट चेंजेस आय विल मेक व्हेन आय बिकम प्राईम् मिनिस्टर.' आज लेबर गव्हर्नमेंटचा अर्थमंत्री म्हणून अंदाजपत्रक सादर करताना रेमंडने आपले जुने स्वप्न साकार केले. सभागृहात निवडून आल्यानंतर संधी मिळेल तेव्हा वॉर विडोजचा प्रश्न धसास लावायचा रेमंडने प्रयत्न केला होता. आज वीस वर्षांनी अर्थमंत्री म्हणून ती संधी त्याच्याकडे चालून आली होती.

बिअर, सिगरेटस् पेट्रोल आणि परफ्युमस् वरील कर पाच टक्क्यांनी वाढवला गेला होता. वार्षिक ३०,००० पौंडाहून जास्त पगार असणाऱ्यांच्या करात ८५ टक्क्यापर्यंत वाढ झाली होती. कंपन्यांच्या एकूण नफ्यावर आकारला जाणारा कर ५० टक्क्यावर नेला होता.

रेमंडने देशातील प्रत्येक भागातील बेकारी कमी करण्याच्या

दृष्टीने आखलेली योजना सभागृहापुढे मांडली. भाषण संपवण्यापूर्वी रेमंडची वाक्ये होती.

'we intend to create a generation in which class is as outdated as the debtors prison, in which talent, hard work and honesty are their own reward, a socialist society that is the envy of the East as well as the West. This budget, Mr. Speakar is nothing more than the architect's plan for that dream.'

भाषण संपवून टाळ्यांच्या कडकडाटात रेमंड खाली बसला तेव्हा मार्गारेट थॅचर् चिंतेत पडल्या होत्या. 'आता ह्या अंदाजपत्रकाला विरोध कसा करायचा ?'

# पार्टी लिडर्स

रेमंडच्या अंदाज पत्रकावर अभ्यासपूर्ण टीका करण्यासाठी आपल्याला अर्थशास्त्रावर प्रभुत्व असलेला मनुष्य लागेल ह्याची मार्गारेट थॅचरना कल्पना होती. त्यांनी ताडतोब आपल्या शॅडो कॅबिनेटमध्ये बदल करून चार्ल्सला शॅडो होम डिपार्टमेंटमधून काढून शॅडो फायनान्स मिनिस्टर म्हणून नेमले. आधीच्या शॅडो फायनान्स मिनिस्टरांना फॉरेन डिपार्टमेंटला टाकण्यात आले. या बदलात सायमनकडे शॅडो मिनिस्टर फॉर होम हे पद आले.

चार्ल्सने मागेही मार्गारेट थॅचरच्या शॅडो फायनान्स टीममध्ये काम केले होते, सेमूर बॅंकेच्या चेअरमन पदाचाही त्याला अनुभव होता. चार्ल्सचा कामाचा उरक मोठा होता. तो शॅडो फायनान्स मिनिस्टर म्हणून आल्याने अंदाज पत्रकातील तरतूदी सभागृहात सुरळीत पास करून घेणे ही रेमंडला नवी डोकेदुखी होऊन बसली. लेबर पार्टीचे सभागृहातील बहुमत फक्त चार सभासदांचे होते. अंदाज पत्रकातील महत्वाच्या तरतूदींत सभागृहात विरोधी पक्षाच्या प्रभावामुळे बदल करावा लागणे हे सरकारच्या दृष्टीने नामुष्कीचे असते; पण रेमंड तरतूदी पास करून घेण्यात यशस्वी ठरत होता. चार्ल्स असल्यामुळे मात्र त्याच्या अपेक्षेपेक्षा ह्या कामाला त्याला दुप्पट वेळ लागत होता.

लेबर गव्हर्नमेंटच्या पहिल्या अंदाजपत्रकाचे लोकांनी स्वागत केले. त्याच महिन्याच्या शेवटी घेतल्या गेलेल्या बाय इलेक्शनमध्ये लेबर पार्टीने विजय मिळवला. लेबर पार्टीचे सदस्य मरण पावल्याने दोन्ही जागांसाठी बाय इलेक्शन्स घ्यावी लागली असली तरी लेबर पार्टीच्या तिकिटावर निवडून आलेल्या उमेदवारांना पूर्वीपेक्षा पाच टक्क्यांनी मते जास्त पडली होती. मार्गारेट थॅचर आता पक्षाच्या नेतेपदाचा राजिनामा देतील अशी कॉमन्समध्ये चर्चा सुरू झाली.

केव्हान् केव्हा तरी थॅचर नव्या नेतृत्वाला वाट मोकळी करून देतील याची चार्ल्सला कल्पना होती. त्याने थॅचरच्या सरकारमध्ये फॉरेन सेक्रेटरी असल्यापासूनच माणसे जोडायला सुरुवात केली होती. आता जो पक्षाचा नेता बनेल तोच पुढच्या निवडणुकीत पक्षाचा जय झाला तर पंतप्रधान होईल हे चार्ल्सला ठाऊक होते. ऑक्सफर्डमध्ये चर्चिलचे भाषण त्याने प्रथम ऐकले तेव्हापासूनचे त्याचे स्वप्न होते— टेन डाऊनिंग स्ट्रीट. पक्षाचा नेता बनणे हे इंग्लंडचा पंतप्रधान होण्याच्याआधीचे एक पाऊल होते.

चौदा वर्षे पक्षाचे नेतृत्व केल्यानंतर मार्गारेट थॅचरनी नेतेपदाचा राजिनामा द्यायचा ठरवला. त्या आता ६५ वर्षांच्या झाल्या होत्या. त्यांचे पती डेनीस थॅचर यांचाही आग्रह त्यांनी आता राजकारणातून निवृत्त व्हावे असाच होता. चर्चिलनंतर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे इतका काळ नेतृत्व करणाऱ्या थॅचर ह्याच पहिल्या नेत्या !

मार्गारेट थॅचर राजिनामा देणार ही बातमी पसरताच कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीतील नव्या सत्ता संघर्षाला तोंड फुटले. नेतेपदाच्या शर्यतीत दोनच महत्वाचे मोहोरे होते. चार्ल्स सेमूर आणि सायमन कस्लेक. दोघांनीही आपली उमेदवारी जाहीर करण्याच्या आत त्यांना पक्षातील त्यांच्या पाठीराख्यांनी फोन करून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा आग्रह केला. वृत्तपत्रांमध्येही ह्या शर्यतीत कोण यशस्वी होईल ह्याबद्दल अंदाज यायला लागले.

पक्षामध्ये आपल्या उमेदवारीचा प्रचार करण्यासाठी चार्ल्सने आधीच सभासद हेरून ठेवले होते. सायमननेही त्याची योजना आखली होती. पक्षाच्या नेत्याने राजिनामा दिल्यानंतर सात दिवसांचा अवधी नव्या उमेदवारांची नावे जाहीर करण्यासाठी देण्यात येतो; पण थॅचर यांचा राजिनामा जाहीर झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी चार्ल्स आणि सायमनने उमेदवारीचा अर्ज भरला. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या नेतेपदासाठी तीन उमेदवार असतील अशी वृत्तपत्रांतून चर्चा होत होती; पण प्रत्यक्षात दोनच उमेदवारांचे अर्ज भरले गेले होते.

ह्या निवडणुकीबद्दल वृत्तपत्रांनी लोकांमध्ये प्रचंड कुतूहल निर्माण केले होते. फायनान्शिअल टाईम्सचे संपादक पीटर रिडेल यांनी तर सगळ्या २८९ कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांना भेटून त्यांचे मत अजमावण्याचा प्रयत्न केला. त्यांना फक्त २२८ सभासदांना भेटण्यात यश आले. त्यांच्या विश्लेषणानुसार १०१ सभासद सायमनच्या बाजूने होते तर ९८ चार्ल्सच्या बाजूने. उरलेल्या २९ सदस्यांनी कोणतेही मत व्यक्त करण्यास नकार दिला. फायनान्शिअल टाईम्सच्या लेखाचा मथळा होता 'नॅरो लीड फॉर कस्लेक'. ह्या लेखात सायमन आणि चार्ल्स मध्ये एडवर्ड हीथच्या निवडणुकीपासूनच कशी स्पर्धा होती याची माहिती देण्यात आली होती.

उमेदवारीसाठी अर्ज दाखल करण्याची वेळ संपत आलेली असताना सातव्या दिवशी सकाळी तिसरा उमेदवार रिंगणात उतरला— अलेक् पिमकीन. पिमकीननी पक्षाच्या नेतेपदासाठी आपले नाव पुढे केलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. चार्ल्सला तर धक्काच बसला. पिमकीन आणि त्यांचे पाठीराखे चार्ल्सला पाठिंबा देतील अशी सर्वांचीच अपेक्षा होती.

मतदारसंघाच्या पुनर्रचनेत पिमकीनची सीट जात असताना चार्ल्सने त्यांना लिटिल् हेम्प्टनचा मतदारसंघ मिळवून दिला होता. चार्ल्स मदतीला धावला नसता तर एव्हाना पिमकीनची हाऊस ऑफ कॉमन्समधली कारकिर्द संपुष्टात आली असती. पिमकीनचे दहा ते बारा पाठीराखे सोडले तर त्यांना इतर कुणी मत देण्याची शक्यता

नव्हती. त्यामुळे अचानक त्यांनी आपली उमेदवारी जाहीर केल्याने सगळेच कोड्यात पडले.

चार्ल्सने पिमकीननी त्यांचा अर्ज मागे घ्यावा म्हणून मनधरणी केली; पण पिमकीन ऐकायला तयार नव्हते. वृत्तपत्रांतून इतकी प्रसिद्धी पिमकीनना फक्त इडसीच्या डिबेटच्या प्रसंगीच मिळाली होती. त्यावेळी पिमकीन व त्यांचे पाठीराखे मतदानात भाग न घेता तटस्थ राहिले होते.

पिमकीननी पत्रकार परिषद घेऊन सायमन आणि चार्ल्स ह्या दोघांवरही टीकेची झोड उठवली. सायमनचा उल्लेख त्यांनी 'मिडल-क्लास पुशी मायनर पब्लिक स्कूल बॉय' तर चार्ल्सचा उल्लेख 'अॅरिस्टोक्रॅटिक अॅरोगंट स्नॉब' असा केला.

ह्याच काळात सभागृहात अंदाजपत्रकावर चर्चा चालू होती. चार्ल्स शॅडो फायनान्स मिनिस्टर असल्याने तो कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा प्रमुख प्रवक्ता होता. त्याच्या अभ्यासपूर्ण, मुद्देसुद भाषणांचा पक्षाच्या सभासदांवर प्रभाव पडत होता. सायमन शॅडो होम सेक्रेटरी असल्याने अंदाजपत्रकावरील चर्चा सुरू झाल्यापासून त्याला भाषण करण्याची संधीच मिळाली नव्हती.

मंगळवारी सकाळी नऊ वाजता हाऊस ऑफ कॉमन्सच्या कमिटी रूममध्ये मतदान सुरू होणार होते. सोमवारी रात्री फक्त अलेक् पिमकीनना शांतपणे झोप आली. सकाळी आठ वाजताच चार्ल्स आणि सायमन कॉमन्समध्ये हजर झाले. दुपारी तीन दहाला शेवटच्या सभासदाने मतदान केले. मार्गारेट थॅचरनी तटस्थ राहायचे ठरवले. संध्याकाळी चार वाजता मतपेटी सील करण्यात आली.

पाच वाजता चौदा नंबरची कमिटीरूम कॉन्झर्व्हेटिव्ह सभासदांनी पूर्णपणे भरली. सदस्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. मतदानाचा निकाल खालीलप्रमाणे होता–


| | | |
|---|---|---|
| चार्ल्स सेमूर | – | १३८ |
| सायमन कस्लेक | – | १३५ |
| अलेक् पिमकीन | – | १५ |

'तिघांपैकी कुणालाही निर्णायक विजय मिळाला नसल्याने पुढच्या मंगळवारी अलेक् पिमकीन शिवाय पहिल्या दोन उमेदवारांत मतदानाची दुसरी फेरी घेण्यात येईल' कमिटी चेअरमननी जाहीर केले.

आता 'किंगमेकर' पिमकीन आणि त्यांचे १५ पाठीराखे ज्याला मत देतील त्यांच्याच गळ्यात अखेर पंतप्रधानपदाची माळ पडणार हे उघड होते. निकाल जाहीर झाल्याचा १५ मिनिटात पत्रकारांनी पिमकीनला गराडा घातला. आपल्याला इतके महत्त्व मिळत असलेले पाहून पिमकीन फारच खूष दिसत होते. त्यांनी पत्रकारांना सांगितले की, आपला पाठिंबा जाहीर करण्यापूर्वी दोन्ही उमेदवाराची ते मुलाखत घेणार होते. चार्ल्स आणि सायमन दोघानीही पिमकीनना एकटे गाठायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी सायमनच्या आधीच चार्ल्स पिमकीनना व्हाईटस् क्लबमध्ये जेवायला घेऊन गेला. कॉमन्समधले मोजकेच सदस्य ह्या क्लबचे मेंबर होते. पिमकीनना इतकी वर्षे प्रयत्न करूनही क्लबची मेंबरशिप मिळाली नव्हती.

त्या दिवशी क्लबमध्ये चार्ल्स आणि पिमकीनसाठी खास खोली राखून ठेवण्यात आली होती.



चार्ल्स–पिमकीन–मतांसाठी तडजोड

¤

वेटरने ड्रिंक्स् आणण्यापूर्वीच चार्ल्सने पहिला प्रश्न केला–

'तू कशासाठी हा गोंधळ घालतो आहेस. तू उभा नसतास तर एव्हाना मी निवडणूक जिंकलोही असतो.'

'मला थोडी गंमत करायची होती.' पिमकीननी डोळे मिचकावत चार्ल्सला सांगितले.

'तुला लिटिल हेम्टनची सीट कुणी मिळवून दिली आठवतंय ना?' चार्ल्सने विचारले.

'आणि त्या साठी किंमत मोजल्याचेही मला आठवतंय' पिमकीन म्हणाले, 'त्यावेळी मला तुझी गरज होती आज तुला माझी आहे.'

'काय मागणी आहे तुझी? मी पंतप्रधान झाल्यावर तुझी अर्थ-मंत्री म्हणून नेमणूक करावी अशी इच्छा आहे का तुझी?' चार्ल्सला त्याच्या आवाजातली तुच्छता लपवता आली नाही.

'नाही. मला माझी किंमत ठाऊक आहे. इतका काही मी मूर्ख नाही.' चार्ल्सच्या नजरेला नजर देत पिमकीन म्हणाले.

'मग काय हवे? व्हाईटस् क्लबची मेंबरशिप? तीसुद्धा मिळवून देता येईल.'

'इतकं साधं मागणं नाही.' पिमकीन म्हणाले, 'तुला इंग्लंडचा पंतप्रधान व्हायला जर माझी मदत होणार असेल तर त्या बदल्यात तू मला हाऊस ऑफ लॉर्डस्चे सभासदत्व मिळवून द्यावेस.'

चार्ल्स क्षणभर गडबडला. 'आता शब्द द्यायला काय हरकत आहे. तीन वर्षांनी आपण पंतप्रधान झालो आणि शब्द पाळला नाही तर पिमकीन आपले काय वाकडे करू शकणार?' असा विचार करून चार्ल्स म्हणाला–

'ठीक आहे. तू आणि तुझ्या पंधरा लोकांनी जर मंगळवारी माझ्या बाजूने मतदान केले तर तुला हाऊस ऑफ लॉर्डस्चे सभासदत्व मिळेल याची मी व्यवस्था करतो.'

'तसं मला लिहून दे' पिमकीन म्हणाले. चार्ल्स पुन्हा गडबडला.

याला वाटले तेवढे पिमकीन मूर्ख नव्हते. त्यांनी त्याला चांगलेच खोड्यात पकडले होते.

चार्ल्सने लिहून द्यायचे कबूल केले.

'गुड' असे म्हणून पिकनीनने एका दमात सगळा पेग पोटात रिचवला.

दोन दिवसांनी हाऊस ऑफ कॉमन्सच्या लॉबीत सायमन पिमकीनना भेटला तेव्हा त्यांनी हाच प्रश्न सायमनला विचारला.

'मला तुम्हाला वचन नाही देता येणार. मी जर पंतप्रधान झालोच तर तुमची योग्यता पाहून मला निर्णय घ्यावा लागेल. सौदा म्हणून तुमच्या पाठिंब्याची मला अपेक्षा नाही.' –सायमन म्हणाला.

'काय मनुष्य आहे हा! मी याला इंग्लंडचे पंतप्रधानपद बहाल करतो आहे आणि हा माझी साधी मागणीही धुडकावून लावतो आहे.' पिमकीन स्वत:शीच म्हणाले–

मंगळवार उजाडला. ह्या मधल्या काळात चार्ल्स आणि सायमन प्रत्येक सभासदाशी जवळजवळ दोनदा तरी बोलले असतील. दुपारी साडेतीनला मतदान संपले आणि चार वाजता मतपेटी खोल करण्यात आली.

पाचच्या सुमारास सर्व सभासद कमिटीरूममध्ये जमले. पाचच्या ठोक्याला कमिटी चेअरमनने निकाल जाहीर केला.

| | | |
|---|---|---|
| चार्ल्स सेमूर | – | १३० |
| सायमन कस्लेक | – | १५८ |

चार्ल्सला आयुष्यात प्रथमच इतका जबर धक्का बसला. पिमकीनशी बोलल्यानंतर सायमनने तर निवडणूक जिंकायची आशाच सोडली होती. पिमकीन आणि त्यांच्या पाठीराख्यांनी आपल्याला पाठिंबा दिला ह्यावर सायमनचा विश्वासच बसेना.

पिमकीनच्या वर्तनाचा उलगडा कुणालाच झाला नाही. आठवडाभराने पिमकीन त्यांच्या मतदारसंघात गेले असताना त्यांची फिओनांशी भेट झाली. तिने त्यांना हाच प्रश्न केला. त्यावर पिमकीन म्हणाले–

'टेल ऑफ टू सिटीज्‌मधल्या सिडने कार्टनने आयुष्यात फक्त एकच सत्कृत्य केले आता ह्या वयात मरण्यापूर्वी एकतरी चांगले कृत्य करावे म्हणून मी सायमनला पाठिंबा द्यायचे ठरवले.'

## नवे नेतृत्व, नवे बदल !

पक्षाचा नेता म्हणून निवडून आल्यावर सायमनचा आठवडा फार धाईगर्दीचा गेला. तो जेथे जेथे जात असे तेथे वार्ताहर त्याच्या पाठीशी असत. आठवडाभरात एलिझाबेथलाही ह्या प्रसिद्धीची सवय झाली होती.

निवड झाल्यावर १४ दिवसांनी सायमनने त्याचे शॅडो कॅबिनेट जाहीर केले; पण त्यात चार्ल्सचा समावेश नव्हता. खरं पाहता चार्ल्सला सायमनने उपनेते पद देऊ केले आणि त्याला हव्या त्या खात्याचा शॅडो मिनिस्टर म्हणून कॅबिनेटमध्ये यायचे निमंत्रण दिले; पण चार्ल्सने त्याला नकार दिला. 'मी बॅक बेंचर म्हणून राहणे पसंत करेन.' –त्याने सायमनला फोनवर सांगितले.

नेतेपदाच्या निवडणुकीत अनपेक्षित पराभव पत्करावा लागल्याने चार्ल्स पार खचून गेला होता. त्याची आता पन्नाशी उलटली होती. सायमन पक्षाचा नेता झाल्याने पुढच्या निवडणुकीत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा जय झाला तर पंतप्रधानपद त्याच्याकडे गेले असते. म्हणजे पुढची आठ वर्षे तरी चार्ल्सला नंबर टेन डाऊनिंग स्ट्रीटवर हक्क सांगता येणार नव्हता.

इतक्या वर्षांच्या ह्या जीवघेण्या सत्तास्पर्धेनंतर आलेल्या ह्या अपयशाने त्याला फार थकल्यासारखे वाटत होते. आमांदाच्या वर्तनानेही तो फार निराश झाला होता. तिच्यावर त्याचा आता कोणताच वचक राहिला नव्हता. तिच्या सौंदर्याचेही त्याला आकर्षण उरले नव्हते. उलट तिच्या वर्तनामुळे कित्येकदा त्याची बेअब्रू व्हायची मात्र पाळी येत असे. त्यातल्या त्यात आनंदाचे स्थान हॅरी होता. चार्ल्स खरोखरच आता मुलात जास्त रमायला लागला होता. निवडणुकीचा निकाल लागला त्याच्या तिसऱ्या दिवशी हॅरीला घेऊन आठवडाभर सुट्टीसाठी तो स्कॉटलंडला निघून गेला.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला आता नवे नेतृत्व लाभल्याने पक्षातील मरगळ नष्ट झाली. शॅडो कॅबिनेट जाहीर केल्यानंतर सायमनने पक्षाच्या पुनर्रचनेस प्रारंभ केला.

सायमनच्या नेतृत्वाखाली पक्षाची लोकप्रियता हळूहळू वाढायला लागली. एकोणिसशे एकूणनव्वदच्या नोव्हेंबर महिन्यात हाऊस ऑफ कॉमन्सच्या तीन जागांसाठी झालेल्या बायइलेक्शनमध्ये तिन्हीच्या तिन्ही जागा कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाने काबीज केल्या. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या ह्या अनपेक्षित यशामुळे लेबर पार्टीचे सभागृहातील बहुमत धोक्यात आले. वृत्तपत्रेही पाच वर्षे लेबर गव्हर्नमेंट सत्तेवर टिकेल की नाही याविषयी शंका व्यक्त करू लागली.

स्वत: रेमंड मात्र अर्थमंत्री म्हणून चांगलाच यशस्वी ठरला होता. वर्षभरात त्याने लेबर गव्हर्नमेंटचे दुसरे अंदाजपत्रक सभागृहाला सादर केले. देशातील मान्यताप्राप्त अर्थतज्ज्ञांनीही नव्या अंदाजपत्रकाचे स्वागत केले. सर्व युरोप खंडालाच बेकारी आणि चलन फुगवट्याचा प्रश्न भेडसावत असताना प्राप्त परिस्थितीत अर्थमंत्री म्हणून रेमंडने शक्य होते तेवढे प्रयत्न केले ह्याबद्दल कोणाचेही दुमत नव्हते.

दोन वर्षांच्या आत बेकारांची संख्या वीस लाखाच्या खाली आणण्यात रेमंडला यश आले होते. याच काळात संपाचे प्रमाणही चार टक्क्यावर येऊन ठेपले होते. कामगार नेत्यांचे तर रेमंड आराध्य दैवत बनला होता. चार्ल्स सेमूर आता बॅकबेंचर म्हणून बसत असल्याने सायमनकडे चार्ल्सच्या तोडीचा शॅडो फायनान्स मिनिस्टर नव्हता याचाही लाभ रेमंडला होत होता.

तीन वर्षे तरी लेबर गव्हर्नमेंटला सुरळीत सत्ता सांभाळण्यात यश लाभले. वृत्तपत्रांनी घेतलेल्या ओपिनिअन पोलमध्ये अजूनही लेबर पार्टीइतकेच कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला जनमत अनुकूल असले तरी तरुण मतदारांचा कल अँड्र्यू फ्रासरकडे होता.

अँड्र्यूच्या नेतृत्वाखाली लिबरल पार्टी आणि सोशल डेमोक्रॅटिक पार्टी यांच्या युतीलाही आता चांगले दिवस येण्याची शक्यता निर्माण झाली. एकोणिसशे नव्वदच्या बाय इलेक्शनमध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा एक आणि लेबर पार्टीचा एक मिळून दोन जागा सोशल डेमोक्रॅटिक पार्टीने काबीज केल्या. त्यामुळे पुढच्या निवडणुकीनंतर सत्तारूढ होताना लेबर किंवा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला लिबरल आणि

एस्. डी. पी. यांच्या युतीची मदत घ्यावी लागेल असा राजकीय निरीक्षकांचा कयास होता.

एकोणिसशे नव्वदच्या एप्रिल महिन्यात पंतप्रधानांना मुत्रपिंडाच्या विकारामुळे छोटयाशा शस्त्रक्रियेसाठी दहा दिवस हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. वृत्तपत्रांतून त्यांच्या प्रकृतीबद्दल उलटसुलट बातम्या यायला सुरुवात झाली. पक्षाचा उपनेता म्हणून या काळात सरकार चालवण्याची जबाबदारी रेमंडवर पडली होती. सभागृहात अडीच ते साडेतीन ही वेळ पंतप्रधानांना प्रश्न विचारायची वेळ असते. ह्या वेळात पंतप्रधानांऐवजी रेमंडला विरोधी पक्षाच्या प्रश्नांना उत्तरे द्यावी लागत होती.

प्रश्नोत्तराचे वेळी विरोधी पक्षाचे नेते सायमन कसुलेक आणि अँड्रयू फ्रासर यांना तोंड देणे काही सोपी गोष्ट नव्हती. मंगळवार आणि गुरुवार रेमंडचा सारा वेळ ही उत्तरे तयार करण्यात जायचा.

अकराव्या दिवशी पंतप्रधान वेस्टमिनिस्टर हॉस्पिटलमधून बाहेर पडले आणि त्याचबरोबर त्यांच्या राजिनाम्याबद्दल वृत्तपत्रांतून उलटसुलट येणाऱ्या बातम्याही थांबल्या.

आपल्या अनुपस्थितीत रेमंडने ज्या प्रकारे कॅबिनेट मीटिंगस् हाताळल्या ते पाहून पंतप्रधानांना समाधान वाटले. ते आता सत्तरीशी पोहोचले होते. रेमंडला विश्वासात घेऊन त्यांनी सांगितले की येत्या निवडणुकीत पक्षाचा नेता म्हणून ते पक्षाला विजय मिळवून देतील; पण त्यानंतर पंतप्रधान म्हणून रहाण्याची त्यांची इच्छा नव्हती. आपल्यानंतर रेमंडने पक्षाची धुरा सांभाळावी असे त्यांना वाटत होते.

रेमंड लेबर सरकारच्या तिसऱ्या अंदाजपत्रकाच्या तयारीला लागला, तेव्हा त्याला जाणवले की निवडणुकीपूर्वीचे आपले हे शेवटचे अंदाजपत्रक. केवळ निवडणूक नजरेसमोर ठेवून भरमसाठ सवलती देण्याची त्याची इच्छा नव्हती. गेली तीन वर्षे प्रयत्नपूर्वक त्याने ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेची घडी बसवण्यासाठी धडपड केली होती. ही घडी आता केवळ निवडणुकीमुळे विस्कटून टाकण्याची त्याला इच्छा नव्हती.

ऑक्टोबर महिना उजाडला. सर्वच पक्षांच्या वार्षिक परिषदांचा हा काळ. अँड्रयूने सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या परिषदेत समारोपाचे भाषण करताना पक्षाच्या प्रतिनिधींना सांगितले की येत्या बारा महिन्यात केव्हाही निवडणुका जाहीर होतील.

'या वेळच्या सत्ता संघर्षात आपल्या मदतीखेरीज कोणताही पक्ष यशस्वी होणार नाही. आपल्याला नव्या सरकारात स्थान मिळवायचे आहे हे ध्यानात ठेवून तुम्ही तयारीला लागा.' तो म्हणाला.

सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची वार्षिक परिषद संपल्यावर दुसऱ्या आठवड्यातच ब्रिगटनला लेबर पार्टीची परिषद झाली. परिषदेतील आपल्या उद्घाटनाच्या भाषणात रेमंडने सभासदांना तीन वर्षात पक्षाच्या सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेत घडवून आणलेले स्थित्यंतर समजावून सांगितले. कामगार संघटनांनी पक्षाच्या सरकारला दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्याने त्यांचे आभार मानले.

'आपण तीन वर्षात जे काही साध्य केले आहे त्याचा पाया पुढची निवडणूक जिंकून आपण अधिक भक्कम केला पाहिजे. अजून पाच अंदाजपत्रके मांडायची मला संधी मिळाली तर पुढच्या शंभर वर्षात तरी कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष सत्तेवर यायची शक्यता उरणार नाही' टाळ्यांच्या कडकडाटात रेमंड म्हणाला. रेमंडचे भाषण संपले तेव्हा सभासदांनी त्याला उभे राहून मानवंदना दिली.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीची वार्षिक परिषद ब्लॅकपूलला झाली. परिषदेच्या तयारीला सायमनला सहा आठवडे लागले. पक्षाच्या कार्यकर्त्यांशी निवडणुकीपूर्वी ही शेवटची भेट अशी अँड्रयूप्रमाणेच सायमनचीही धारणा होती.

ह्या मधल्या काळात सायमनच्या प्रयत्नांमुळे चार्लस पक्षाच्या कार्यात थोडा फार रस घेऊ लागला. अजूनही सायमनच्या शॅडो कॅबिनेटमध्ये यायची त्याची तयारी नसली तरी परिषदेतील सायमनच्या भाषणातील टॅक्स रिफॉर्मबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट करणारा भाग तयार करायला चार्लसने हातभार लावला. चार्लस आता इतका निवळला होता की पक्षातल्या त्याच्या हितचिंतकांना शंका यायला लागली की कदाचित पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीत तो उभाही रहायचा नाही.

शुक्रवारी सकाळी पक्षाच्या २,००० प्रतिनिधींपुढे सायमनने भाषण केले. बीबीसीने सायमनचे भाषण डायरेक्ट टेलिकास्ट केले. भाषणाच्या शेवटी सायमन म्हणाला—

'ह्या पुढचा आपला संघर्ष सत्तेसाठी राहील. सत्ता हातात असल्याखेरीज आपण खऱ्या अर्थाने लोकांची सेवा करू शकणार नाही.'

सायमनचे भाषण संपल्यावर अलेक पिमकीन स्वतःशीच म्हणाले—

'आय थिंक आय मेड द राईट डिसिजन.'

परिषदा आटोपून सभासद हाऊस ऑफ कॉमन्सला परतले आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातच हार्ट अॅटॅकमुळे सभागृहाच्या सभापतींना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. दोन आठवड्यांनी ते बरे होऊन बाहेर पडले; पण डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनी हाऊस ऑफ कॉमन्सच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचे ठरवले.

सभागृहात लेबर गव्हर्नमेंटचे फक्त दोन सभासदांचे बहुमत होते.


## परसूच्या पशुकथा

**वसंत सबनीस**

**किंमत १२ रुपये**

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटेला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्त्र श्वापदांचा व्यापार व शेवटी सर्कसबरोबर केलेली भटकंती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सांगितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांच्या या कथा...

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

लेबर पार्टीतूनच ह्या पदासाठी उमेदवार उभा केला तर पक्षाचे बहुमत आणखी घटले असते. मावळते सभापती कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे होते. त्यामुळे बायइलेक्शनमध्ये त्यांची जागा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीकडे जाण्याची शक्यता होती. अशा परिस्थितीत सरकारचे बहुमत धोक्यात आले असते.

लेबर पार्टीच्या चीफव्हिपनी सायमनची त्याच्या कार्यालयात भेट घेऊन नवे सभापती कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीतूनच निवडण्याची विनंती केली. सायमनने थोडया नाखुशीनेच त्याची विनंती मान्य केली आणि आपल्या पक्षाच्या चीफ व्हिपना सभापती पदासाठी उमेदवार सुचवण्यास सांगितले.

सायमनचे पक्षाच्या चीफ व्हिपशी बोलणे झाल्याच्या दुसऱ्याच आठवडयात चार्ल्सने त्याच्या भेटीसाठी वेळ मागून घेतली. सायमनला आश्चर्य वाटले. पक्षाच्या नेतेपदाची निवडणूक झाल्यावर एकदाही चार्ल्सशी त्याची खाजगीत भेट झाली नव्हती. चार्ल्स सायमनचा प्रतिस्पर्धी असला तरी त्याला चार्ल्सच्या बुद्धिमत्तेविषयी आदर होता. चार्ल्सच्या पाताळयंत्री स्वभावामुळे वेळोवेळी संकटात सापडूनही सायमनला त्याच्या गुणांची जाणीव होती. त्याने ताबडतोब चार्ल्सला भेटायला बोलावले.

सकाळीच चार्ल्स सायमनच्या कार्यालयात हजर झाला. खोलीत दोघेच होते. इतक्या वर्षांच्या स्पर्धेनंतर आता प्रथमच एकांतात समोरासमोर बसल्यावर दोघांनाही अवघडल्यासारखे झाले. चार्ल्सच्या चेहेऱ्यावर आता वृद्धत्वाची झाक दिसू लागली होती. कानामागचे केस पांढरे व्हायला लागले होते.

### अविश्वासाचा ठराव ?

चार्ल्सची विनंती ऐकून सायमनला धक्काच बसला. एक वेळ इंग्लंडच्या पंतप्रधान पदासाठी आपल्याशी स्पर्धा करणारा चार्ल्स सेमूर सभापती पदासाठी आपले नाव सुचवले जावे अशी विनंती करेल असे त्याला स्वप्नातही वाटले नव्हते. सभापती झाल्यावर चार्ल्सला पक्षीय राजकारणात भाग घेता आला नसता.

'तुझ्या योग्यतेच्या माणसाला ह्या पदासाठी वाया घालवायची माझी इच्छा नाही. आपल्या पक्षाचे सरकार स्थापन झाले तर तू अर्थमंत्री व्हावेस असे मला वाटते.' सायमन म्हणाला.

चार्ल्सने हलकेच स्मित केले. एके काळी ह्याच पदासाठी तो चोवीस तास फोनपाशी बसून राहिला असता.

'मला आता नव्या संघर्षाची इच्छा नाही. इथून पुढे शांत जीवन जगायची माझी इच्छा आहे. आपण एकाच वेळी सभागृहात निवडून आलो. वीस वर्षे पक्षात एकत्र काढली. तुला इलिझाबेथसारखी बायको लाभली. माझं आयुष्य फार वेगळं गेलं. तिने तुझ्या आयुष्यात जेवढे स्थैर्य आणले तेवढेच हॅरीने आता माझ्या आयुष्यात आणले आहे. आता ह्या वयात नव्या शर्यतीला प्रारंभ करून हे सुख लाथाडून टाकायची माझी इच्छा नाही.'

चार्ल्स मनापासून बोलत होता. सायमनने त्याच्या विनंतीला विरोध केला नाही.

हाऊस ऑफ कॉमन्सच्या प्रथेनुसार सभापती हा नेहमी एकमताने निवडला जातो. उमेदवाराला अनुमोदन देणारे भाषण सभागृहात करावे लागते. सायमनने ही जबाबदारी पिमकीनवर टाकली.

चार्ल्स हाऊस ऑफ कॉमन्सचा सभापती झाला आणि त्याच्या आयुष्यातल्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला. इंग्लंडच्या पंतप्रधान पदासाठी चाललेल्या शर्यतीतला एक महत्त्वाचा मोहोरा गळाला.

आधीच्या सभापतींची क्रॉयडन नॉर्थ इस्टची जागा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीने दहा हजार मतांच्या आघाडीने बाय इलेक्शनमध्ये जिंकली. ह्या नंतर महिनाभरात एका लेबर सदस्याच्या मृत्यूमुळे रिकाम्या झालेल्या जागेसाठी घेतलेल्या दुसऱ्या बाय इलेक्शनमध्येही कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा विजय झाला. सरकार आणि विरोधी पक्ष ह्यांची सभागृहातील संख्या सारखीच झाली. विरोधी पक्षांनी जर सभागृहात अविश्वासाचा ठराव मांडायचे ठरवले तर त्यांना जिंकण्याची शक्यता अधिक होती.

रेमंड लेबर गव्हर्नमेंटचे नवे अंदाजपत्रक मांडायच्या तयारीला लागला होता. रेमंड अंदाजपत्रक मांडायच्या आतच जर आपण अविश्वासाचा ठराव मांडण्यात यशस्वी झालो तर सार्वत्रिक निवडणुकांत विरोधी पक्षांच्या विजयाची शक्यता बळावेल हे अँड्रयूला जाणवले. त्याने सायमनची भेट घेऊन अविश्वासाचा ठराव मांडण्याविषयी चर्चा केली.

सायमनला अँड्रयूची योजना पटली. त्याने सुचविले की मार्चच्या शेवटच्या आठवडयात ठराव सभागृहापुढे मांडता येईल. ठराव पास झाला तर सरकारला ताबडतोब निवडणुका जाहीर करणे भाग पडेल आणि रेमंडला त्याचे नवे अंदाजपत्रक मांडणेही शक्य होणार नाही.

मार्चच्या दुसऱ्या आठवडयात शनिवारी रेमंड कार्डिफला लेबर पार्टीच्या एका सभेत प्रमुख वक्ता म्हणून बोलायला चालला होता. पॅडिंग्टनला त्याने गाडी पकडली आणि कंपार्टमेंटमध्ये बसल्यावर त्याने आदल्या दिवशी तयार केलेले भाषण तपासून पाहायला सुरुवात केली. गाडी स्वीडन स्टेशनावर आली. स्टेशन मास्टर रेमंडच्या डब्यात आले आणि त्यांनी रेमंडला वायरलेसवर मिळालेला मेसेज सांगितला. पंतप्रधानांना परत हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले होते. रेमंडला पॅडिंग्टनला परत जाणे शक्य व्हावे म्हणून पॅडिंग्टनकडे जाणारी गाडी पाच मिनिटांसाठी थांबवून घेण्यात आली होती.

रेमंडने ताबडतोब आपण कार्डिफला येत नसल्याचा निरोप देऊन परतीच्या गाडीत बसला. पॅडिंग्टन स्टेशनावर त्याच्या येण्याची वाट पाहत पत्रकार उभे होते. त्यांच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर न देता रेमंड त्याच्या गाडीत बसून सरळ वेस्टमिनिस्टर हॉस्पिटलमध्ये गेला !

पंतप्रधान पडून होते. त्यांचा जुना मुत्रपिंडाचा विकार पुन्हा बळावला होता. डॉक्टरांनी रेमंडला सांगितले की आता मोठ्या शस्त्रक्रियेची आवश्यकता होती.

पंतप्रधान रेमंडला म्हणाले की हॉस्पिटलमधून बाहेर पडायला त्यांना कमीत कमी दीड महिना तरी लागेल. तेवढ्या काळात मंत्रिमंडळ चालवण्याची जबाबदारी रेमंडने घ्यायची आवश्यकता होती. त्याहून महत्त्वाचे म्हणजे बुधवारी विरोधी पक्ष सभागृहात अविश्वासाचा ठराव मांडणार होते. त्यावेळी पंतप्रधानांच्या जागी ठरावाला उत्तर देण्यासाठी रेमंडला उभे रहावे लागणार होते.

'ठराव पास झाला तर मला पंतप्रधान आणि पक्षाचा नेता म्हणून

राजिनामा द्यावा लागेल.' पंतप्रधान रेमंडला म्हणाले.

अविश्वासाचा ठराव पास झाला तर लेबर गव्हर्नमेंट कोसळले असते आणि सभागृह बरखास्त करून सार्वत्रिक निवडणुका घ्याव्या लागल्या असत्या; पण लेबर पार्टीचा नेताच हॉस्पिटलमध्ये असताना पक्षाला निवडणुका लढवणे जड गेले असते. रेमंडच्या मनातला विचार पंतप्रधानांच्या लक्षात आला.

'तुला पक्षाच्या घटनेतली ऑर्डर ५ (४) ठाऊक आहे का? सभागृहात अविश्वासाचा ठराव पास झाला तर पक्षाच्या नॅशनल एक्झेक्युटिव्हची मिटींग घेऊन ताबडतोब तुझी प्रमुख नेता म्हणून निवड करता येईल.'

रेमंडने पंतप्रधानांना सांगितले की त्याने ती ऑर्डर पाहिली होती.

'जॉईसनी वाचून दाखवली असेल?' पंतप्रधान म्हणाले. रेमंडने स्मित केले. केटचे नाव त्याने पंतप्रधानांना सांगितले नाही.

पुढचा एक तास पंतप्रधानांजवळ बसून रेमंडने अविश्वासाचा ठराव कसा हाताळायला हवा या विषयी चर्चा केली. सभागृहात उत्तर आयर्लंडचे (अल्स्टर युनिअनिस्ट) दहा सभासद होते. त्यांनी जर लेबर गव्हर्नमेंटला पाठिंबा दिला तर ठरावाचा पराभव करण्यात लेबर पार्टीला यश आले असते.

उरलेल्या तीन दिवसात रेमंडला त्याचे भाषण तयार करणे भाग होते. सोमवार आणि मंगळवार सर्व पक्षांच्या चीफ व्हिप्स्नी थ्री-लाईन व्हिप्स् काढून सर्व सभासदांना बुधवारी सभागृहात हजर रहाण्याचा आदेश दिला. सभापती झाल्यापासून चार्ल्सवर पहिल्यांदाच एवढी मोठी जबाबदारी पडत होती. वृत्तपत्रांतून ठराव पास होईल की नाही यावर उलटसुलट चर्चा यायला लागली होती.

सायमन विरोधी पक्षाचा प्रमुख वक्ता होता समारोपाचे भाषण अँड्र्यूवर सोपवले होते. सरकारच्यावतीने नील किनॉक प्रमुख वक्ते होते आणि ठराव मतदानाला येण्यापूर्वी शेवटचे भाषण रेमंड करणार होता.

बुधवारी दुपारी अडीचलाच सभागृह गच्च भरले. स्ट्रेंजर्स गॅलरीमध्ये आत शिरायलाही जागा नव्हती. प्रेस गॅलरीमध्ये हाऊस ऑफ कॉमन्स कव्हर करणाऱ्या वार्ताहारांबरोबर वृत्तपत्रांचे संपादकही येऊन बसले होते.

घड्याळात साडेतीनचा ठोका पडला आणि सभागृहात शांतता पसरली. 'ऑर्डर, ऑर्डर' म्हणून ओरडण्याचीही चार्ल्सला आवश्यकता भासली नाही. 'लिडर ऑफ द अपोझिशन' चार्ल्स म्हणाला.

सायमन भाषणासाठी उभा राहिला तसे कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांनी टाळ्या पिटायला सुरुवात केली. सायमनने त्याच्यासमोर भाषणाची टिपणे ठेवली नव्हती. सायमनची वाणी ओघवती होती. पन्नास मिनिटांच्या त्याच्या भाषणात त्याने राजकीय आणि आर्थिक परिस्थितीचे अतिशय भेदक विश्लेषण केले. लेबर पार्टीचे वर्णन त्याने 'पार्टी ऑफ वेस्टेड अपॉर्च्युनिटीज्' असे केले. आणि मग भाषणाच्या शेवटी रेमंडकडे बोट दाखवत तो म्हणाला,

'बट यू विल बी रिप्लेस्ड् बाय पार्टी ऑफ आयडिआज् अँड आयडिअलस्.'

टाळ्यांच्या कडकडाटात सायमन खाली बसल्यावर चार्ल्सने सरकारच्या वतीने नील किनॉकना बोलण्यास सांगितले. नील किनॉकची तुलना अॅन्युरिन बिव्हनशी केली जाते. त्यांचे भाषण सायमनच्या तोडीस तोड होते. त्यांनी मुद्देसूदपणे सायमनच्या टीकेचा परामर्श घेतला.

'आजचा अविश्वासाचा ठराव हा सायमन कसूलेक ह्यांच्या नेतेपदाचा मृत्यूलेख ठरेल. त्यांनी गेली दोन वर्षे संधीसाधू लोकांच्या



अविश्वासाचा ठराव : सायमन – रेमंड

¤

पक्षाचे नेतृत्व केले आज तेच लोक त्यांच्या नेतृत्वाचा शेवट करतील' किनॉक म्हणाले.

ह्यानंतर नऊ वाजेपर्यंत सरकार आणि विरोधी पक्षांच्या बॅक बेंचर्सना बोलण्याची संधी दिली गेली. आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. कित्येकदा सभागृहातील आरडाओरडयामुळे पत्रकारांना वक्ता काय मुद्दा मांडतो आहे हे समजणेही मुश्कील होत होते. दहा वाजता ठराव मतदानाला येणार होता. नऊच्या ठोक्याला सभापतींनी अँड्र्यू फ्रासरना विरोधी पक्षाच्या वतीने समारोपाचे भाषण करायला सांगितले.

अँड्र्यूने आतापर्यंत विरोधी पक्षाच्या विविध वक्त्यांनी मांडलेल्या मुद्यांचा परामर्श घेऊन ठरावापाठची आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे वर्णन त्याने 'ऑनेस्ट ब्रोकर' असे केले.

साडेनऊ वाजता भाषण संपवून अँड्र्यू खाली बसल्यावर सभापतींनी रेमंडला सरकारच्या वतीने समारोपाचे भाषण करायला सांगितले. रेमंड बोलायला उभा राहिला तेव्हा सभागृहात सभासदांच्या आरडा ओरडयामुळे एक शब्दही ऐकू येणे मुश्कील होते. रेमंडने उभा राहिल्याबरोबर पंतप्रधानांच्या प्रकृतीबद्दल सभागृहापुढे निवेदन केले. 'सर्व सभासदांच्या वतीने पंतप्रधानांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मी शुभेच्छा पाठवतो' रेमंड म्हणाला.

क्षणभरात सभागृहाचा नूर पालटला आणि सभागृहात शांतता

पसरली. रेमंडने भाषणाला सुरुवात केली.

स्ट्रेंजर्स गॅलरीत बसलेल्या जॉईसला रेमंडचे भाषण पाठ होते. रेमंडकडून दहा वेळा तरी तिने ते ऐकले असेल. सायमनने कोणतेही टिपण पुढे न ठेवता केलेले भाषण पाहून रेमंडने टिपणाचे कागद फाडून टाकले. तारीखवार त्याने लेबरसरकारच्या तीन वर्षातील कामगिरीचा आढावा घेतला. लेबर पार्टी सत्तेवर आल्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेत झालेली सुधारणा त्याने आकडेवारीसह सांगितली. अजून दोन अंदाज पत्रके मांडण्याची संधी सभागृहाने आपणास दिली तर ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेला कायम स्वरूपाचा भक्कम पाया आपण मिळवून देऊ असे त्याने सांगितले. अँड्र्यूने सोशल डेमोक्रॅटिक पार्टीला 'ऑनेस्ट ब्रोकर' म्हटले होते त्याचा उल्लेख करून तो म्हणाला 'लुकिंग ॲट द अलायन्स आय कॅन से देअर इज नो वन लेस ऑनेस्ट अँड नो वन मोअर ब्रोक.'

दहा वाजता भाषण संपवून रेमंड खाली बसला तेव्हा सभागृहात विलक्षण तणाव निर्माण झाला होता. सभागृहात अविश्वासाचा ठराव मांडण्याचे प्रसंग फार क्वचितच येतात. निर्णायक क्षण आता जवळ आला होता. चार्ल्सने एका वाक्यात ठराव सभागृहापुढे मांडला.

'धिस हाऊस हॅज नो कॉन्फिडन्स इन हर मॅजेस्टीज् गव्हर्नमेंट.'

विरोधी पक्षाच्या सभासदांनी हात वर केले. ठरावाला पाठींबा देणाऱ्या सभासदांची संख्या मोजल्यावर चार्ल्सने ठराव पास झाल्याचे जाहिर केले. लेबर पार्टीच्या सदस्यांनी तात्काळ मतदानाची मागणी केली. चार्ल्सने मागणी मान्य केली आणि सभासद मतदानासाठी कॉमन्सच्या लॉबीत गेले.

अल्स्टर युनिअनिस्ट पक्षाच्या नेत्याने मतदानासाठी थ्रीलाईन व्हीप काढला नव्हता. पक्षाच्या सभासदांनी सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून योग्य वाटेल त्या पक्षाला मतदान करावे असा त्यांचा आदेश होता. पंधरा मिनिटांनी सभासद सभागृहात जमले तेव्हा चार्ल्सने निकाल जाहीर केला. ठरावाच्या बाजूने ३२३ मते पडली होती आणि विरुद्ध ३२२ केवळ एका मताने ठराव पास झाला होता.

बसल्या जागेवरून रेमंडने कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांना विजयाच्या घोषणा देताना पाहिले 'आज पंतप्रधान सभागृहात असते तर पक्षाचा पराभव टळला असता' त्याला वाटले.

शस्त्रक्रियेनंतर पंतप्रधान शुद्धीवर आल्यावर राणीने त्यांची हॉस्पिटलमध्ये भेट घेतली. पंतप्रधानांनी ताबडतोब राणीला सभागृह बरखास्त करण्याचा सल्ला दिला. सार्वत्रिक निवडणुकीसाठी नऊ मे ही तारीख ठरवण्यात आली. पंतप्रधानांनी राणीला सांगितले की, नऊ मे ला ते पक्षाच्या नेतेपदाचा राजिनामा देतील आणि निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्याबरोबर मंत्रिमंडळाचा राजिनामा पाठवून देतील.

नव्या निवडणुकांसाठी फक्त एक महिन्याचा अवधी होता. लेबर पार्टीच्या नॅशनल एक्झेक्यटिव्हची तातडीने ट्रान्सपोर्ट हाऊसमध्ये बैठक बोलावण्यात आली. बैठक वादळी ठरणार असा वृत्तपत्रांचा अंदाज होता; पण बैठकीत पत्रकारांना प्रवेश नव्हता.

पाच तासांच्या चर्चेनंतर पक्षाच्या घटनेतील तरतुदीनुसार प्रत्यक्ष मतदान न घेताच रेमंडची सार्वत्रिक निवडणुकांसाठी उपनेतेपदावरून पक्षाच्या नेतेपदासाठी निवड करण्यात आली. मात्र निवडणूक झाल्यावर प्रत्यक्ष मतदानासाठी रेमंडने पक्षापुढे यावे असे ठरले.

या निवडणुकीत लेबर पार्टीचा पराभव झाला तर त्या बरोबर रेमंडचे नेतृत्वही संपुष्टात येणार होते. लेबर पार्टीचा नेता म्हणून निवड झाल्यावर ट्रान्सपोर्ट हाऊसमधून रेमंड सरळ वेस्ट मिनिस्टर हॉस्पिटलमध्ये आला. पंतप्रधानांच्या चेहऱ्यावर अजूनही थकवा जाणवत होता. अजून चार आठवडे तरी त्यांना हॉस्पिटलमधून बाहेर पडता येणार नव्हते. पंतप्रधानांच्या उशाशी बसून रेमंडने त्यांच्याशी निवडणुकीच्या तयारीबद्दल चर्चा सुरू केली.

# प्राइम मिनिस्टर

आठवडाभरात प्रचाराने वातावरण वाजायला लागले. रेमंड, सायमन आणि अँड्र्यू सगळ्या मार्जिनल कॉन्स्टिट्युअन्सीज्मधून फिरत होते. ह्या वेळेस फक्त चार्ल्सने प्रचारात भाग घेतला नाही. निवडणुकीत लेबर पार्टीचा पराभव झाला तर रेमंडला पुढे कधीही पंतप्रधानपद मिळण्याची शक्यता नव्हती. पक्षाच्या नेतेपदाचीही त्याला राजिनामा द्यावा लागला असता.

सायमन कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा नेता झाल्यानंतरची ही पहिलीच सार्वत्रिक निवडणूक होती. पक्षाला सत्ता मिळवून देण्यात तो अपयशी ठरला तर त्याच्याही नेतृत्वाला पक्षातून आव्हान मिळाले असते.

निवडणुकीतल्या विजयावर लिबरल आणि सोशल डेमोक्रॅटिक पार्टी या पक्षांच्या युतीचे भवितव्य अवलबून होते. युतीला जितक्या जागा मिळतील त्यावर सत्ता संघर्षातले त्यांचे स्थान निश्चित होणार होते. ह्या खेपेस एडिंबरो कार्लटनमध्ये अँड्र्यू फक्त अर्धा दिवस होता. त्याने ज्या मार्जिनल कॉन्स्टिट्युअनसीज्ची यादी तयार केली होती त्यात अलेक् पिंमकीनच्या लिटील् हेम्टन मतदारसंघाचाही समावेश केला होता.

लिटील् हेम्टन हा मतदारसंघ कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा बालेकिल्ला होता; पण अलेक् पिंमकीन गेली कित्येक वर्षे मतदारसंघाकडे फिरकलेच नव्हते. त्यांच्या बेपर्वाईचा मतदारांवर हळूहळू परिणाम होत होता. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीने ह्यावेळी लिटील हेम्टनमधून स्थानिक उमेदवाराला तिकीट दिले होते. अँड्र्यूने गेल्या दोन निवडणुकांत लिटील् हेम्टनवर अधिक भर दिला होता.

अलेक् पिंमकीन इतके बेफिकीर होते की, निवडणुकीच्या फक्त एक आठवडा आधी ते मतदारसंघात हजर झाले. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रचाराचा जोर पाहून त्यांना थोडी काळजी वाटली. मतदारसंघातील पक्षाच्या अध्यक्षांनी त्यांना सांगितले, 'तुम्ही चिंता करू नका. लिटील् हेम्टनमधून आपल्या पक्षाच्या तिकिटावर गाढव उभे केले तरी निवडून येईल.' अध्यक्षांच्या बोलण्याने पिंमकीनना समाधान वाटले आणि रागही आला.

निवडणूक एक आठवड्यावर येऊन ठेपली. ओपिनिअन पोलमध्ये लिबरल आणि एस.डी.पी. च्या बाजूने बावीस टक्के मते होती तर

लेबर आणि कॉन्झर्व्हेटिव्ह या दोन प्रमुख पक्षांकडे प्रत्येकी ३८ टक्के लोकांचा कल होता. लेबर किंवा कॉन्झर्व्हेटिव्ह या कोणत्याच पक्षाची लाट नसल्याने लिबरल आणि एस डी.पी. च्या युतीला या खेपेस जास्त जागा मिळण्याची शक्यता 'संडे टाईम्स' आणि 'ऑब्झर्व्हर' चे स्तंभलेखक बोलून दाखवीत होते.

अँड्रयूने या निवडणुकीत सर्व सामर्थ्य पणाला लावले होते. दिवसाचे फक्त चार तास तो झोप घेत असे. बाकी सर्व वेळ दौऱ्यावर असे. तीन दिवसांच्या सतत प्रवासानंतर शेवटच्या दिवशी बुधवारी रात्री तो एडिंबरोच्या सभेत भाषणाला उभा राहिला तेव्हा त्याच्याबरोबर प्रवास करणाऱ्या पत्रकारांमध्येही उभे राहण्याचे त्राण नव्हते. ,

सायमनचा कार्यक्रम काही वेगळा नव्हता. बुधवारी रात्री प्रचार आटोपता घेण्यापूर्वी शेवटच्या भाषणासाठी तो पकल्ब्रिजला आला. पकल्ब्रिजच्या सिटीहॉलमध्ये साडेचारशे लोक बसण्याची सोय होती. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा जय झाला तर पकल्ब्रिजहून निवडून येणारा उमेदवार इंग्लंडचा पंतप्रधान बनणार होता. सायमनचे भाषण ऐकण्यासाठी कडाक्याच्या थंडीतही चार हजार लोक हॉलबाहेर कुडकुडत उभे होते.

'बी शुअर यू गो टू द पोल टुमारो. एव्हरी व्होट विल बी व्हायटल' —सायमनने मतदारांना सांगितले.

ह्या तीन आठवड्यांच्या प्रचारात इतके अचूक विधान कोणत्याही नेत्याने केले नव्हते. खुद्द सायमनलाही आपल्या विधानातले तथ्य निकाल जाहीर झाल्यावरच समजणार होते.

बुधवारी संध्याकाळी रेमंड लीडस्‌ला आला. स्टेशनवर त्याचे स्वागत करण्यासाठी लीडस्‌चे महापौर आणि नगरसेवक हजर झाले होते. स्टेशनवर उतरल्यावर गाडीत बसून रेमंड सरळ टाउन हॉलवर आला. दोन हजार माणसे त्याचे निवडणुकीपूर्वीचे शेवटचे भाषण ऐकायला टाउन हॉलवर तासभर बसून होती. मोटारीतून बाहेर पडायचेही रेमंडमध्ये बळ उरले नव्हते; पण त्याची गाडी दृष्टिक्षेपात येताच लोकांनी घोषणा द्यायला सुरुवात केली आणि त्याच्या शरीरात नवा उत्साह संचारला. महापौरांनी मतदारांना रेमंडची ओळख एका वाक्यात करून दिली— 'रे हॅज कम होम.'

प्रचाराच्या सुरुवातीस करावे तितक्याच उत्साहाने रेमंडने भाषण केले. चाळीस मिनिटे बोलल्यानंतर तो खाली बसला तेव्हा त्याला उठून गाडीपर्यंत चालण्याचे त्राणही उरले नव्हते. गाडीत बसल्या—बसल्या त्याला झोप लागली. त्याचा प्रचार प्रमुख फ्रेड आणि जॉईस त्याला घरी घेऊन गेले.

गुरुवारी सकाळी सहालाच अँड्रयू, सायमन रेमंड —तिघेही नेते त्यांच्या मतदार संघातील घरात तयार होऊन बसले होते. निवडणुकीच्या दिवशी बीबीसीच्या ब्रेकफास्ट टेलिव्हिजन चॅनेलवर पक्षांच्या नेत्यांची मुलाखत दाखवण्याचा प्रघात आहे. ह्या मुलाखती आटोपून तिघाही नेत्यांना सात वाजेपर्यंत मतदान केन्द्रावर जाणे भाग होते. वृत्तपत्रांना नेहमी पक्षाचा नेता त्याच्या मतदार संघात मतदान करतानाचे छायाचित्र लागते.

संध्याकाळी मतदान संपल्यावर गुरुवारी रात्री अँड्रयू, लुईस आणि क्लेअर एडिंबरोलाच थांबली. रेमंड देखील जॉईसबरोबर लीडस्‌ला थांबला. सायमन मात्र पकल्ब्रिजहून इलिझाबेथबरोबर लंडनला परतला. निकालाच्या दिवशी रात्रभर तो स्मिथ स्क्वेअर मधल्या पक्षाच्या प्रमुख कार्यालयात थांबणार होता.

रात्री अकरा वाजून वीस मिनिटांनी गिलफोर्डहून पहिला निकाल जाहीर झाला. सीट कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीने जिंकली होती. स्विंग दोन टक्क्यांचा होता.

'नॉट इनफ्' सायमन त्याच्या कार्यालयातल्या टीव्हीकडे पाहत स्वतःशीच म्हणाला.

'मे नॉट बी इनफ्' रेमंड स्वतःशीच पुटपुटला. जॉईस आणि तो त्याच्या आईवडिलांच्या घरी बसून बीबीसीवर होणारे निकाल पाहत होते.

पुढच्या दोन जागाही कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला गेल्या. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीकडील स्विंग दोन टक्केच राहिला.

रात्री बारा वाजून सात मिनिटांनी लेबर पार्टीची रग्बी येथील जागा सोशल डेमोक्रॅटिक पार्टीने काबीज केली तेव्हा रेमंडला पहिला धक्का बसला. पुढच्या पंचवीस मिनिटांत एस. डी. पीने कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीची बिलेरिकेची जागा गिळंकृत केली.

पहिल्या शंभर जागांचे निकाल जाहीर झाले तरी मतदारांचा कल कसा आहे याचा काहीच अंदाज येत नव्हता. रात्री एक वाजेपर्यंत बीबीसीच्या 'इलेक्शन स्पेशल'वरील पॅनेलचे निकालाबद्दल एकमत होत नव्हते. रात्री अडीच वाजेपर्यंत ३०० मतदार संघांचे निकाल जाहीर झाले.

सकाळी तीन वाजता रेमंड झोपी गेला तेव्हा लेबर पार्टीने ३६३ जागा मिळवल्या होत्या आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीने १९१. रेमंडला कल्पना होती की सकाळी खेड्यांतील मतदार संघातले निकाल जाहीर व्हायला लागल्यावर हे चित्र पालटेल. एस्. डी. पी आणि लिबरल पार्टी यांच्या युतीने ३२ जागा मिळवल्या होत्या. सकाळी डेली मेलची बॅनर हेडलाईन होती 'स्टेलमेट'

आठच्या सुमारास सायमन पकल्ब्रिजहून २५,००० मतांच्या आघाडीने निवडून आला. मतदारांचे आभार मानण्यासाठी तो घाईघाईने पकल्ब्रिजला निघाला. रेमंडचा २७,००९ मतांनी विजय झाला होता. लीडस् मधला निकाल जाहीर झाल्यावर तासाभरातच मतदारांचे आभार मानून जॉईसबरोबर रेमंड डाऊनिंग स्ट्रीटवरच्या त्याच्या बंगल्याकडे निघाला.

एस्.डी.पी. आणि लिबरल पार्टीच्या युतीने आतापर्यंत ४४ जागा मिळवल्या होत्या. एसडीपीचा नेता अँड्रयू फ्रासर १०००० मतांच्या आघाडीने निवडून आला. साऊथ हेम्टनची सीट सोशल डेमोक्रॅटिक पार्टीने फक्त ७२ मतांनी जिंकली तेव्हा अँड्रयूला आपल्या संगळ्या श्रमांचे सार्थक झाल्यासारखे वाटले. सत्तावीस वर्षानंतर प्रथम अलेक् पिमकीन सभागृहात दिसणार नाहीत याचे सायमनला वाईट वाटले.

शुक्रवारी दुपारी चार वाजता बीबीसी वरून १९९१ च्या निवडणुकीचे अंतिम निकाल जाहीर करण्यात आले.

कॉन्झर्व्हेटिव्ह — २९८
लेबर — २९७
एस. डी. पी. / लिबरल — ४७
अल्स्टर युनिअनिस्ट — १७
स्पीकर — १



**अँड्रयू – पार्टीची शक्ती कोणाच्या बाजूने ?**

¤

लेबर पार्टीला एकूण १२,२४६,३४१ ( ३५.२ % ) मते पडली होती. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला १२,२११,९०७ ( ३५.१% ) मते पडली होती. एस. डी. पी आणि लिबरल पार्टी यांच्या युतीला ८,६४९,८८१ (२५.४% ) मते मिळाली होती.

बीबीसीवर निकालाचे विश्लेषण करताना लॉर्ड डे म्हणाले की, गेल्या ३६ वर्षाच्या त्यांच्या पत्रकारितेच्या अनुभवात त्यांनी अशा स्वरूपाचा निकाल पाहिला नव्हता. आता एस. डी. पी. आणि लिबरल पार्टी यांची युती ज्या पक्षाला पाठिंबा देईल तोच पक्ष सत्ता संघर्षात उजवा ठरणार होता.

अँड्रयू पत्रकारांना तोंड दाखवायचेही टाळत होता. शेवटचा निकाल जाहीर झाल्यावरोबर त्याने ताबडतोब सायमनला फोन केला. सायमनशी बोलणे झाल्यावर त्याने रेमंडला फोन केला. रेमंडचेही बोलणे त्याने शांतपणे ऐकून घेतले. कॉन्झर्व्हेटिव्ह आणि लेबर पार्टीची ऑफर ऐकून घेतल्यावर त्याने त्यांना सांगितले की, निर्णय घेण्यापूर्वी पक्षाच्या निवडून आलेल्या सभासदांशी चर्चा करणे त्याला आवश्यक वाटत होते.

हाऊस ऑफ कॉमन्समध्ये रविवारी सकाळी युतीच्या सभासदांची बैठक बोलवण्यात आली होती. शनिवारचा दिवस सभासदांना मतदारांचे आभार मानण्यासाठी लागणार होता.

अँड्रयू पत्रकारांकडे एक शब्दही बोलण्यास तयार नसला तरी अँड्रयूचे वडील सर डंकन फ्रासरनी मात्र ‘स्कॉटस्मनला’ सांगितले होते की आपला मुलगा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीलाच पाठिंबा देईल. वेस्टमिनिस्टर हॉस्पिटलमधून पंतप्रधानानी बीबीसीच्या मुलाखतीत सांगितले की अँन्ड्रयू हाडाचा समाजवादी आहे. तो कधीही कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला पाठिंबा देणार नाही.

संपूर्ण शनिवार अँड्रयूच्या पेलहॅम क्रिसेंट या घरात सतत खासदारांची येजा सुरू होती. इतक्या मोठ्या प्रमाणावर घरात पाहुणे आलेले क्लेअरने कधीच पाहिले नव्हते. शनिवारी रात्री झोपेपर्यंत अँड्रयूचा स्वतःचाही नक्की निर्णय होत नव्हता.

रविवारी सकाळी दहा वाजता हाऊस ऑफ कॉमन्सच्या तिसऱ्या मजल्यावर कमिटी रूममध्ये एस. डी. पी आणि लेबर पार्टीच्या खासदारांची बैठक झाली. अजनपर्यंत युतीच्या खासदारांचा अधिकृत निर्णय वृत्तपत्रांना ठाऊक नव्हता. अँड्रयूच्या निर्णयाबद्दल लोकांमध्ये कमालीचे औत्सुक्य निर्माण झाले होते. त्याचे वडील सर डंकन फ्रासर ह्यांची सगळी कारकिर्द कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीत गेली तर सोशल डेमोक्रॅटिक पार्टीत येण्यापूर्वी अँड्रयू लेबर पार्टीचा सदस्य होता. पक्षात अतिडाव्या गटाचा जोर वाढल्याने त्याला पक्ष सोडणे भाग पडले होते. पण आता रेमंड गोल्ड हा मवाळ गटाचा पुढारी होता. अँड्रयू कोणत्या पक्षाला पाठिंबा जाहीर करेल याबद्दल वेगवेगळे तर्ककुतर्क चालले होते.

बैठक संध्याकाळी चार वाजेपर्यंत चालली. अँन्ड्रयूने सुरुवातीस सभासदांचे आभार मानून त्यांना कॉन्झर्व्हेटिव्ह आणि लेबर पार्टीनी केलेल्या ऑफर्स सांगितल्या. सायमन आणि रेमड दोघांनीही युतीचे दोन खासदार कॅबिनेटमध्ये घेण्याचे मान्य केले होते. दोन्ही पक्षांच्या जाहिरनाम्यावर बैठकीत चर्चा झाली. शेवटपर्यंत सभासदांत एकमत नव्हते. निम्म्या सभासदांचा कल लेबरपार्टीकडे होता तर जवळपास तेवढ्याच सभासदांचा कल कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीकडे होता.

अखेर एकमताने सभासदांनी निर्णय घेतला की, हाऊस ऑफ कॉमन्समधील २७ वर्षांच्या अनुभवाच्या आधारे अँन्ड्रयूनेच अंतिम निर्णय घ्यावा.

‘नेशन विल नॉट फरगिव्ह अस इफ् वुई आर इर्रिसपॉनसिबल विथ अवर न्यू पॉवर.’ अँड्रयूने सभासदांना सांगितले.

संध्याकाळी पाच वाजता अँड्रयू पेलहॅम क्रिसेंटवरील घरी परतला. त्याने त्याचा निर्णय लुईसला सांगितला तेव्हा तिला आश्चर्य वाटले.

संध्याकाळी साडेसहाला अँड्रयूची राणीच्या प्रमुख सचिवांशी भेट ठरली होती. अँन्ड्रयूने भेटीत आपली भूमिका स्पष्ट केली. लेबर आणि कॉन्झर्व्हेटिव्ह ह्या पैकी कोणत्या पक्षाला आपण का पाठिंबा देत आहोत हे त्याने त्यांना सविस्तर समजावून सांगितले. सचिव अँड्रयूचा निर्णय राणीला कळवणार होते. साडेसातला सचिवांचे आभार मानून अँड्रयू बाहेर पडला; पण तरीही पत्रकारांपुढे काहीही बोलण्यास त्याने नकार दिला. अंतिम निकाल फक्त इंग्लंडच्या राणीनेच जाहीर करायचा होता.

सचिवांशी बोलणे झाल्यावर राणीने निर्णय निश्चित केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता राणीच्या खाजगी सचिवांनी सायमनला फोन केला आणि त्याला बकिंगहॅम पॅलेसवर यायचे निमंत्रण दिले. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या स्मिथ स्क्वेअरमधील मुख्यालयातून सायमन बाहेर पडला तेव्हा त्याच्या स्वागतासाठी प्रचंड जनसमुदाय गोळा झाला होता. इमारतीबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला होता. लोकांनी घोषणा देऊन सायमनचे स्वागत केले. सायमनने गाडीत बसण्यापूर्वी हात हलवून आपल्या चाहत्यांना अभिवादन केले. कोणत्याही प्रकारे भाषण करण्याचा हा प्रसंग नव्हता. सायमनच्या मोटारीच्या पुढे आणि पाठी स्कॉटलंड यार्डचे मोटरसायकल आऊट रायडर्स होते.

बकिंगहॅम पॅलेसमधून बोलावणे आले याचा अर्थ अँड्रयूने आपल्या

पक्षाला युतीचा पाठिंबा जाहीर केला असणार, सायमनला वाटले.

लेबर पार्टीच्या ट्रान्सपोर्ट हाऊस या प्रमुख कार्यालयाबाहेरही प्रचंड गर्दी जमली होती. 'रेमंडला अड्र्यूचा निर्णय कळला असेल का ?' सायमनच्या मनात आले.

बकिंगहॅम पॅलेसपर्यंत सायमनची गाडी कोठेही थांबवण्यात आली नाही. सायमनला फोन करण्यापूर्वी सचिवांनी स्कॉटलंड यार्डला सूचना देऊन ठेवल्या होत्या. सायमनच्या गाडीचा मार्ग स्कॉटलंड यार्डनेच ठरवून दिला होता.

गाडी बकिंगहॅम पॅलेसच्या आवारात शिरली आणि एखाद्या शाळकरी मुलासारखे सायमनचे हृदय धडधडू लागले. संसदीय राजकारणात सत्तावीस वर्षे कशी उलटली याचा पत्ताच लागला नाही. इतक्या वर्षांची मती गुंग करणारी शर्यत आता शेवटाला आली होती. एलिझाबेथ, पीटर आणि मायकेल आपल्याबरोबर गाडीत असते तर बरे झाले असते, सायमनला वाटले. कोव्हेंट्री सेंट्रल मतदार संघासाठी १९६४ मध्ये त्याची प्रथम निवड कशी झाली याची त्याला आठवण आली. मतदार संघाच्या पुनर्रचनेत त्याचा मतदारसंघ गेला तेव्हा त्याला वाटले त्याची राजकीय कारकीर्द आता संपली; पण मिलबर्न मुळे पकलब्रिजचा मतदारसंघ त्याला मिळाला. मिलबर्नंनी अजूनही सायमनचे राजिनाम्याचे पत्र परत केले नव्हते. ह्या विचाराने सायमनला हसू आले. ब्रॉडस्त्रोर्डच्या सुटकेच्या काळात चार्ल्स सेमूरने त्याच्या मनावर जे दडपण आणले ते त्याला कधीच विसरता येणे शक्य नव्हते.

सायमनचे शाळेत असल्यापासूनचे स्वप्न होते– टेन डाऊनिंग स्ट्रीट –इंग्लंडचे पंतप्रधानपद. आज इतक्या वर्षांनी संसदीय राजकारणातले खाचखळगे–चढउतार पार करून तो अंतिम ध्येयाच्या जवळ येऊन ठेपला होता.

पॅलेसच्या प्रांगणात कुठेही सायमनची ब्लॅंकरोव्हर रोखण्यात आली नाही. गाडी सरळ पॅलेसच्या पोर्चमध्ये येऊन उभी राहिली. सायमन गाडीतून बाहेर पडल्यावर राणीच्या खाजगी सचिवाने त्याला अभिवादन केले. लांबलचक कॉरीडॉरमधून सायमनला त्यांनी राणीच्या चेंबरपर्यंत नेले. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे प्रमुख सायमन कसलेक आल्याची वर्दी राणीला देऊन सचिवांनी सायमनला आत पाठवले.

राणीला अभिवादन करून सायमन तिच्या आदेशाची प्रतिक्षा करीत उभा राहिला. हृदयाची धडधड आता त्याला स्पष्ट ऐकू येत होती. निर्णायक क्षण आता एका क्षणावर येऊन ठेपला होता.

राणीने नेहमीच्या मृदू आवाजात सायमनला सांगितले.

'अँड्र्यू फ्रासरनी माझ्या खाजगी सचिवांशी चर्चा केली. त्यांनी आणि त्यांच्या युतीच्या सभासदांनी रेमंड गोल्ड यांना पाठिंबा द्यायचे ठरवले आहे. त्यांनी हा निर्णय का घेतला हे समजावून देण्यासाठी शिष्टाचार म्हणून मी तुम्हाला प्रथम भेटण्याचे ठरवले आहे.'

ट्रान्सपोर्ट हाऊसमधून रेमंड गोल्ड यांची गाडी बकिंगहॅम पॅलेसकडे निघाली होती. राणीच्या खाजगी सचिवांनी त्यांना बकिंगहॅम पॅलेसमध्ये येण्याचे निमंत्रण देण्यापूर्वी स्कॉटलंड यार्डला सूचना दिल्या होत्या. त्यामुळे गाडी वाटेत कोठेही थांबवण्यात येणार नव्हती. रेमंडच्या गाडीचा मार्ग स्कॉटलंड यार्डनेच ठरवून दिला होता.

**स मा प्त**


या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या सर्वात महान राजकीय नेत्याची संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



**फाळणी एकदा झाली पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी अशी परिस्थिती नाही. प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली पहिली डिलक्स आवृत्ती.**

**मोठा क्राऊन आकार**

**पृष्ठे : सुमारे ४००**

कामत्ती पंडरावी कला

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ. पुणे. ४११ ०३०.

पुस्तके

# चार ललित पुस्तके आणि एक आत्मवृत्त :

वि. शं. पारगांवकर

नुकतीच पाच पुस्तके वाचून झाली. त्यामध्ये तीन कादंबऱ्या, एक आत्मचरित्र (आत्म वृत्त) आणि एक कथासंग्रह आहे. ती नुकतीच म्हणजे १९८२ आणि १९८४ या सालात प्रसिद्ध झालेली आहेत. या पुस्तकांवरून आजची ललित साहित्याची दिशा आणि वाटचाल यांची कल्पना येते. साहित्यातील या पाच पुस्तकांवर एकत्रितपणे लिहावयाचे ठरविले असले तरी त्यांच्यामध्ये ललित वाङमय या साहित्य प्रकाराव्यतिरिक्त दुसरे कोणतेही साम्य नाही. एक साम्य मात्र निश्चितपणे जाणवते ते म्हणजे या साहित्य कृतींचा जो एक प्रवास आहे, त्यामध्ये 'व्यवसाय' ही एक ठळकपणे लक्षात राहण्यासारखी गोष्ट आहे. 'रथ' रंगनाथ पठारे, 'वसेचि ना' रघू दंडवते, 'मेलेलं पाणी' अशोक व्हटकर या तीन कादंबऱ्या. रुस्तुम अचलखांब यांचे 'गावकी' हे आत्मचरित्र आणि ह. मो. मराठे यांचा 'घोडा' हा कथासंग्रह. यातील प्रत्येकाचे रूप आपापल्या परीने वेगळे आहे. यातील विसू पढेगावकर 'वसेचिना', यल्लापा ढोर 'मेलेलं पाणी', रावसाहेब निकम 'रथ' त्या तिन्ही कादंबऱ्यांमधील ही प्रमुख पात्रे. या तिघांचाही एक व्यवसाय आहे. मराठीमध्ये मुख्यव्यक्तींच्या व्यवसायांवर आधारलेली कादंबरी क्वचितच लिहिली गेलेली आहे.

कादंबरीमध्ये अथवा कथेमध्ये कोणी ना कोणी तरी काही ना काही व्यवसाय करीतच असतो; पण तिचा किंवा त्याचा तो व्यवसाय पार्श्वभूमी म्हणून वापरला गेलेला आहे.

## रथ–प्रत्ययकारी

बंगालचे प्रसिद्ध कादंबरीकार यांच्या कादंबऱ्यांमध्ये एक 'सव्यसाची' आणि काहीसे 'शेषप्रश्न' सोडली तर व्यक्तिरेखेचे जीवन एखाद्या व्यवसायाभोवती गुंफलेले क्वचितच दिसले; परंतु या तीन कादंबऱ्यांमधून व्यवसायाचे चित्रण अत्यंत ठळकपणे चित्रित करण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर व्यवसायाला प्रमुख कल्पून त्यामध्ये गुरफटलेल्या व्यक्तींच्या जीवनाची ससेहोलपट किंवा नाटच निर्माण केले गेले आहे. 'रथ'मध्ये रावसाहेब निकम हे एक नामवंत लेखक आहेत. ललित लेखन ही एक कला जरी असली तरी आजच्या काळात या कलेकडे व्यवसाय म्हणून देखील पाहिले जाते. सर्व प्रकारच्या लेखन प्रवृत्ती आणि साहित्यातील निरनिराळे प्रवाह हाच मुळी या कादंबरीचा विषय आहे आणि या प्रवाहाच्या निमित्ताने निर्माण होणारे नाट्य, निरनिराळे ताण हा या कादंबरीचा स्थायीभाव आहे. जसे रावसाहेब निकम साहित्यामधल्या एका प्रवाहाचे प्रतिनिधी आहेत तसेच भाऊसाहेब हे दुसऱ्या एका प्रवाहाचे प्रतिनिधी आहेत. या कादंबरीत विषय साहित्य समेलनाचा आहे. साहित्यातील सर्व प्रवाह या साहित्यसंमेलनाच्या दिशेनेच चालू असतात.

असा प्रवास चालू असताना निरनिराळ्या साहित्य प्रवाहांचा, तसेच साहित्यामधील कंपूशाहीचा सर्व प्रकारच्या ताणामधून एक साहित्यविषयक विश्वाचा ठसा उमटविण्याचा या ठिकाणी प्रयत्न दिसतो म्हणून या कादंबरीचा विषय एका दृष्टीने नवाच आहे. तिचे रूप एखाद्या दैनंदिनीसारखे आहे. या दैनंदिनीची सुरुवात ९ एप्रिल १९८३ पासून होते आणि तिचा शेवट, ३ मे १९८३ ला होतो. हे शेवटचे डायरीतील पान गोदानगर येथील साहित्य संमेलनावर आधारलेले आहे. तो समारोपाचा दिवस.

परंतु विषयाच्या आणि निवेदनाच्या दृष्टीने या कादंबरीतील नाविन्य जरी ठळक असले तरी ती मधील हालचाली आणि साहित्यविषयक विचारप्रवाह यांना ललित कृतीचे रूप लाभू शकलेले नाही. एखादे विचारप्रधान नाटक जसे असते (Dialogue Play) तसे काहीसे स्वरूप या कादंबरीचे आहे; परंतु असे असले तरी तीमधील काही व्यक्तिचित्रे जिवंत होऊन वावरताना दिसतात. आपल्याच मस्तीत, आपल्याच तंद्रीत, कसल्या तरी विचारांनी झपाटल्यासारखी वावरताना दिसतात. मात्र त्यामुळे त्या व्यक्तिचित्रांच्या आयुष्यात विशेष काही घडतं असं नाही, तसेच कादंबरीतील लेखकांच्या लेखन प्रवासातही काही घडते असेही नाही; पण ती व्यक्तिचित्रे आपले मन मात्र वेधून घेताना दिसतात. त्यांपैकी एक व्यक्तिचित्र बापूराव या कलंदर लेखकाचे आहे. एका इराण्याच्या हॉटेलमध्ये बसून हे बापूराव अनंत प्रकारच्या गोंगाटात लिहिण्याची तंद्री लावून बसलेले असतात. त्यांच्या जीवनातले काही क्षण मोठ्या प्रत्ययकारी आणि प्रभावीपणे भावसौंदर्याचे दर्शन घडवून जातात.

पण असे सर्वच व्यक्तींच्या बाबतीत घडत नाही. उदाहरणार्थ रावसाहेब निकम यांच्या बाबतीत अशी गोष्ट घडताना दिसत नाही. त्यांच्या हालचाली, त्यांचे व्यवहारी शहाणपण, त्यामध्ये अगदी सहजपणेच येणारे राजकारण आणि त्यांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी या सर्वांचे दर्शन जरी घडत असले तरी त्याला भावसौंदर्याची कलात्मक किनार लाभताना दिसत नाही. ते एक केवळ काही तरी घडण्याच्या, घडवून आणण्याच्या लेखकाच्या लेखन प्रवासातील ठळक वाटसरू वाटतात. त्यांच्या व्यक्तिचित्रामध्ये देखील कादंबरीला आवश्यक असणारे भावसौंदर्य काही ठिकाणी प्रत्ययास येते, पण ते तेथेच पुन्हा गोठून जाते. अशा भावसौंदर्याचा एक नमुना म्हणून रावसाहेब, त्यांची बहीण (खेड्यातून आलेली) सरूबाई आणि भाची जना, यांचे सारे भावजीवन आणि चित्रण

अत्यंत जिवंतपणे रेखाटले गेले आहे. त्या चित्रणामधील संयम आणि सूचकता विशेष प्रकर्षाने लक्षात येते. काहीही न सांगतादेखील त्यां तिघांमधील भावजीवनाचे ताण आणि त्यामधून अगदी सहजपणे विकसित झालेले नाट्य, यांचा परिणाम झाल्यावाचून राहात नाही. (पान ७६). तेवढ्याच निर्जीव निवेदनाचा नमुना म्हणून पान ५१ वरील रावसाहेबांच्या, गोखले यांच्या कथासंग्रहाच्या निमित्ताने, त्यांच्या मनःस्थितीचे वर्णन केलेल्या निवेदनाचा परिच्छेद वाचकांनी वाचून पाहावा.

थोडक्यात म्हणजे ही कादंबरी नवे काही देण्याचा प्रयत्न करते, परंतु तिचा तो प्रयत्न पुरेशा कलात्मक पातळीवर जात नाही.

## मेलेलं पाणी–वंचित समाजाचं चित्र

दुसरी कादंबरी 'मेलेलं पाणी'. अशोक व्हटकर यांनी ती लिहिली आहे. 'मेलेलं पाणी' हे एका विशिष्ट पातळीवर जीवन जगणाऱ्या समाजाचं प्रतीक आहे. एका धर्माच्या समाजात अनेक जातीपातींचे, स्पृशास्पृश्यतेचे, गोठून राहिलेल्या गटांचे जीवनचित्रण करणाऱ्या कथा–कादंबऱ्या गेल्या काही वर्षात प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यामधीलच एका ढोर समाजजीवनाचे चित्रण 'मेलेलं पाणी' या कादंबरीत केलेले आहे. यल्लाप्पा ढोर आणि त्याचे कुटुंब हा जरी या कादंबरीचा विषय असला तरी तेवढ्याच मर्यादेवर ही कादंबरी राहात नाही. प्रतिष्ठित समाजाच्या बाहेरचं वंचित जीवन जगणाऱ्या या अवघ्या समाजाचं चित्रण ही कादंबरी करते. तिच्यामध्ये वैयक्तिक जीवनातील जसे ताण आहेत तसेच ती व्यक्ती आणि तिचा समाज यांच्यामधीलही ताण आणि त्या ताणांची भावचित्रे या कादंबरीत दिसतात. तसेच गावाबाहेरचा वंचित समाज आणि गावगाडा आणि त्या गावगाड्यातील प्रतिष्ठित समाज यांच्यामध्येदेखील अनेक ताण आहेत. त्यामधील बरेच ताण जातीविषयक तुच्छता, आर्थिक स्वास्थ्याचे कोश, प्रतिष्ठेच्या जुन्या कळकट कल्पना तसेच गलिच्छ राजकारणाचे मानवी समाज जीवनावर पडणारे दडपण, सामाजिक सुधारणेचा सर्वत्र पडलेला अंधार आणि त्यामधून वाट काढताना व्यक्तीच्या आणि समाजाच्या जीवनाची होणारी ससेहोलपट, हे सर्व विषय या कादंबरीत कमी अधिक परिमाणे घेऊन येतात.

तसेच जीवनाबद्दलची आसक्ती, त्या आसक्तीमधून निर्माण होणारी महत्त्वाकांक्षा आणि या महत्त्वाकांक्षांच्या पूर्तीसाठी असलेले प्रतिकूल वातावरण, त्या वातावरणामुळे एकमेकांच्या महत्त्वाकांक्षेमध्ये होणारे घर्षण, त्या घर्षणामधून उडणाऱ्या ठिणग्या आणि येणारी दारूण निराशा. या सर्व घटकांचे चित्रण करण्याचा प्रयत्न ही कादंबरी करते. ढोर जमातीतील माणसांच्या वाट्याला येणारे दुःख आणि त्यामधून बाहेर पडण्याच्या वाटा प्रतिष्ठित समाजाने बंद केलेल्या असल्यामुळे जीवनावर पसरलेल्या निराशेची अवकळा हा देखील या कादंबरीचा स्थायीभाव म्हणता येईल. मनुष्याजवळ असलेल्या पैशाने सर्व प्रश्न सुटतातच असे नाही. अज्ञान, दारिद्रय, सामाजिक विषमता यामुळे जीवन कधीही बाहेर न पडू शकणाऱ्या तुरुंगात बंदिस्त होऊन पडते आणि ही शिक्षा खऱ्या अर्थाने जन्मठेपेचीच असते. मात्र ही शिक्षा कोण्या एका न्यायाधिशाने दिलेली नसते तर माणसानेच माणसाला, एका समाजाने दुसऱ्या समाजाला दिलेली असते. न्यायाचे हात कितीही लांब असले तरी इथपर्यंत पोहोचू शकत नाहीत.

या कादंबरीत तसे धर्मभावनेचे आणि अंधश्रद्धेचे सूचक देखील उल्लेख नाहीत. भोळी धर्मभावना आणि रुढींचे बंधन यांच्या विळख्यामध्ये देखील आजच्या विसाव्या शतकातील मानवी जीवन करकचलेले दिसून येते. एखाद्या अमली पदार्थाच्या गुंगीमध्ये जसे जीवन बधिर होते आणि त्याचे दुष्परिणाम होऊन देखील माणूस त्यातच अडकून पडलेला दिसतो आणि जीवनाची ही केविलवाणी; परंतु अपरिहार्य अगतिकता तशी भयानक असते. 'मेलेलं पाणी' या कादंबरीत एका पातळीवर या जीवन चित्रणाचा पदर आला असता तर तिचे प्रत्ययकारित्व अधिक परिणामकारक झाले असते असे वाटते.

एका कुटुंबाचा आणि त्या समाजाचा जीवनपट आखलेला जसा या कादंबरीत दिसतो त्याच प्रमाणात ही कादंबरी अधिक कलात्मक पातळीवर गेलेली दिसली असती तर तिच्या यशात खूपच भर पडली असती; परंतु एखाद्या कलाकृतीला आवश्यक असलेल्या सौंदर्य निर्मितीचा येथे संपूर्ण अभाव दिसतो. ही मोठी गंभीर बाब वाटते. गेल्या काही वर्षात ज्या अशा प्रकारचे जीवन रंगविणाऱ्या कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत त्यामध्ये मी म्हणतो अशा सौंदर्य निर्मितीच्या प्रयत्नांचा अभावच दिसतो. याचे कारण लेखकाची प्रतिभाच म्हणावी लागेल. कलाकृतीच्या निर्मितीला ज्या प्रतिभेची आवश्यकता असते तशी प्रतिभेची देणगी लाभल्याचे या कादंबरीकारात कोणी दिसत नाही असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

वर मी जे उपस्थित केलेले प्रश्न आहेत, ते सारे प्रश्न अशा कादंबऱ्यांच्या विषयात निश्चितपणे चित्रित झालेले दिसतात; परंतु त्यांचे स्वरूप भावाकृतींचे रुप घेताना क्वचितच दिसते. हा एक मोठा दोषच म्हणावा लागेल. हे सारे प्रश्न केवळ वैचारिक पातळीवरच स्थिर राहतात. फारच झाले तर वैचारिक संघर्षामधून जेवढे नाट्य निर्माण होऊ शकते तेवढे ते इथे निर्माण झालेले फक्त दिसते. त्याच्या वरची पातळी म्हणजे भावनाट्याची प्रचिती येथे येत नाही. हे एक मोठे वैगुण्य तर खरेच, परंतु ते वैगुण्य Great but failure अशा पातळीवर देखील जाताना दिसत नाही. अशा कादंबऱ्यांमधून जे कथानक येते त्याची इमारत देखील वैचारिक पातळीवरच उभारलेली दिसते. उदाहरणार्थ व्हटकर यांनी या कादंबरीमध्ये प्रेमाचा एक धागा शेवटपर्यंत ताणीत नेला आहे. याचा ताण कादंबरीत कुठेच निर्माण होत नाही. (बापूचे प्रेमप्रकरण) उलट त्यामुळे कादंबरीच्या इतर परिमाणांना धक्का बसतो. त्यांचा तोल बिघडतो व कादंबरीत अकारण कृत्रिमता येते आणि ती मध्ये मध्ये उगीचच रोमँटिक: कल्पनारम्य रूप घेऊन वावरताना दिसते.

कादंबरी एक कलाकृती असते, तिच्या काही प्रतिज्ञा असतात आणि या प्रतिज्ञा सांभाळण्यासाठी ज्या घटकद्रव्याची आवश्यकता असते याचे भान अशा प्रकारची कादंबरी लिहू धजणाऱ्या लेखकांना नसते असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. समाजजागृती, वैचारिक जागृती सांस्कृतिक जागृती अशा काहीशा फसव्या संकल्पना उराशी बाळगून हे लेखक ललितकृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात ही तितकीशी आशादायक गोष्ट

खरोखरच नाही, याची जाणीव लेखकांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे असे वाटते.

## गावकी–आत्मवृत्त

'गावकी' हे रुस्तुम अचलखांब यांचे आत्मवृत्त. त्याला आत्मवृत्त अशासाठी म्हणावयाचे की 'गावकी' हे अचलखांब यांच्या जीवनाचे सर्वव्यापी चित्रण नव्हे. कारण तेच आपल्या सुरुवातीच्या मनोगतात म्हणतात त्याप्रमाणे:

'लक्ष्मी कॉलनी औरंगाबाद इथं वास्तव्य करत असताना मीं डॉ. गंगाधर पानतावणे यांच्याकडे नेहमीच जायचो. त्यांच्याबरोबर गप्पा मारीत असताना, मी कसा त्रास सहन केला, गावच्या कुणब्यांचा अन् महारांचा कसा संघर्ष व्हायचा हे त्यांना सांगायचो. पानतावणे मला म्हणायचे, तुम्ही हे सगळं लिहून काढा. कारण तुम्ही जोपर्यंत तरुण आहात तोपर्यंतच या सर्व गोष्टी तुमच्या स्मृतीत राहणार. जास्त काळ लोटल्यावर स्मृती पुसट होण्याची शक्यता असते. मलाही ते पटले आणि मी लगेच लिहिण्यास सुरुवात केली.'

म्हणजे तरुणपणीच मनावर उमटलेल्या लहानपणींच्या आठवणी असे या आत्मवृत्ताचे स्वरूप म्हणता येईल. त्यानही पुन्हा 'कुणब्यांचा आणि महारांचा संघर्ष' हा या आत्म वृत्ताचा केन्द्रबिंदू. म्हणजे जातीय अथवा सामाजिक संघर्षामधून उमटलेल्या प्रतिक्रियांचा एका व्यक्तीच्या मनावर कोरला गेलेला परिणाम असेही या आत्मवृत्ताचे दुसरे रूप असू शकेल.

या आत्मवृत्ताची सुरुवात त्यांच्या वडिलांच्या दारू पिण्याच्या सवयीपासून झालेली आहे. आणि त्याचा शेवट त्यांचे वडील मृत्यू पावतात तेथे होतो. त्यांच्या वडिलांचे आपला मुलगा शिकन त्याने मास्तर व्हावे असे स्वप्न असते. पुढे अचलखांब म्हणतात, 'बा जिता असता आन् त्यानं पाह्यलं असतं की, म्या कायी बुकं सिकून बामणाच्या पोरास्नी सिकिवतुया तर त्याचं काळीज लई मोठं झालं असतं. समद्या जात पंचायतीला सांगित फिरला असता. आरं महा रुस्तुमा मोठमोठ्या बामनायच्या पोरास्नी सिकिवतुया.' ही भावना आणि हे उद्गारही त्यांच्या आत्मवृत्त लिहिण्याच्या मुळाशी आहेत. अशा रीतीने हे आत्मवृत्त आपला एक छोटा अनुभवकोश घेऊन मराठी वाङमयात प्रवेश करते.

अलिकडे दलितांनी लिहिलेली बरीच आत्मचरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत, या आत्म चरित्रांच्या लेखनाकडे सामाजिक दृष्टिकोनातून पाहता त्यामधून उमटलेला एक आलेख समाजातील संघर्षमय विषमतेची एक जिवंत जाणीव वाचकांच्या मनात निर्माण करतो यात शंकाच नाही; परंतु ही आत्मचरित्रे वाचीत असताना मनात नेहमी एक प्रश्न उभा राहतो, तो असा की या व्यक्ती आपल्या आत्मचरित्राच्या माध्यमातून स्वतःकडे पाहतात का या निवेदनाच्या माध्यमातून स्वतः-भोवतीचे समाजदर्शन घडवितात ? हा प्रश्न जितका गुंतागुंतीचा आहे तेवढाच तो महत्त्वाचा आहे. कोणत्याही व्यक्तीच्या आत्मचरित्रामधून तिच्याभोवतीचे तत्कालीन समाजदर्शन घडणारच. ही गोष्ट जेवढी अटळ आहे तेवढीच ती अपरिहार्य आहे. स्वतःकडे पहात असताना किंवा स्वतःलाच लेखांकित करीत असताना, त्या 'स्वतः 'चेच वैशिष्ट्यपूर्ण रूप दृष्टीस पडावे ही गोष्ट अगदी अपरिहार्य आहे आणि तितकीच ती महत्त्वाची आहे असे वाटते. कॅमेऱ्याच्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीचे छायाचित्र जेव्हा काढले जाते, तेव्हा तिच्या आवती–भोवतीचा परिसर आणि पार्श्वभूमी म्हणून तिच्या पाठीमागचा परिसर छायांकित होणे अपरिहार्य असते. परंतु त्यामुळे मूळ व्यक्तीच्या केन्द्रबिंदूला धक्का बसत नाही. तसेच कोणत्याही आत्मचरित्राच्या बाबतीत असते तेच खरे आहे.

परंतु अलिकडे दलित वर्गातील काही व्यक्तींनी लिहिलेली आत्मचरित्रे स्वयंकेंद्रीत वाटत नाहीत. आपल्या जीवनाचा गाभा आणि त्याचे केंद्र हे अशा आत्मचरित्र लक्षणीय वाटत नाही. त्यामधून समाजाचे प्रतिबिंबच अधिक आग्रहाने उमटत असल्याचे दिसते. याला अपवाद फक्त श्री. शंकरराव खरात यांच्या आत्मचरित्राचा आहे. त्यांच्यावरील माझ्या लेखात मी हे माझे मत व्यक्त केलेच आहे. आपल्या आत्मचरित्रातून खरात हे संपूर्णपणे व्यक्त होताना दिसतात. याचे कारण असे दिसते की, शंकररावांनी आपले आत्मचरित्र त्यांना आपल्यातला मी संपूर्णपणे प्रतित झाल्यावरच ते लिहिले आहे. अलिकडे लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांचा जीवनपल्ला फार लहान आहे. त्यांच्या जीवनाच्या दृष्टीने आणि जीवनात त्यांना येणाऱ्या अनुभवांच्या दृष्टीनेही हा पल्ला फार तोकडा, म्हणजे आखूड आहे.

जसे अचलखांब यांचे झालेले आहे, तसेच 'उपरा', 'बलुतं' आणि इतर आत्मचरित्रांच्या बाबतीत झालेले आहे. या लेखकांनी केवळ आपले अनुभव व्यक्त केलेले आहेत. स्वतःमधल्या 'मी' चा त्यांना शोध घेता आलेला नाही. हे अशा आत्मचरित्रांचे मी अपयशच समजतो आणि त्यांना आत्मवृत्त म्हणतो.

## वसेचिना – सर्वार्थाने निराळी

अचलखांब यांच्या आत्मवृत्तानंतर माझ्या पुढे येते ती एक कादंबरी. रघू दंडवते यांची 'वसेचिना' ही कादंबरी. कादंबरीच्या पृष्ठ क्रमांक चारवर या कादंबरीची थोडीशी ओळख करून देण्याचा प्रयत्न झालेला आहे. विसू पटेगावकर याचे गाव काही केल्या वसतच नाही. या अनुषंगाने विसू पटेगावकरला भालचंद्र नेमाडे यांच्या किंवा भाऊ पाध्ये यांच्या पांडुरंग सांगवीकर आणि अनिरुद्ध धोपेश्वरकर यांच्या पंगतीला नेऊन बसविलेले आहे; परंतु तेवढी ताकद अनेक पैलूंवरून विचार करूनदेखील विसू पटेगावकर या व्यक्तिचित्रात किंवा कादंबरीच्या चित्रणात दिसत नाही; परंतु असे असले तरी 'वसेचिना' या साहित्यकृतीचा पोत निराळा वाटतो.

ही साहित्यकृती चित्रण करते ती विसू पटेगावकर या सामान्यजनांपैकी एक अशा व्यक्तीचे. त्याला नायक होण्याचे भाग्य कधीच लाभत नाही आणि ती त्याची महत्त्वाकांक्षा देखील नसते. हा विसू एका आडशहरातून सामान्य शिक्षण घेऊन मुंबईला एका महानगरात प्रवेश करतो आणि मिळतील तेथे नोकऱ्या करीत राहतो. त्याचे जीवन कुठेच स्थिर नसते. एक कंटाळवाणा व्यवहार म्हणून तो या आपल्या भोवतीच्या जगाकडे पाहतो. काम करून चार पैसे मिळविणे आणि पोट भरणे. मिळेल त्या वेळात परंतु चाकोरीतच भटकंती करणे. मित्रमंडळी नसतातच पण सहवासात येतील त्या व्यक्तींमध्ये मिसळणे

एवढेच; पण त्या मिसळण्यात देखील ओलावा किंवा आत्मीयता, उत्कटता वगैरे काही नसते. एखाद्या प्रवाहप्रतिताप्रमाणे या साऱ्यांच्या जीवन प्रवाहात त्याचाही एक जीवनप्रवाह मिसळून जातो. या प्रवाहावर तो कधी मात करताना दिसत नाही किंवा ज्यावेळी तो या प्रवाहापासून दूर असतो तेव्हा त्या अवस्थेतही त्याला कधी हुरहूर लागलेली दिसत नाही. काही दिवस तो आपल्या बहिणीकडे राहतो; पण तेथेदेखील त्याच्या मनात नात्यांविषयी उत्कटता दिसत नाही. सर्व बाजूंनी तो निर्लेप, अलिप्तच वाटतो. तो ज्या ऑफिसमध्ये काम करतो, त्या जगाशीदेखील तो समरस होताना दिसत नाही. लेखक मात्र या जगाचे सर्व पैलू मोठ्या मार्मिकपणे टिपताना दिसतो; पण विसूच्या स्वभावाचे किंवा वृत्तींचे चित्रण मात्र तो अगदी अलिप्तपणे करतो. हे या कादंबरीचे यशही म्हणता येईल तसेच अपयशही म्हणता येईल !

परंतु प्रथमदर्शनी हे जरी अपयश वाटत असले तरी खरे ते आपशय नसते. कारण असे चित्रण करीत असताना विसूच्या जीवनाचे अथवा जीवनविषयक दृष्टीकोनाचे अनेक पैलू उलगडून दाखविण्याचे सामर्थ्य या चित्रणात असते. विसूचा थंडपणा, जगाकडे आणि त्यातील व्यवहाराकडे अगदी अलिप्तपणे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन या चित्रणातून व्यक्त होत असतो. विसूला जशी आपल्या बहिणीविषयी ओढ नसते तसेच आपल्या आईबापाविषयी अथवा भावाविषयी काही ओढ नसते. एका जीवनप्रवाहात तो अडकलेला दिसतो. त्याला ते तसे अडकून पडणे आवडत नसते तसेच तो त्यामधून आपली सुटका करून घेण्यालादेखील असमर्थ असतो. जे जीवन त्याच्या वाट्याला आलेले असते त्या जीवनाविषयी त्याच्या मनात ओढ किंवा आकर्षण नसते, तसेच ते जीवन झिडकारून टाकण्याची ताकदही त्याच्यात नसते. अशा मोठ्या विचित्र परिस्थितीत तो जीवन जगत असतो. तसेच त्याचे जीवन इतके क्षुल्लक असते की त्यामुळे त्याच्यातून जीवनविषयक मोठमोठे अर्थ काढण्याची, तसेच त्याचे एक तत्त्वज्ञान बनविण्याची त्याच्या जीवनाला ओढच नसते.

अशा एका कोरड्या व्यक्तिमत्त्वाची, त्याच्या अगतिकत्वाची आणि अशा रीतीने जीवनाच्या निरर्थकत्वाची जाणीव विसूच्या रूपाने या साहित्यकृतीत निर्माण होते आणि हीच जाणीव या कादंबरीत महत्त्वाची ठरते. समाजाची धारणा, नीतीतत्त्वांचा उदय किंवा त्यांची आवश्यकता, माणसांचे स्वभाव, त्या स्वभावामधून जीवनाविषयी निर्माण होणारी ओढ याविषयी विसूच्या मनातील जाणिवा अगदी क्षीण आहेत. तो आपला जगत असतो, पण त्या जगण्यात त्याला स्थिरत्व लाभत नाही. असे एक सर्वार्थाने निराळे जीवन उभे करण्याचा प्रयत्न या कादंबरीत जाणवतो. आणि तो प्रयत्न आपल्या विचारांना चालना देण्याइतका वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि याच दृष्टीने या कादंबरीकडे पाहिला पाहिजे असे मला वाटते.

## घोडा–अपुरी शक्ती

कोणत्याही ललित साहित्य कृतीत जीवनानुभव कलात्मकतेने मांडलेला असतो. ललित साहित्य कृतीच्या कोणत्याही प्रकारातून अशा रीतीच्या अनुभवाचा साक्षात्कार व्हावयाला पाहिजे. तसे झाले तरच ती साहित्यकृती कलाकृती म्हणून ओळखली जाते आणि हेच तत्त्व आता सर्वमान्य झालेले दिसते; परंतु अलिकडे जे जे लेखन किंवा लेखक उदयाला येत आहेत त्यांच्या मनात किंवा त्यांच्या साहित्यविषयक दृष्टिकोनात बरेच संभ्रम निर्माण झालेले दिसतात. याची कारणे अनेक असू शकतात. अलिकडे सर्वच जीवन निरनिराळ्या स्तरांवर प्रगल्भ झालेले दिसते. याचे कारण समाजाच्या जाणिवा सर्वच स्तरावरील जीवनाविषयी तीव्र झालेल्या दिसतात. मनुष्याचे मन प्रगल्भ झालेले नसले तरी सजग झालेले दिसते. सामाजिक, नैतिक आर्थिक, वैज्ञानिक, राजकीय, तांत्रिक इत्यादी क्षेत्रांविषयी माणूस जागा झाला आहे. त्यामुळे त्याच्या मनात जीवनाविषयी अनेक समस्या त्याला घेरीत असतात. कित्येक वेळा या समस्या त्याला अस्वस्थ करतात. विषमतेतून त्याच्या मनात विद्रोह प्रगट होतो. नव्या यंत्रयुगामुळे त्याच्यावर बेकार होण्याची पाळी येते. इतिहासाकडे पाहण्याच्या त्याच्या दृष्टीमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या शंका निर्माण होतात. विज्ञान-युगाच्या अहर्निश चाललेल्या प्रगतीमुळे त्याचे मन धक्के खात असते.

यामुळे कलाव्यवहार आणि जीवनव्यवहार यांच्या झगड्यांमध्येच त्याचे मन अडकून पडते. आणि तत्त्वशोधक वृत्तीच्या अभावामुळे तो केवळ वरवरच्या जीवनदर्शनामुळेच अस्वस्थ होतो. कित्येकदा निराश होतो तर अनेकदा विद्रोही बनतो. आणि या साऱ्या सवंग प्रतिक्रियाच त्याला जीवन वाटतात. परंतु असे वरवरचे, प्रतिक्रियांमधून व्यक्त झालेले जीवन हे खरे जीवन नसते आणि अशा जीवनाचा कलेच्या आविष्काराला काहीही उपयोग नसतो. वरील चारही ललित साहित्याच्या पुस्तकांमधून हा दोष दिसतो आणि त्याच प्रकारचा दोष 'घोडा' या ह. मो. मराठे यांच्या कथासंग्रहामधूनही प्रत्ययाला येतो. या कथासंग्रहाने जीवनाचा एक नवीन स्तर वाचकांपुढे उभा केला आहे. या देशात नवीन कारखानदारी उदयाला आली, तसेच वृत्तपत्र व्यावसायिकांचे एक नवे जग तीव्रतेने सजग दिसते. पन्नास वर्षांपूर्वीचे वृत्तपत्रांचे जग आणि आजचे जग यामध्ये मूल्यात्मक फरक स्पष्ट जाणवण्याइतका पडलेला आहे पूर्वीची वृत्तपत्रातील मूल्ये ही स्वातंत्र्यपूर्व काळातील होती. त्या मूल्यामागे काही निष्ठा होत्या त्याचप्रमाणे त्यागाची भावनाही होती. जीवनातील सत्याचा आधार घेऊन आणि होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार म्हणून ही वृत्तपत्रे चालविली जात. आज तो साराच दृष्टिकोन बदलेला आहे. जुन्यांच्या आत्मचरित्रातील भाग देखील आजची वृत्तपत्रे मोठ्या चवीने छापताना दिसतात. त्यांच्या व्यवहारातील व्यावसायिक निष्ठेचे स्वरूप नष्ट होऊन त्यांना आज शुद्ध व्यावसायिक स्वरूप आलेले दिसते.

ह. मो. मराठे यांच्या 'घोडा' या संग्रहातील कथा अशाच वृत्तपत्रांच्या आणि कारखानदारीच्या जगावर आधारलेल्या आहेत. या विस्तारलेल्या नवीन जगाचे अवलोकन, मनन आणि त्यावरील तत्त्वचिंतनाला आज महत्त्व प्राप्त झालेले आहे हे तर खरेच; परंतु या जगातील वरवर दिसणाऱ्या जीवन व्यवहाराचे चित्रण जेव्हा कलाबद्ध करण्याचा प्रयत्न ह. मो. मराठे करतात तेव्हा त्या जीवनाचा आणि जीवनव्यवहाराचा पाया घट्ट नसल्याचा अनुभव येतो. त्यांना तो आलेला आहे की नाही हे समजण्यास मार्ग

नाही; पण तरीही त्यांच्या कथेतील नाविन्य एक प्रकारची ओढ मनाला लावून जाते हे मात्र खरे. त्याची अनेक कारणे असू शकतील. त्यामधील एक म्हणजे कथाविषयाचे नाविन्य. तसेच त्यांची कथा रोकठोक घटना घेऊनच अवतरते. त्या घटना कित्येक वेळा नाटयरूप घेऊन येतात, तर कित्येक वेळा त्यांच्याभोवती एखाद्या गूढतेचे वलय असते. 'सस्पेन्स' हा त्यांच्या बहुतेक कथांचा केंद्रबिंदूच असतो. त्यांची कथा बऱ्याच वेळा वातावरण निर्मितीचा प्रयत्न करताना दिसते; परंतु व्यक्तीच्या अंतर्मनाकडे लेखकाची ओढ नसल्यामुळे त्यांनी निर्मिलेले वातावरण जिवंत होऊन येत नाही, तर ते केवळ निवेदनाच्या चौकटीतच अडकून पडलेले दिसते. त्यांच्या 'मशीन' किंवा 'हुतात्मा' या कथांचा उल्लेख त्या दृष्टीने करता येण्यासारखा आहे.

वरवरच्या घटना, ढोवळ प्रसंग आणि पारंपारिक आशय या त्रयीमध्येच त्यांच्या बहुतेक कथा अडकून पडलेल्या आहेत. अनेक वेळा जीवनप्रवाहाचा वरचा स्तर भेदून जाण्याची ताकद त्यांची कथा दाखवीत नाही. जीवनाच्या अनेक स्तरांवरून एका व्यामिश्र गुंतागुंतीच्या मनाकडे वळून त्याचे भेदक दर्शन घडविण्यास त्यांच्या कथेची शक्ती अपुरी पडते असे त्यांची कथा वाचताना सारखे वाटत राहते. त्यामुळे 'हुतात्मा' या कथेतील शंकर निसळ याचे बलिदान आणि शांताराम निसळचे स्वतःला जाळून घेणे मनाला चटका लावून जात नाही किंवा वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्यही प्रकट करीत नाही.

असे का होते ? एका नव्या आणि सजग जगाला सामोरे जाण्याची धिटाई त्यांची कथा दाखविते आणि एका नव्या प्रकारच्या जीवनानुभवाच्या क्षेत्रात ती वावरताना दिसत असली तरी वास्तवाच्या ध्यासाने वेडावली असल्याचे स्पष्टपणे जाणवते. वास्तववादाने पछाडलेले लेखन आजकाल मराठीमधून विपुल प्रमाणात होत आहे. परंतु वास्तववादाची खरी संकल्पना अजून त्याना समजलेली दिसत नाही. असे किती तरी लेखन आज मराठीतून होत आहे. जयवंत दळवी, भाऊ पाध्ये आणि विजय तेंडुलकरांचे इतकेच नव्हे तर भालचंद्र नेमाडे यांचे ललितलेखन देखील या तथाकथित वास्तववादाच्या पार्श्वभूमीवर उभे असलेले आज दिसते. तसाच एक वास्तववाद ह. मो. मराठे यांच्या कथांमधूनही दिसतो; परंतु केवळ वास्तववादी दृष्टीकोनातून कलेची निर्मिती होत नाही. निरनिराळ्या प्रकारचे अन्न खाऊन पोट भरते; परंतु पोटामध्ये या अन्नाचा रस होऊन त्याचे रूपांतर जेव्हा रक्तात होते तेव्हाच मनुष्याच्या शरीरात चैतन्यनिर्मिती होते. अन्नाला वास्तववाद म्हटले तर रक्तनिर्मिती ही त्या अन्नाची कलेत होणारी निर्मिती समजावी लागेल ! तेव्हा आजचे हे एका वास्तववादी दृष्टिकोनातून लेखन करणारे लेखक फक्त शिजविलेल्या अन्नाचीच निर्मिती करतात असे मानावे लागेल. कला निर्मितीची ताकद त्यामधून प्रत्ययाला येत नाही. कलानिर्मितीचा आनंद हा एक प्रकारे चैतन्यदायी अनुभव असतो.

असा निर्लेप आणि केवलास्वादी अनुभव ह. मो. मराठे यांच्या कथेमधून मिळत नाही; परंतु असे असले तरी त्यांनी पारंपारिक जीवनाची कोंडी निश्चितच फोडली आहे यात वाद नाही आणि त्या एकाच परंतु एक पदरी जीवनाकडे पाहून देखील समाधान वाटायला हवे आणि असे समाधान त्याची कथा काही विशिष्ट प्रकारच्या वाचकांना देत असणार हे निश्चित ! ✻

१ – मेलेलं पाणी
लेखक : अशोक व्हटकर
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
मूल्य ४५ रुपये.

२ – रथ
लेखक : रंगनाथ पठारे
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
मूल्य १८ रुपये.

३ – गावकी
लेखक : रुस्तुम अचलखांब
श्रीविद्या प्रकाशन, पुणे
मूल्य २० रुपये.

४ – वसेचिना
लेखक : रघु दंडवते
प्रास प्रकाशन, मुंबई
मूल्य ४२ रुपये.

५ – घोडा
लेखक : ह. मो. मराठे
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई – ४
मूल्य ३५ रुपये.

□

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# मुलांच्या दैनंदिनीतून

मुलं होण्यापूर्वी घेतलेला हा निर्णय होता का नाही आठवत नाही; पण मुलांची दैनंदिनी बऱ्याच सातत्यानं लिहिली आहे ती वाचताना फार गंमत वाटते.

अगदी सुरुवातीच्या दिवसात तो उठला केव्हा, झोपला केव्हा, दूध कधी प्यायला, शी केव्हा केली, औषधं कधी कोणती दिली ह्या नोंदी आहेत. अंघोळ केव्हा घातली हेही लिहिलंय आणि उत्साहानी त्याचं शारीरिक तपमानही लिहिलेलं आहे. वजन, उंची, लसटोचणी, आजार यांच्याबद्दलही लिहिलंय. हे वाचून आता वाटतं आपल्याला फारच उत्साह होता त्या काळात !

मूल जसजसं वाढायला लागतं तसतशी ह्या नोंदीत भर पडत जाते.

० भूक लागली की दोन्ही हात तोंडात घालायला बघतो. ह्या धडपडीत एखादं बोट तोंडात जातं. लगेच ते चोखायला लागतो.

० आज व्यवस्थित डाव्या हाताचा अंगठा चोखत होता नि इतर बोटांनी तोंड ओरबाडत होता.

० खांद्यावर उभं धरलं की गाल चाटत बसतो. त्याला वाटतं प्यायलाच घेतलंय.

० दूध पिऊन झालं की एकटा शांतपणे खेळत बसतो. रंगीत गोष्टी टक लावून पहातो.

० सारखं काही तरी हातानी घट्ट धरा-

यला हवं असतं. स्वतःचं जावळसुद्धा धरून ठेवतो.

० आज शू केली ती थेट स्वतःच्याच तोंडावर आणि मग लांबवर.

० आता हातांवर थोडा तावा आलाय नाही तर शिंक आली की त्याचे दोन्ही हात डोक्यावर आपटायचे.

० खांद्यावर घेतलं की तो डाव्या हातानी आपला गळा चिमटतो, ओरबाडतो.

० आजी त्याला 'छानी मुग्गी' म्हणते. मुलगी झाली असती तर छाना मुग्गा म्हणाली असती.

० तोंडानी आवाज काढायला लागलाय. ग, ग्या, उंगा, हं, अं म्हणतो. आवाज मोठा पण झालाय.

यानंतर पुढे सरकायला लागणं, माणसं ओळखणं, बसायला लागणं, रांगायला लागणं, चालायला लागणं, आपण म्हणू ते म्हणणं हे सगळं आहे.

जास्त समजायला लागलं की मुलांचे विनोद सुरू होतात. एक चिकूवाला रोज दारावरून जायचा. त्याचा आवाज ऐकून शोनील चप्पू चप्पू म्हणायचा. निवडणुकीच्या प्रचारासाठी लोक दारावरून ओरडत गेले तर शोनील चप्पू चप्पू म्हणून खिडकीकडे बोट दाखवत होता.

स्वतःचं नाव मुलांना समजायला लागतं असं आपण म्हणतो; पण सुरवातीला तो नुसताच स्वर कळत असतो. 'शोनील' अशी हाक मारली की शोनील पहायचा, तसं बोकील, झोपील, कोकीळ अशा हाका मारून पाहिल्या तरी तेवढ्याच तत्परतेनी पहायचा.

कशाचा संबंध कशाशी ते मुलाचं पक्कं व्हायला लागतं. दहा अकरा महिन्याचा असताना, बाजारातून आणलेल्या सामानात पिअर्स साबण होता तो पाहून शोनील लगेच 'आंदोळ' म्हणाला. नुसती भांडी पाहून भांडी घासायला येणाऱ्या बाईचं नाव 'इंदे' (इंदिरा) म्हणाला. दुसऱ्या गावी गेल्यावर त्यांच्याकडच्या बाई धुणं वाळत घालत होत्या त्यांना हा 'इंदे इंदे' म्हणायला लागला.

शेजारच्या बाई त्याला घरी नेऊन कुत्रा दाखवायच्या त्यामुळे त्या दिसल्या की लगेच त्यांना भू भू म्हणायचा. त्याचा एक खेळण्यातला सोनेरी हत्ती होता तो फुटला. त्याचा एक छोटासा तुकडा दिलास तर हा लगेच हत्ती हत्ती म्हणत होता.

अनुकरणातून शिकता शिकता मुलं बऱ्याच गमती जमती करतात. त्यातूनच हळूहळू स्वतःचं स्वतंत्रपणे काही बोलणं–करणं सुरू होतं.

कागदाला भोकं पाडायचं यंत्र पाहून त्यानी विचारलं, 'हे ततं उदलतात ?' कुणाचं तरी बाळ बघायला गेल्यावर आपण होऊन लगबगीनी जाऊन 'पापा घेतो' म्हणून पापा घेतला. साईबाबांचा फोटो आजीकडे पाहून म्हणाला, 'ते म्हणतायत मारू का ?

एकदा मुंबईहून पुण्याला येताना लोणावळ्याला गाडी थांबली. कुणी तरी भजी आणली होती. लोणावळा लोणावळा असंही लोक आसपास म्हणत होते याला वाटलं लोणावळा म्हणजेच भजी. हा म्हणायला लागला, 'लोणावळा दे. लोणावळा गरम आहे.'

कामाच्या मुलीबरोबर हा रस्त्यावर जांभळं घ्यायला गेला. दीड पावणेदोन वर्षांचाच होता. जांभळं घेत असताना जांभळंवाला ओरडला जोरात, जांभळं घ्या जांभळं तर याला वाटलं यालाच ओरडला. लगेच रडायला लागला.

दोन वर्षांचा झाल्यावर त्याच्या बोलण्याच्या गमती वाढायला लागल्या. शेजारी एक आजीबाई रहातात त्यांना विचारत होता तुम्ही जेवलात ? त्या म्हणाल्या, 'नाही. मी रात्री दूध पितें' तर हा म्हणाला, 'बाटलीनी पिता का भांड्यानी ?' ह्याच काळात त्याची बाटली सोडवण्याचे प्रयत्न चालू होते.

ह्या काळात पाहुण्यांसमोर आईवडलांना लाज आणणे हाही उद्योग मुलं करत असतात. 'मी डोलकर डोलकर डोलकर दर्याचा राजा' हे गाणं त्याला माहीत होतं. एकदा एक गृहस्थ आले तर हा त्यांना विचारत होता, 'कोण तुम्ही ?' ते म्हणाले 'मी भालकर' तर हा तियून ओरडून सांगतो. 'भालकर दर्याचा राजा आलाय्.'

ह्या नोंदी म्हणजे नुसता वाढीचा आलेख नाही. त्या वाचताना करमणूक होते. कुठेतरी मोठेपणीच्या आवडी-निवडींची, गुण-दोषांची, सवयींची मुळंपण त्यात सापडतात. ही लहानपणीची दैनंदिनी सर्वांनी मिळून वाचणं हा सगळ्या कुटुंबांचा कार्यक्रम असतो. फार गंमत वाटते.

पाच–सहा वर्षाच्या मुलाला सर्कसला नेलं होतं तर तो म्हणाला होता– सर्कस म्हणजे काय, माणसांना प्राण्यांसारखं करायला लावायचं आणि प्राण्यांना माणसांसारखं.

दिवाळीत आजोळी मुलांनी चांदीची भांडी काढलेली पाहिली होती नंतर एकदा एका हॉटेलमध्ये गेलो होतो तिथे कॉफीच्या किटल्या चांदीचा मुलामा दिलेल्या होत्या ते पाहून मुलगी म्हणाली, 'काय अगदी चकचकीत भांडी आहेत. दिवाळीत घेतली का काय ?'

शोनील इयत्ता तिसरीत आणि आभा इयत्ता पहिलीत असतानाचं एक संभाषण–

शोनील – माझा मित्र मंदार आहे ना त्याला आभा फार आवडते.

आभा – आणि त्या दुसऱ्यालापण.

शोनील – दुसरा कोण ?

आभा – तो इकडचा दात पडलेला आहे तो ! तो एक दिवस मला बघत होता न ?

आईच्या ऑफिसला जाण्याचा राग एक मधून मधून उफाळून येत असतो. आज नको जाऊ ऑफिसला म्हटल्यावर मी म्हटलं आज मीटिंग आहे जायलाच पाहिजे रे. तर म्हणाला 'तुझं ऑफिस फोडून टाकायला पाहिजे.'

नव्या नोंदीमध्ये मुलांनी केलेल्या कविता, लिहिलेल्या गोष्टी, चित्रं, त्यांचं एकमेकांशी बदलतं नातं, वाढते मान, अपमान, समज सगळं आहे. आज त्या नोंदी करताना काही विशेष वाटत नाही पण दहा वर्षांनी ते वाचताना फार छान वाटणार आहे.

मुलं इतकी चटपट वाढतात की, चार वर्षांपूर्वी आपलं मूल कसं दिसत होतं ते डोळ्यांसमोर येत नाही. मुलांच्या वागण्यातल्या, बोलण्यातल्या गमतीजमती तर कुठल्या कुठे लुप्त होतात. आपल्या मोठेपणी आपल्या लहानपणच्या आठवणी कौतुकानं सांगणारी काही मोठी माणसं असतात त्या आठवणींमधून आपण स्वतःला शोधतो, कधी खूष होतो. आपण ही संधी जरा सविस्तरपणे आपल्या मुलांना का देऊ नये ?

# ‘नाटचसुमन’चे नवे नाटक ‘चीत्कार’

वि. भा. देशपांडे

‘चीत्कार’ हे लतेश शहा यांनी लिहिलेले मूळ गुजराथी नाटक. त्याचा मराठी अनुवाद केला आहे डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी. नाटकाचा विषय–आशय नेहमीपेक्षा वेगळा आहे. रत्ना साळुंखे या मुलीच्या जीवनात एक घटना घडते आणि तिच्या मनावर परिणाम होऊन तिला हॉस्पिटलमध्ये आणून उपचार चालू आहेत येथपासून नाटक आरंभित होते. या रत्नाची मानसिक अवस्था बिघडलेली आहे. स्किझोफ्रेनिया (Schizophrenia) या मानसिक अवस्थेने ती झपाटलेली आहे. याच अवस्थेला मराठीमध्ये दुर्मनस्कता किंवा भग्न व्यक्तिमत्व असे म्हटले जाते. या अवस्थेचे विविध प्रकार संभवतात. रत्नाच्या हातून जे हिंसक कृत्य घडले आहे त्याचा तपशील डॉक्टर काढून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. तिच्याशी जेवढे म्हणून गोडीने बोलता येईल, वागता येईल अशा पद्धतीचे प्रयत्न चालू आहेत. तिला औषधे – इंजेक्शने यांचा मारा न करता माणुसकीच्या स्तरावर तिला बरे करण्याचा यत्न आहे. ती काही काळ सर्वसामान्य वर्तन करीत असते. तिला आपल्या वर्तमान अवस्थेचे भान आहे; पण ज्या क्षणाला प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष तिच्या पूर्वायुष्यातील हिंसक घटनेचा उल्लेख होतो, डॉक्टरांकडून विचारणा होते तेव्हा ती अधिक हिंसक बनते. तिथेच तिचे व्यक्तित्व भंग पावते, भग्न होते. तिच्या हिंसक व्यक्तित्वाला आवर घालणे नर्स, डॉक्टर आदींना अवघड जाते. त्यातून घडणारे नाट्य लेखकाने उभे केले आहे.

अशा प्रकारचे मानसिक रोगी नेमके कसे असतात, या रत्नाच्या संदर्भातले शास्त्रीय सत्य किती हे त्यातले जाणकार तज्ज्ञच सांगू शकतील. नाटकाच्या चौकटीत आहे, त्याचा विचार महत्त्वाचा. अशा प्रकारच्या घटनांमध्ये सत्य किंवा शास्त्र काहीही असले तरी त्याचे नाट्यांतर घडताना काही बदल सोयीने होणे अपरिहार्यच असते. तसे या नाटकात घडले आहे; पण जे आहे ते अतिरंजित आहे एवढे मात्र अनेकदा जाणवते. प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्यासाठी, खिळवून ठेवण्यासाठी काही गोष्टींचा अतिरंजित वापर झाला आहे. विशेषतः घटनांचा–प्रसंगांचा. काही सोयी कृत्रिमपणाने लेखनात करवून घेतल्या आहेत हेही जाणवत राहते. उदाहरणार्थ पहिल्या दोन अंकात नर्स आणि निवेदक म्हणून वापरलेली व्यक्तिरेखा सिस्टर निशा हिला तिसऱ्या अंकात अष्टविनायकांच्या दर्शन सहलीला पाठवून दिली आहे. तिसरा अंक उभा राहण्यासाठी तिची अडचण लेखकाला वाटली असावी. तसेच तिसऱ्या अंकाचा विस्तार होण्यासाठी रत्नाचे नाव सोनल करून काहीसे गूढ निर्माण केले आहे. ते गूढ उकलण्यासाठी एका केटरसंचा आणि तिचा पूर्व परिचय किंवा नुसती चेहरा ओळख आहे असा प्रसंग उपरेपणाने आणावा लागला आहे. तसेच हॉस्पिटलच्या वॉर्डबॉयला घरी आणावे लागले आहे. ही काहीशी कृत्रिमता, अतिरंजितता गृहीत धरूनही हे नाटक प्रेक्षकांवर निश्चितच परिणाम करते यात शंका नाही!

हा परिणाम होण्याचे मुख्य कारण यातल्या कलावंतांचा अभिनय आणि सांघिकता! नाटकात मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे ती रत्नाची. ती केली आहे सविता प्रभुणे या कलावतीने. सविताला आपण प्राधान्याने पाहिली ती ‘निष्पाप’ या नव्या नाटकात. त्याही आधी नाट्यसंपदाने पुनरुज्जीवित केलेल्या ‘महाराणी पद्मीनी’ नाटकामध्ये पद्मिनीच्या भूमिकेत! जे काही नवोदित कलावंत आपल्या गुणांनी अल्पावधीत रंगभूमीवर लक्षवेधी ठरले अशांपैकी अलिकडच्या काळातील सविता ही एक आहे. तिला मध्यम उंची, लख्ख गोरा रंग आणि भावानुकूल चेहरा असल्याने ती विविध भूमिका करू शकते. रंगमंचीय व्यक्तित्वाचा ती आवश्यक तो फायदा आपल्या भूमिकेसाठी करून घेत आहे ही चांगली गोष्ट आहे. तिला रत्नाची मिळालेली भूमिका हे एक आव्हान आहे. कारण ही भूमिका तीन स्तरांवरची आहे. एक मूळची रत्ना साळुंके, दुसरी विशिष्ट घटनेनंतर झालेली मनोरुग्ण आणि तिसरी डॉ. विक्रांतची पत्नी म्हणून सोनल या नावाने ती येते तेव्हा! या तिन्ही भूमिकेतील तिचे दिसणे, वागणे, वावरणे यथायोग्य आहे. विशेषतः ती जेव्हा भग्न व्यक्तिमत्वात व्यक्त होते आणि हिंसक बनते, तेव्हा तिने अभिनयासाठी संपूर्ण शरीराचा केलेला वापर लक्षणीय स्वरूपाचा आहे. त्यातही डोळ्यांमधली मनोरुग्णाची छटा, अर्वाच्य शब्दांचा बिनधोक वापर, सुटण्यासाठी केलेली दांडगाई हे सारेच इतके प्रभावी आणि परिणामकारक घडते की, आपण प्रेक्षक म्हणून एकाग्रतेने ते सारे पहात राहतो. फक्त एकच उणीव जाणवते म्हणजे सविताचा आवाज काहीसा घोगरट, बसकट आहे. अशा या ढोल्या जातीच्या आवाजाला फिरक नसते किंवा आवाजांचे विविध स्तर, अवस्था निर्मिता येत नाहीत. हा दोष कमी करता येईल का याचा विचार गांभीर्याने तिने करायला हवा.

सविताच्या बरोबरीने व्यक्तिरेखा आहे ती डॉ. विक्रांतची. ती केली आहे उदय टिकेकर याने. त्यानेही आपल्या भूमिकेतील अनेक बारकावे परिणामकारक रीतीने व्यक्त केले. मात्र हसणे किंवा दुःखभाव व्यक्त करणे यावेळी त्याच्या चेहऱ्यावरचे प्रयत्न जाणवत होते; पण हा एक उमदा, नवा नायक म्हणून मान्य होण्याजोगा आहे. त्यालाही चांगले रंगमंचीय व्यक्तिमत्व आहे.

या दोन व्यक्तितेखांना पूरक असणाऱ्या व्यक्तिरेखांमध्ये सिस्टर निशाची भूमिका करणारी मेधा कुलकर्णी लक्षात राहणारी आहे; पण तिनं अजूनही शब्दसंवादांची गती कमी करायला हवी. शशिकांत राजाध्यक्ष, शुभांगी जोशी यांनीही आपल्या भूमिका समजून केल्या. त्यांना श्याम तेंडोलकर, श्रीराम दाते, अजित फाटक आदींनी उत्तम साथ दिली.

बाबा पार्सेकरांचे नेपथ्य हॉस्पिटल आणि घराचे वातावरण यथास्थित निर्माण करणारे होते. निवेदन पद्धतीसाठी विशिष्ट व्यक्तीवर प्रकाश टाकण्याची कल्पना नवी नसली तरी चांगली वाटली. या नाटकाचे शीर्षक मात्र त्रासदायक ठरेल की काय अशी भीती वाटते. कारण हे शीर्षक 'गरम' नाटकांच्या कुळीतले वाटते. त्यामुळे चांगला प्रेक्षक तिकडे फिरकणे टाळण्याची शक्यता आहे; पण ज्याचा असा समज झाला असेल त्यांनी तो किंतू काढून टाकून 'नाट्यसुमन' चा हा प्रयोग जरूर पहावा. सविताच्या अभिनयासाठी तर अवश्य पहावा! □

---


चित्रपट

## लाखोंकी बात— बासुदा 'टच' नसलेला

---

**आ**ज माणसाचं जीवन पैशाभोवती केंद्रित झालंय. मग पैसा कमावणं हेच ज्यांच्या आयुष्याचं ध्येय आहे, त्यांचं आयुष्यही पैसा एके पैसा, पैसा दुने पैसा, पैसा त्रिक पैसा अशा रिंगणात फिरत राहलं तर नवल नाही आणि अशा माणसांची संख्याही कमी नाही. पुन्हा या माणसांना आपण पैसा भल्या मार्गांनी मिळवतोय, बुऱ्या मार्गांनी मिळवतोय याचं काही सोयरसुतक नसतं. त्यांना भुलवत असतात ती आजच्या आधुनिक जगातली विविध आकर्षणं आणि या आकर्षणांसाठी मोजावा लागणारा पैसा. या पैसेवहाद्दरांना सर्वसामान्य मार्गांनी मिळणारा पैसा कायमच अपुरा वाटतो कारण त्यात सर्वसामान्य आयुष्य बेफिकीरपणे जगता येत असलं तर स्वप्नांची झिंग मात्र अनुभवता येत नसते. मग त्यांची तल्लख डोकी पैसे मिळवून स्वप्न विकत घेण्याचे नवे नवे मार्ग हाताळायला लागतात आणि त्यातूनच कधी कधी नाट्य उभं राहतं. अशाच एका पैसेवेड्यावरचा चित्रपट म्हणजे 'लाखोंकी बात.'

प्रेम सागर (संजीवकुमार) हा एक पैसे कसे मिळवावेत याचा विचार (च) करण्यात वेळ घालवणारा माणूस. आहे चांगला वकीली पास झालेला पण वकीली चालत नाही. कारण त्याच्या मते एकट्या मुंबई शहरात जवळजवळ ७५ हजाराच्या आसपास वकील आहेत. मग कसं काय व्हायचं? बरं वकीली चालावी म्हणून धडपड करणं याच्या अंगात नाही; पण बेटा आहे 'नशीबवान' कारण वकीली चालत नसली तरी वकीली डोकं चालवून गब्बर पैसा मिळवायची एक नामी संधी त्याला मिळते ती त्याच्या मेव्हण्याच्या (आलोक–फारुख शेख)



रूपानं. होतं काय की, आलोक असतो एक छायाचित्रकार. तो हॉकीच्या मॅचचे फोटो घ्यायला जातो आणि तिथं हॉकी टीमची कर्णधार नीला कपूर (अंजली सेन) हिनं मारलेला चेंडू आलोकला लागल्याचं निमित्त होतं आणि आलोक बेशुद्ध पडतो. हे पाहून प्रेम सागरला वरून दुःख झालं तरी आतून आनंदाच्या उकळ्या फुटतात. कारण या गोष्टीचा फायदा घेऊन तो आलोकच्या संपादकावर तब्बल वीस लाखाचा दावा लावतो. अर्थात त्यासाठी आलोकला त्याच्या लहानपणी झालेल्या आणि आता झालेल्या अशा साऱ्या दुखापतींचं भांडवल करून प्रेम त्याच्या मागं किती तरी आजार चिकटवून देतो त्यामुळं आलोकला मात्र मानेला पट्टा अडकवून व्हीलचेअरला खिळून राहावं लागतं. वास्तविक या मार्गानं पैसे मिळवणं आलोकला बिल्कुल पसंत नसतं; पण आलोकला सोडून गेलेली त्याची पत्नी शोभा (अनिता राज) परत यायला हवी असेल तर हाच मार्ग आहे. असं प्रेम आलोकला बजावतो आणि आलोकलाही शोभा मनापासून परत यायला हवी असल्यानं आलोक हे सगळं मान्य करतो. चैनी, श्रीमंती जीवनाचा हव्यास असलेल्या शोभालाही प्रेम या कटात सामील करून घेतो. आलोकला एवढे पैसे मिळणार हे पाहून शोभा परत आलोककडे येतेही; पण या सगळ्या प्रकरणाला वेगळं वळण लागतं ते नीलामुळं. ही हळव्या मनाची मुलगी आपल्यामुळंच आलोकची अशी अवस्था झाली या समजुतीनं आलोकची काळजी घेते तो लवकरात लवकर बरा व्हावा म्हणून प्रयत्न करते. शोभा नसते तोपर्यंत सगळं ठीक चालतं. पण शोभा आलोककडे रहायला आल्यानंतर तिला अर्थातच हे खपत नाही. ती नीलाला परत न येण्यास बजावते. त्यामुळं नीला आणखीनच दुखावते. तिचं खेळातलं लक्ष उडतं, ती हरायला लागते. परिणामी सहकाऱ्यांबरोबर तिची भांडणं, मारामाऱ्या होतात. आणि तिला संघातून काढून टाकतात. हे सर्व कळल्यानंतर आलोक अस्वस्थ होतो. नीलाच्या अशा वागण्याची कारणं त्याच्या लक्षात येतात तेव्हा तो शोभा आणि प्रेम यांच्या स्वार्थासाठी नीलाचा बळी द्यायचं नाकरतो आणि हे सारं नाटक झुगारून देतो. प्रेमाचा बेत—नो ९९ टक्के पूर्ण

झालेला असतो. तो कोलमडून पडतो. पैसा हातचा जातो म्हणून शोभाही पाठ फिरवते; पण या दोघांच्याही लोभी स्वभावाला कंटाळलेला आलोक त्यांच्याकडे लक्षच देत नाही. तो नीलाकडे जातो. तिला समजावतो आणि हॉकी खेळण्यास भाग पाडतो. त्यातूनच दोघांनाही खरा साथीदार मिळतो.

### गती नाही

' लाखों की बात ' हा बासू चतर्जी दिग्दर्शित चित्रपट. हलकेफुलके, गंमतशीर, सर्वसामान्य जीवनाशी जवळीक साधणारे चित्रपट काढणाऱ्या हृषिकेश मुखर्जी, सई परांजपे वगैरे मोजक्या मंडळींमध्ये बासू चतर्जींचं नाव आवर्जून घेतलं जातं. चित्रपटातील विनोदाला नवं परिमाण देणारे हे दिग्दर्शक. मेहमूदचं घसरत घसरत वेडंवाकडं चालणं, जगदीपचं विदूषकी चाळे करणं, जॉनी वॉकरचं रेकणं इथपर्यंतच विनोदबुद्धीची मर्यादा असणाऱ्या चित्रपटसृष्टीला या दिग्दर्शकांनी विनोदाची नवी परीभाषा समजावून दिली. एकेकाळी व्यंगचित्रकार म्हणून व्यवसाय करणाऱ्या बासू चतर्जींनी आज तो पेशा सोडला असला तरी त्या पेशाचे गुणधर्म मात्र सोडलेले नाहीत. त्यामुळंच सर्वसामान्य आयुष्य जशाच्या तशा स्वरूपात न दाखवता व्यंगचित्राच्या स्वरूपात सादर करून प्रेक्षकांना हसवण्याची हातोटी त्यांना चांगलीच आत्मसात करता आली. ' रजनीगंधा ', ' छोटीसी बात ', ' शौकीन ' वगैरे चित्रपटांचं भरभरून स्वागतही झालं. पण या पार्श्वभूमीवर ' लाखोंकी बात ' बासू चतर्जींचा म्हणून स्वीकारणं जड जातं. ' रजनीगंधा ' 'छोटीसी बात ' सारख्या चित्रपटात छोटासा विषयही छान फुलवणारे बासू चतर्जी इथं मोठा विषयही नीट फुलवू शकत नाहीत. हास्यप्रधान प्रसंग चित्रपटात आहेत, पण जरा बरं डोकं चालणारा कुणीही दिग्दर्शक दाखवू शकेल असे. त्यात ' बासूदा टच ' नाही. हा चित्रपट कॉमेडीच्या अंगानं जाणारा, पण कॉमेडी चित्रपट ठरत नाही. कारण नीला ही हळवी आहे आणि तिचं हे हळवेपण नको तितक्या गंभीरपणानं चित्रित केल्यामुळं सगळा विचका होतो. हे हळवेपण विनोदाच्याच अंगानं गेलं असतं तर नीला चित्रपटातील इतर व्यक्तिरेखांपासून इतकी वेगळी पडलीही नसती आणि चित्रपटाचा खेळकर मूडही कायम टिकला असता. बरं, प्रसंग भरपूर आहेत पण सगळे रेंगाळत रेंगाळत येणारे. त्यामुळं चित्रपट गती घेत नाही. अगदी सामान्य, साध्या विषयातून छानसा चित्रपट निर्माण करणाऱ्या बासू चतर्जींच्या हाती हा विषय गेल्यावर त्यातली वैगुण्य जाऊन एक छानसा चित्रपट निर्माण होईल ही अपेक्षा होती. पण ती पुरी होत नाही. कदाचित इतके दिवस फॅन्टसी किंवा अवास्तवतेच्या अंगानं चित्रपट निर्माण न करणाऱ्या बासू चतर्जींना या विषयातली अवास्तवता फारशी मानवली नसावी. साहजिकच चित्रपटाच्या अपयशाचे धनी होण्यातला मोठा भाग बासू चतर्जींनाच द्यायला हवा कारण चित्रपटातील प्रमुख भूमिकात चमकणारे संजीवकुमार, फारुख शेख आपली कामगिरी चोख बजावतात. संजीवकुमारनं तर आतापर्यंत आपले विविधरंगी, विविधढंगी आणि विविधअंगी अभिनयाचे दाखले वारंवार दिलेच आहेत. अनेक अमिताभ बच्चन, राजेश खन्ना इथं आले आणि मावळले असले तरी संजीवकुमार अद्यापही टिकून आहे आणि नुसता टिकून आहे असं नाही तर त्याचा अभिनयही शिळा झालेला नाही हे ' लाखोंकी बात ' नं सिद्ध केलंय. फारुख शेख त्याची आलोकची भूमिका नेहमीच्याच सहजतेनं पार पाडतो. नव्या नव्या कलाकारांना वाव देणं ही आणखी एक बासूदा स्टाईल. या चित्रपटातही दोन नव्या तारका पेश केल्या आहेत. त्यापैकी मिनालिनी ही गुजराती चित्रपटसृष्टीतली अभिनेत्री संजीवकुमारच्या बायकोच्या छोटयाशा भूमिकेत चमकते. तिच्या मानानं नीलाची भूमिका करणाऱ्या अंजली सेनला बराच वाव आहे. पण तिच्या अभिनयात मोकळेपणा नाही. तिच्या वागण्या बोलण्यातलं अवघडलेपण खटकत राहातं. चांगल्या भूमिकांसाठी धडपडणारी अनिता राज याही चित्रपटात त्यापासून वंचित राह्यलीय. निव्वळ फॅशन शोखेरीज तिला काही काम नाहीय.

मानस मुखर्जी यांचं संगीत सो सो !

' लाखोंकी बात ' हा चित्रपट जरी अपेक्षाभंग करत असला तरी या चित्रपटाबरोबर दाखवली जाणारी ' बडा माडिया ' ही माडिया जमातीवरची डॉक्युमेंटरी फिल्म मात्र बघण्याजोगी. जाहिराती, भारतीय समाचार दर्शन या रटाळ प्रकारांचा धसका घेणाऱ्यांना ' बडा माडिया ' म्हणजे एक सुखद आश्चर्याचा धक्का बसावा. थोडक्या वेळात माडिया जमातीचं जीवन, सणवार, नृत्यपद्धती, लग्नपद्धती यांचं मुद्देसूद आणि संगतवार चित्रण या फिल्ममध्ये करण्यात आलं आहे.

—शुभदा रानडे




विज्ञान

## नागांविषयी थोडेसे

नागांच्या पाच जाती सध्या अस्तित्वात आहेत. पैकी चार आफ्रिकेत असून एक अशियात आढळते. यावरून नागांचे मूळ वसतिस्थान आफ्रिकेत असावे असे म्हणावे लागते. आफ्रिकन नागांचा फणा आपल्याकडील नागांच्या फणेपेक्षा बरीच अरुंद असते.

साधारण शंभर–सव्वाशे सेंटीमीटर लांबी असलेला काळी मान असणारा आफ्रिकन नाग विषाची पिचकारी उडवण्यात पटाईत असतो. तो दोन मीटर अंतरावरील शत्रूच्या डोळ्यांत विष फेकून त्याला तात्पुरते आंधळे करतो व पळून जाऊन स्वतःचा बचाव करतो. शेक्सपिअरच्या 'अँटनी अँड क्लिओपात्रा' या नाटकात भूमिका मिळाल्यामुळे ॲस्प किंवा इजिप्शियन नागाला फार प्रसिद्धी मिळाली आहे. त्या नाटकाची नायिका या नागाचा दंश करून घेऊन आत्महत्या करते. याखेरीज 'केप कोब्रा' हा पिवळा आणि एक काळा–पांढरा अशा आणखी दोन नागांच्या जाती आफ्रिकेत आढळतात. रिंखल हा खरा नाग नाही तो फणा काढू शकतो व विषाची पिचकारी मारण्यातही फार कुशल असतो.



आपल्याकडे सर्रास आढळणाऱ्या नागापासूनच आशियातील इतर उपजाती निर्माण झाल्या आहेत. जवळजवळ दोन मीटर लांबी असणारा भारतीय नाग चकचकीत त्वचेचा असून रुंद डौलदार फणा हे त्याचे ठळक वैशिष्ट्य आहे. भारतात आढळणाऱ्या काही उपजातींचे नागसुद्धा तोंडाने विष उडवू शकतात; पण अर्थातच अशा नागांचे विष पातळ असते व म्हणून ते कमी जहाल असते. भारताच्या वायव्य भागात काळघाभोर रंगाचा एक नाग आढळतो. आफ्रिकेतील रिंखलच्या उलट या काळघाभोर नागाचे आहे. खरा नागकुळातील असूनही त्याला फणा काढता येत नाही !

जवळजवळ ६ मीटर लांब असलेला नागराज किंवा किंग–कोब्रा हा जगातील सर्वात लांब विषारी सर्प आहे; परंतु अलिकडे त्याची गणना नागांच्यात न करता एका स्वतंत्र प्रजातीत करण्याची पद्धत पडली आहे.

## एका कोळियाने

अत्यंत नाजूक धागे तयार करणारा प्राणी म्हणजे कोळी अशी आपली माहिती आहे; पण कोळी अनेक प्रकारचे असतात. झडप घालून भक्ष्य पकडणारा कोळी आपणास माहीत आहेच. अमेरिकेच्या उष्ण प्रदेशात टारांटुला नावाचा एक कोळी सापडतो. तोसुद्धा जाळे विणत न बसता झडप घालूनच भक्ष्य पकडतो.

आपल्या हाताच्या पंजाएवढा मोठा, जवळजवळ १५।१६ सेंटिमीटर त्रिज्या असलेल्या टारांटुला कोळ्याने एकदा लंडनमध्ये मोठाच गोंधळ उडवून दिला होता. कसा कोण जाणे; पण लंडनमधील एका गगनचुंबी इमारतीच्या तेराव्या मजल्याच्या एका खिडकीच्या तावदानावर हा कोळी बसला होता. त्या खोलीत रहाणारी मुलगी खिडकी साफ करत असताना तिला हा टारांटुला दिसला आणि तिने भीतीने किंकाळीच फोडली. काही न सुचून तिने फायर ब्रिगेडला फोन केला. ते लोक येईपर्यंत टारांटुला खिडकीतून पसार झाला होता. त्याला शोधून काढता–काढता लोकांच्या नाकी नऊ आले.

पाली, लहान उंदीर व इतर लहानसहान प्राणी हेच टारांटुलाचे खाद्य असचे तरी प्रसंगी तो लहान सापसुद्धा खातो. प्रथम भक्ष्यावर झडप घालून टारांटुला आपल्या तीक्ष्ण काटयाने भक्ष्याच्या शरीरात किंचित विषारी द्रव्याचा थेंब टाकतो. लगेच तो प्राणी मूर्च्छित पडतो. नंतर कोळी त्या शरीरात तोंडातून लाळ व इतर पाचक रस सोडतो. त्या तीव्र रसांत भक्ष्याच्या शरीराचा भाग विरघळतो. पातळ झालेले हे अन्न टारांटुला तोंडाने ओढून घेतो. अशा रीतीने शरीरातील सर्व भाग खाऊन झाला की निव्वळ कात मागे ठेवून कोळी निघून जातो.

—भा. रा. बापट

## निवडक निवडणूक

( पृष्ठ ३ वरून )

घटकेचे माजी मुख्यमंत्री एन. भास्करराव यांच्या गटाबरोबरची युती कॉंग्रेसनं संपवली आहे, कारण आता त्यांचा प्रभाव बेताचा आणि बोजाच जास्त व्हायचा संभव आहे. कॉंग्रेसचं मनोधैर्य उंचवावं असं काही घडलेलं नाही. त्यांचे एक माजी मुख्यमंत्री चेन्ना रेड्डी आपला वेगळा संसार थाटून राहिले आहेत. राजीवबद्दल देशभर जी एक अनुकूल पसंतीची प्रतिक्रिया आहे, तिचा काही फायदा कॉंग्रेसला मिळतो की काय एवढंच पहायचं.

एन. टी. आर. गोटात त्या मानानं जास्त आशादायक वातावरण आहे. सत्ता आणि लोकप्रियता ही हुकमाची पानं हातातं असल्यानं रामाराव जागांचं वाटप करणाऱ्या रेशनिंग ऑफिसरची भूमिका घेऊ शकतात. तडजोडीचा मवाळ पवित्रा घ्यायचं त्यांना कारण नाही. भाजप आणि दोन कम्युनिस्ट पक्ष यांना प्रत्येकी सरासरी डझनभर जागा देऊन रामाराव समजूत घालतील. जनता पार्टीचा विसर्जित आमदार एकच असला तरी आता त्यांना पंचवीस जागा हव्या आहेत स्वप्नातून लवकर जागे झाले तर तेही पाच सात जागांचे धनी होतील.

महाराष्ट्र आणि शेजारच्या चार प्रांतातलं निवडणुकांचं चित्र फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्याअखेर तरी हे असं होतं. ते लख्ख स्पष्ट होईल दुसऱ्या आठवड्यातच, म्हणजे अर्ज मागे घ्यायची मुदत आणि कॉंग्रेसअंतर्गत बंडाळ्या नि लाथाळ्या संपल्यानंतरच ! □

ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**
अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण -
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.